म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. 9320
१८५१

# शांतिनिकेतन



REFBK-0011640

गोपीनाथ तळवलकर

# शान्तिनिकेतन

[ गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर
यांच्या जीवनकार्याचा परिचय ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...36354... वि: ....................
क्रमांक ......................... नों: दि: 12-11-64

लेखक : गोपीनाथ तळवलकर

REFBK-0011640

REFBK-0011640

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९१५८०

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें

पुनर्मुद्रणाचे हक्क : प्रकाशकाकडे
इतर सर्व हक्क : लेखकाकडे

किंमत दोन रुपये
चित्रकार : दलाल आर्ट स्टुडिओ, मुंबई
प्रथमावृत्ति : मे ८,१९६१

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
टिळकरोड, पुणें २

मुद्रक : य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

रवीन्द्रांच्या सौंदर्यवादी अध्यात्म मार्गांतले
श्रेष्ठ साधक व रससिद्ध कवि
कै. भास्करराव ताम्बे
याना—



# प्रवेश

विश्वकवि रवीन्द्रनाथ यांच्या जीवन-साहित्यावर एक पुस्तक लिहावें असा संकल्प सोडून एक तप लोटलें. तो संकल्प आज पुरा होत आहे. रवीन्द्र-जन्म-शताब्दीच्या समारोहांत हें पुस्तक प्रसिद्ध व्हावें याचें विशेष समाधान वाटतें.

वाङ्मयांतील गलिच्छ प्रवाहांवर नुसती टीकेची झोड उठविण्यानें इष्ट सिद्धि होणार नाहीं. 'नवरसाचे सागर' आणि 'भावार्थांचे गिरिवर' कोणते हें दाखविलें पाहिजे. रवीन्द्रांच्या सुरस व सुभग वाङ्मयाची ओळख याच दृष्टीनें व्हायला हवी. त्यांच्या अष्टपैलू कर्तृत्वाची पार्श्वभूमि समजली तर वाङ्मयाच्या रसास्वादाला फारच मदत होईल. हें सर्व लक्षांत घेऊन प्रस्तुत पुस्तकाची रचना केली आहे. मुख्यत: प्रौढ विद्यार्थी आणि सामान्य जिज्ञासू यांना हें आवाहन पोंचावें ही इच्छा. रवीन्द्रवाङ्मयाचे टोलेजंग देशी-विदेशी तज्ज्ञ आहेत. त्यांच्या पांडित्याशीं बरोबरी करण्याचा धृष्टपणा मी दाखवीत नाहीं. मात्र, रवीन्द्र आणि त्यांचें साहित्य यांच्यावरील उत्कट प्रेमांत मी कुणाचेंहि आह्वान स्वीकारूं शकेन असा आत्मविश्वास वाटतो. '**शान्तिनिकेतन**' याच प्रेमाच्या भक्कम पायावर उभारलें आहे.

रवीन्द्र--जन्मशताब्दीचा समारोह वर्षभर चालेल. आज रवीन्द्र-प्रेमाला आलेला हा पूर पावसाळ्यांतल्या पाण्याप्रमाणें वाहून गेला तर एवढे अफाट श्रम आणि पैसा अनाठायीं जाईल. रवीन्द्र-जीवन-साहित्याचा नेहमीं अभ्यास व्हावा आणि आजच्या श्रद्धाहीन, अस्वस्थ, कृत्रिम जीवनाला स्फूर्ति मिळून तें निष्ठा, स्थैर्य, सहजता यांनीं परिपूर्ण व्हावें अशी कायमची व्यवस्था झाली पाहिजे. रवीन्द्रांच्या वाङ्मयाचा अभ्यास ही केवळ मनोरंजनाची बाब नसून ती आदर्श जीवनाची साधना आहे.

हें पुस्तक सप्टेंबर १९६० च्या शेवटच्या आठवड्यांत लिहायला घेतलें आणि ५ एप्रिल १९६१ ( अक्षय्यतृतीया ) या दिवशीं संपविलें. ज्या ग्रंथकारांचा लेखनास आधार घेतला आहे त्यांचा मी कायमचा ऋणी आहें. आधारभूत ग्रंथ मिळवून देणारे, ‘ शांतिनिकेतन ’ छापणारे आणि प्रकाशित करणारे सारेच माझे सुहृद् आहेत. कुणी तर नुसत्या धन्यवादाच्या शब्दांनीं पुस्तक पुरें करण्यास साह्य केलें. या सर्वांच्या ऋणाचा कर्जरोखा आभाराच्या पावतीनें पुरा न करतां चक्रवाढव्याजानें तो बोजा वाढत जावा असें इच्छितों.

रवीन्द्र जन्म शताब्दी
आनंद-कार्यालय, पुणें

**गोपीनाथ तळवलकर**

# अनुक्रम


- दर्शन १
- संस्कार ४
- राष्ट्रकारण १२
- शांतिनिकेतन २६
- तत्त्वज्ञान ३६
- साहित्यविचार ४८
- काव्य ५६
- गीताञ्जलि ६४
- शिशुसृष्टि ७२
- कथा-कादंबरी ७८
- नाट्य-निबंध ९३
- चित्र-नृत्य १०४
- पर्यटन ११०
- 'कालशिरिं झडे तुझा चौघडा' ११६

११६४०

# दर्शन

**" माझ्या डोळ्यांना मुग्ध करीत तूं आलास. मीं माझें हृदय उघडून तुला पाहिलें आणि कसें अद्‌भुत दर्शन मला घडलें ! "**

✤ ✤ ✤ ✤ ✤ ✤ ✤ ✤

एकोणीसशें तेवीस सालची गोष्ट असावी ती. शनिवार पेठेंत नातूच्या चाळींत रहात होतों आम्ही. दुपारीं जेवणाची वेळ झाली होती. आम्ही पाटावर बसणार इतक्यांत रस्त्यावर एक मोटर वेगानें येतां येतां सावकाश चालूं लागली. आणि दोन्हींकडून माणसें त्या मोटरीभोंवतीं गर्दी करताहेत असें दिसलें. ' रवीन्द्रनाथ टागोर आले आहेत ' असा पुकारा झाला ! आमच्या शेजारीं असलेल्या एका वाचनालयाला भेट द्यायला आले होते ते. मीं सुसाट रस्त्यावर धूम ठोकली. अंगांत शर्ट अडकविण्याचें सुद्धां भान मला राहिलें नाहीं. गर्दींतून वाट काढीत मोटरच्या फूटबोर्डवर मी वेंघलों आणि आंत डोकावून पाहिलें तों, एखादी तेजाची रास घातलेली असावी असा तो महापुरुष दृष्टीस पडला. डोक्यावर काळी मखमली टोपी होती. अंगांत रेशमी झगा घातलेला. शुभ्र केसांच्या महिरपींत तांबूस गोरें मुखमंडल अत्यंत शोभायमान दिसत होतें. हातांचा गोंडसपणा केवळ अवर्णनीय, एखाद्या रांगत्या गुटगुटीत बाळाच्या गोंडस अवयवांसारखा. माझ्याकडे पाहून रवीन्द्रांनीं हास्य केलें आणि माझ्या गालाला हात लावला. खरोखर

त्या वेळीं बाजूची सारी सृष्टि विसरून मी एका दिव्य दुनियेंत गेलों. श्री विष्णूंनीं ध्रुवबाळाला हातांतील शंखानें स्पर्श केला त्या वेळीं त्याला जो परमानंद झाला असेल त्याचा आस्वाद मी घेऊं लागलों. इतकीं वर्षें लोटलीं असलीं तरी अजूनहि त्या क्षणाची आठवण झाली कीं, अंगावर रोमांच उभे राहतात.

यानंतर गुरुदेवांचें दर्शन पुन्हा होण्याचा योग १९३२ सालीं आला. अस्पृष्टांना न्याय मिळावा आणि हिन्दू समाजांतील महत्त्वाचा भाग अलग होऊं नये म्हणून गांधीजींनीं प्रायोपवेशन सुरू केलें ! गांधीजींचे पृथ्वीमोलाचे प्राण धोक्यांत आले म्हणून सारा भारतवर्ष हलालून गेला. अखेर स्पृष्टास्पृष्टांचा करार होऊन या प्रायोपवेशनाचा शेवट झाला. या वेळीं गुरुदेव मुद्दाम गांधीजींच्या भेटीला आले होते. भारतांतील अनेक देवालयांचीं कवाडें अस्पृष्टांना खुलीं झालीं. सभामंडपांतील घंटा अस्पृष्टांच्या हातांनीं घणघणूं लागल्या. अशा आशेच्या वातावरणांतच गुरुदेव पुण्यांत आले होते. त्यांनीं आपलें विख्यात भक्तिगीत मधुर आवाजानें गांधीजींच्या बिछान्याजवळ बसून म्हटलें.

" हें जीवन जेव्हां शुष्क होऊन जाईल तेव्हां जलरूप घेऊन ये. ह्या जीवनांतील माधुरी नष्ट होईल तेव्हां गीत-सुधा होऊन ये......... ज्या वेळीं माझ्या वासना मला त्रस्त करून अज्ञानाच्या धुळवडीनें घेरून टाकतील तेव्हां हे अनिद्रा ! ( जागृत परमेश्वरा ) तूं रुद्राचा प्रकाश होऊन ये. "

अशा अर्थगर्भ पंक्ति म्हणून रवींद्रांनीं मोसंब्याचा रस गांधीजींना दिला. आणि गांधीजींनीं आपल्या उपोषणाची समाप्ति केली. त्या वेळीं पुण्यास शिवाजीमंदिरामध्यें नामवंत नेत्यांची एक जाहीर सभा झाली. तिला गुरुदेव हजर होते. सभेच्या गर्दींत त्यांच्या व्याख्यानाकडे माझें लक्ष नव्हतें. त्यांच्या त्या अलौकिक व्यक्तित्वाचें दर्शन घडणार या आनंदांत मी होतों आणि ती मनीषा पूर्ण झाल्यानंतर पहिल्या भेटीइतकाच आनंद मला वाटला.

तेंच त्यांचें अखेरचें दर्शन. पुढें जाणिवेची उंची वाढल्यानंतर ह्या दोन हृदयंगम प्रसंगांची उजळणी मी मनांत अनेकदां केली. आपल्या संग्रहांतील जुनीं छायाचित्रें ज्याप्रमाणें आपण स्मरणसुखासाठीं पाहतों. त्याप्रमाणें

दोन वेळां प्रत्यक्ष पाहिलेली ती रवीन्द्रांची मूर्ति मी अनेकदां डोळ्यांसमोर आणतों. त्यांच्या वाङ्मयाचा पुढें अभ्यास केल्यानंतर तर हे दोन प्रसंग एखाद्या सुंदर स्वप्नांप्रमाणें पुनः पुन्हां मनश्चक्षूंपुढें येत असतात. कित्येकदां कलाकृति आणि कलाकार यांच्या रूपांत सुसंगति नसते. पण रवीन्द्रांची गोष्ट तशी नव्हती. भारतीय संस्कृतींतील हिमालयाची शुभ्र भव्यता आणि गंगेची खोल निर्मळता, जशी रवीन्द्रांच्या वाङ्मयांत दिसते तशीच ती त्यांच्या मूर्तीतहि प्रगट होई. तेथें वैराग्य होतें, पण त्याला श्रीमंतीची चौकट बसविली होती. साधेपणा होता, पण सौंदर्य त्यांतूनच ओसंडत होतें आणि आंत असलेली दिव्य प्रतिभा सर्व शरिरांतून झगमग करीत आहेसें वाटे. रवीन्द्र हे ऋषीसारखे दिसत, पण हा ऋषी वैराग्याच्या रुक्ष पठारावर बसलेला नाहीं तर ऐश्वर्याच्या मध्यभागीं आहे असें वाटे.

“ वैराग्य साधने मुक्ति से आमार नय।
अनंत बंधन माझे महानंदमय ॥ ”

हें आपल्या जीवनाचें मनोहर सूत्र त्यांच्या भव्य पण सुलायम शरीराकृतींत आणि उंची पण साध्या वेषभूषेंत पूर्णांशानें प्रगट होतांना दिसे. ‘ रसज्ञ ऋषि ’ ही एका थोर कवीनें त्यांना दिलेली पदवी अत्यंत सार्थ होती असें त्यांना पाहून वाटल्याशिवाय रहात नसे.

अशा या रससिद्ध कवीश्वराचें दोन वेळां दर्शन घडल्यानें त्यांच्या वाङ्मयाविषयींच्या सौंदर्याला माझ्या जीवनांत कांहीं वेगळा आशय आला असें मी म्हणेन. कालिदास आणि शंकराचार्य या दोघांच्या प्रतिभाज्योति मिळून एक स्वतंत्र ज्योत तयार झाली आहे असा भास त्यांच्या व्यक्तित्वांत होत असे. या ज्योतीनें हजारों उदास रसिकांच्या अंधकारमय जिवनांत वाट दाखविण्याचें कार्य केलें आहे. त्यांतलाच एक आतां त्यांच्या माहात्म्याची आणि वाङ्मयाची ओळख करून देत आहे.

★

## संस्कार

" महा अरण्यांत मध्यरात्रीं एकादी कळी उमलावी त्याप्रमाणें कोणा शक्तीनें मला या रहस्याच्या पोटीं घातलें ! "

बरोबर शंभर वर्षांपूर्वी ( ८ मे १८५१ ) रोजीं रवींद्रांनीं जन्म घेतला. योगभ्रष्ट जसा पवित्र आणि श्रीमान् कुळांत जन्माला यावा तसें रवीन्द्रांचें झालें. सुवर्णाच्या गोकर्णांतून दूध पिणारें हें बालक निसर्गानें संपन्न करूनच धाडलें होतें. सौंदर्याचें देणें फारच मोठ्या प्रमाणांत लाभलेलें. आनुवंशिक आरोग्य व अंगयष्टि उत्तम प्रकारची. तिचाहि भरपूर वांटा या बालकाला मिळालेला. प्रेमळ आतांची छाया होती, घराण्याची प्रतिष्ठा होती, सांस्कृतिक वातावरण होतें आणि कलोपासना चालू होती. खानदानी इमल्याच्या धूसर दालनांत धर्मप्रेमाचा नंदादीप तेवत होता. खिडकींतून पाश्चात्त्य विचारांचे वारे वहात होते आणि चारी कोपऱ्यांत उपनिषदांतल्या संगीताचे सूर उमटत होते. अशा ऐश्वर्यसंपन्न वातावरणांत हें बालक लहानपणापासून वाढत गेलें.

इंग्रजी संस्कृतीचा प्रभाव भारतवर्षांत प्रथम पडला तो बंगालवर आणि बंगालच्या प्रतिभेनें त्या प्रभावाचा योग्य उपयोग करून घेतला. एकीकडून राजा राममोहन रॉयसारखे खानदानी विद्वान् पाश्चात्त्य सुधारणेची व संस्कृतीची आपल्या देशाशीं दाट सोयरीक व्हावी याच्या खटपटींत होते, तर प्राचीन भारताचें ' ऊर्जित ' आणि ' श्रीमत् ' जगाला दाखविण्याची

उमेद रामकृष्णांसारखा एक निरक्षर पण लोकोत्तर पुजारी दाखवीत होता. बंकीमचंद्र आणि मायकेल मधुसूदन यांनीं गद्यपद्याची ध्वजा उंच फडकविली होती. खुद्द टागोर-घराण्यांत रवीन्द्रांचे आजोबा राजा द्वारकानाथ टागोर व वडील देवेन्द्रनाथ टागोर हे बंगालच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे मोठे आधार होते. द्वारकानाथांनीं आपली थोर संपत्ति घालविली, पण देवेन्द्र-नाथांनीं ती परत कमावली. मात्र अश्वमेध करणाऱ्या प्राचीन राजर्षींप्रमाणें ते आपल्या वैभवापासून दूर हिमालयांत जाऊन राहिले. वंगभूमींत अशा रीतीनें सर्वांगीण पुनरुज्जीवनाचे वारे वहात असतां बरोबर एक शतकापूर्वी रवीन्द्रनाथांनीं प्रतिभा, लक्ष्मी व सरस्वती यांच्या कृपाछत्राखालीं असलेल्या थोर कुलांत जन्म घेतला.

रवीन्द्रांची आई लहानपणींच वारली. पितृदेव तर नेहमीं हिमालयांत असायचे. पण त्यांची आबाळ अशी झाली नाहीं. देवेन्द्रनाथ वाड्यांत नसले तरी त्यांच्या अदृश्य अस्तित्वानें वाड्याचा कोनाकोपरा उजाळलेला असे. उपनिषदांचें तत्त्वज्ञान ही टागोर-घराण्याची अखंड स्फूर्ति होती. लहानपणीं उपनिषदांतले कांहीं श्लोक स्वच्छ व शुद्ध उच्चारांत म्हटल्या-शिवाय रवीन्द्राचा एक दिवसहि गेला नाहीं.

या वेळीं वंगभूमींतले देशभक्त स्वातंत्र्याचीं स्वप्नें पहात होते. इंग्रजी सत्तेच्या मायाबाजारानें जरी ही पिढी दिपून गेली होती तरी भारताच्या स्वातंत्र्याची तळमळहि कित्येक भावनाप्रधान तरुणांना लागली होती. इंग्रजी संस्कृतीचा स्वीकार आणि प्राचीन भारतीय वैभवाचा पुनरुद्धार या क्रियाप्रतिक्रिया जशा चालू होत्या तसेच राजकारणांतहि दोन परस्पर विरुद्ध प्रवाह होते. महत्त्वाकांक्षी माणसांना इंग्रजांचें राज्य वरदान वाटत होतें, परंतु युवकवर्गांत तें राज्य उलथण्याचा मनसुबा रचला जात होता. खुद्द टागोरांच्या घराण्यांत देशभक्तीची परंपरा होती. देवेंद्रनाथ जसे वेन्दाती तसेच देशभक्त होते. परकी राज्याइतकाच परकीय भाषेला त्यांचा विरोध असे. त्यांच्या एका आप्तानें इंग्रजींत लिहिलेलें पत्र त्यांनीं परत केलें. रवीन्द्रांचे मोठे बंधु–ज्योतीन्द्रनाथ–हे उज्ज्वल जहाल देशभक्त होते. मेळे काढून स्वातंत्र्याची जागृति करण्याचा ज्योतिबाबू आणि त्यांचे मित्र प्रयत्न करीत. ज्योतिबाबूंनीं एक मासिक काढलें होतें त्याचें नांव त्यांनीं 'भारती'

असें ठेवलें होतें. या मासिकांत देशभक्तिपर लिखाण प्रसिद्ध होई. त्यांनीं एक गुप्त सभा स्थापन केली होती. भारतमातेच्या शृंखला तोडण्यासाठीं व्रतबद्ध झालेले तरुण या सभेंत जमत. या सभेची बैठक एका पडक्या वाड्यांत भरे. ऋग्वेदाची पोथी, तलवार आणि मृताची कवटी यांना स्पर्श करून शपथ घेतली जाई. रवीन्द्रांना भारतोद्धाराची दीक्षा मिळाली. स्वदेशी जहाजवहातूक चालविण्याचा ज्योतिबाबूंनीं प्रयत्न केला आणि त्यांत हजारों रुपये गमावले ! ज्योतिबाबू हेच रवीन्द्रांचे स्फूर्तिदाते.

ही राष्ट्रभक्ति बरीचशी भावनेवर आधारलेली होती. हा राष्ट्रवाद स्वप्नाळू होता. इंग्रजी सत्तेमुळें आपलें कांहीं आर्थिक व आत्मिक नुकसान झालें आहे आणि समता व लोकसत्ता यांची तरफ लावली तरच ही साम्राज्यशाही उलथून पडेल अशा कांहीं स्पष्ट कल्पना या राष्ट्रवादांत नव्हत्या. तरीहि त्यामागची देशोद्धाराची तळमळ जातिवंत होती. भारताला फार दिव्य भूतकाल आहे म्हणून त्याला उज्ज्वल भविष्य आहे असा हा श्रद्धाधिष्ठित राष्ट्रवाद होता. रवीन्द्रांच्या कोमल मनावर त्याचा उत्कट ठसा उमटला आणि पुढें त्यांनीं त्यावर स्वतःचे संस्कार करून ते आपल्या जीवनाचें एक अंग बनविलें.

लहानपणीं रवीन्द्र कांहींसे एकलकोंडेच असत. शाळेच्या शिस्तींत त्यांचें मन कधींच रमलें नाहीं. शाळेंतून पळून येणारें पोर अशीच त्यांची ख्याति होती ! दीनबंधू अँड्र्यूज्‌ना एकदां त्यांनीं सांगितलें होतें—" एकाकीपणा हा माझ्या बाल्यावस्थेचा विशेष होता. वडिलांची भेट क्वचित्‌च होई. परंतु माझ्या जीवनावर त्यांचा फार खोल परिणाम झालेला आहे. मातेच्या मृत्यूनंतर सेवक माझी जपणूक करीत. माझ्या खिडकींत बसून दिवसच्या दिवस बाहेर काय चाललें आहे याचीं चित्रें मनांत रंगविणें हाच माझा कार्यक्रम असे. मला आठवतें तेव्हांपासून मी निसर्गाचा निःसीम भक्त होतों...माझें निसर्गप्रेम तुम्हांला वर्णन करून सांगतां येणार नाहीं. पण निसर्ग माझा प्रेमळ सोबती होता आणि दरवेळीं तो माझ्यापुढें कांहीं नवें सौंदर्य प्रकट करीत असे. "

शाळेंत न रमणाऱ्या रवीन्द्रांना खराखुरा आनंद निसर्गापासूनच मिळत असे. निसर्ग त्यांचा सखा होता, गुरु होता, स्फूर्तिदाता होता. त्यांनीं

लहानपणीं आणि मोठेपणीं या आपल्या निसर्गप्रीतीसंबंधीं फार स्पष्ट व सुंदर वर्णन केलें आहे. तें पाहिलें म्हणजे त्यांच्या त्या वेळच्या एकलेपणाची कल्पना येते.

" वडिलांची तिसऱ्या मजल्यावरील खोली नेहमीं बंद असे. मी वर जाऊन खिडकीच्या फटींतून आंत हात घालून दाराची खिटी काढीत असे आणि दक्षिणेच्या टोकाच्या असलेल्या त्यांच्या कोचावर स्वस्थ पडून संध्याकाळपर्यंत वेळ काढीत असे. आधींच बंद खोली, पुन: तींत चोरून प्रवेश झालेला, त्यामुळें त्या खोलीला गूढतेची विशेष छटा येत असे. शिवाय दक्षिणेकडील रुंद, विस्तृत व रुंद गच्ची सूर्याच्या किरणांत तळपत असल्यानें तिजकडे पहात मी कल्पनाचित्रें रंगवीत बसे. "

" कलकत्ता शहराचें वक्ष त्या वेळीं दगडानें बांधलें नव्हतें. बहुतेक ठिकाणीं कच्चें होतें. गिरण्यांच्या धुरानें आकाशाचें मुख काळवंडलें नव्हतें. इमारती आणि मैदानें यांच्यामधून तळ्यांतील पाण्यावर सूर्याचे किरण तळपत. तिसऱ्या प्रहरीं वडाच्या लांब लांब सावल्या पडत. नारळीच्या पानांच्या झालरी वाऱ्यानें डोलत. बांधलेल्या पाटांतून गंगेचें पाणी आमच्या दक्षिणेकडील बागेंतील तळ्यांत झऱ्यासारखें पडत असे. मधून मधून गल्लींतून पालख्यांच्या भोयांचे ' हाँइ हुँइ ' शब्द आणि मोठ्या रस्त्यावरून घोडेवाल्याची ' होइओ ' अशी हांक ऐकूं येई. संध्याकाळीं गोड्या तेलाचा दिवा लावला जाई. त्याच्या मंद प्रकाशांत चटई पसरून म्हाताऱ्या दासी-जवळ आम्ही रूपकथा ( fairy tales ) ऐकत बसूं. या नि:स्तब्धप्राय जगा-मध्यें मी एक कोपऱ्यांतील माणूस—लाजाळू, मूक, निश्चंचल असा होतों."

" आणखी एक कारणामुळें मी विशोभित झालों होतों. मी शाळेंतून पळून गेलेला मुलगा. परीक्षा दिली नाहीं, पास झालों नाहीं. माझ्या भावी काळासंबंधीं माझे शिक्षक हताश झालेले. शाळागृहाबाहेरचा जो अनिर्बंध अवसर त्यांत माझें मन एखाद्या भटक्याप्रमाणें संचार करीत असे.

" केव्हां केव्हां तिसऱ्या मजल्याच्या गच्चीवर एका बाजूला रिकाम-पणाच्या वेळीं आपल्याशींच आकाश-पुष्पाची माळ ओवीत, तर केव्हां केव्हां गाजीपुरच्या जुनाट निंबवृक्षाखालीं बसून, विहिरीच्या पाण्यानें बागेचें शिंपणें चाले, त्याचा करुणध्वनि ऐकतां ऐकतां, आपली कल्पनानौका

अहेतुक वेदनेनें भरून तिला समीपच्या गंगाप्रवाहांत दूर सोडून देत मी आपला काळ घालवीत असे."

या वेळीं हिमालयाच्या भव्योदात्त सौंदर्याचेंहि त्यांना दर्शन घडलें. हातांत सोटा घेऊन या शिखरावरून त्या शिखरावर ते हिंडत. त्यांच्या वडिलांनीं या गोष्टीला प्रतिबंध केला नाहीं. किंबहुना रवन्द्रिांच्या मनाच्या स्वैर-संचाराला शिस्तीचा किंवा सक्तीचा आळा देवेन्द्रनाथांनीं कधींच घातला नाहीं, आणि तरीहि अप्रत्यक्ष रीतीनें रवीन्द्रांच्या मनाची घडण ते करीत होते. सत्य आपण होऊन साधकानें शोधून काढावें आणि मग त्यावर चित्त एकाग्र करावें. असें केल्यानेंच सत्यावरचें प्रेम अक्षय होतें, असें देवेन्द्रनाथ मानत. कोवळ्या रवीन्द्राची मशागत अशा रीतीनें बंगालचा निसर्ग आणि महर्षींची दीक्षा यांनीं केली असें म्हणायला हरकत नाहीं.

महर्षि देवेंद्र जरी विरक्त व विजनवासी होते तरी आपल्या प्रतिभावंत पुत्राच्या गुणाचें अमाप कौतुक त्यांना होतें. एकदां महायात्रेच्या मुक्कामांत टिपूर चांदणें पडलें होतें. पुत्रानें सहज म्हटलें, चांदणें कसें दुधासारखें पडलें आहे. तेव्हां महर्षि म्हणाले, 'या दुधांत तुझ्या गाण्यांची साखर पडावी अशी इच्छा आहे.' रवीन्द्रनाथांनीं लगेच एक सुंदर गीत म्हटलें. महर्षि डोलूं लागले. गाणें संपल्यावर ते पुत्राला म्हणाले, "खरोखर एखाद्या राजानें या गाण्याबद्दल तुला गांवच इनाम दिला असता. पण आज मीच राजाची भूमिका करतों." असें म्हणून त्यांनीं रवीन्द्रांना एक भरपूर रकमेचा चेक दिला. याच पैशांनीं रवीन्द्रांनीं आपला 'नैवेद्य' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला आणि तो पितृदेवांनाच अर्पण केला.

रवीन्द्रांच्या संस्कारांत वाल्मीकि–भवभूति–कालिदास यांना फारच मोठें स्थान आहे. कालिदास तर त्यांचा जीवनरसच बनून गेला होता. विद्यापति चंडीदास यांच्या भक्तिगीताचे ते निःसीम चहाते होते. परंतु, या आदर्श व नागर वाङ्मयाइतकेंच ग्रामीण व लोकवाङ्मय त्यांना प्रिय होतें. किंबहुना सर्व वाङ्मयाचें मूळ लोकवाङ्मय अशी त्यांची श्रद्धा होती. बाऊल या नांवाचे गायक बंगालमध्यें आहेत. बाऊल याचा अर्थ वेडा. भक्तिप्रेमावांचून इतर गोष्टी न करणारा आणि ईशचिंतनांत देहभान विसरलेला तो बाऊल. यांच्या[1] गीतांनीं प्रथमपासून रवीन्द्र वेडे झाले होते. उपनिषदांतल्या आनंद-

वादाला त्यांनीं भक्तीची जोड दिली ती बाऊल-सांप्रदायाच्या स्फूर्तीनेंच. स्वत:च्या एका नाटकांत एकतारी घेऊन गाणाऱ्या बाऊलची भूमिका रवीन्द्रांनीं केली होती आणि ती त्यांच्या ' वाल्मीकीइतकीच उत्कृष्ट वठली असें जाणते लोक सांगत. बाऊलच्या लोकवाङ्मयांत जो एक निकोपपणा, मन:पूर्वकता, आणि सहजोद्गार असतो तो रवीन्द्रांना फार हृदयस्पर्शी वाटला. त्यांचें बालमन सांचेबंदपणाचा प्रथमपासूनच द्वेष करीत असे. त्यांची प्रतिभा ठोकळेबाजपणाला कंटाळलेली होती. स्वच्छ, निसर्गरम्य, अपारंपरिक असें जें कांहीं असेल त्यावर रवीन्द्रनाथ लुब्ध होत. बाऊलगीतांनीं त्यांना पाहिजे तें मिळवून दिलें.

मानसिक विकासाबरोबर शरीरसंवर्धनाचीहि काळजी टागोर-घराण्यांत घेतली जाई. टागोरांच्या मोठ्या वाड्यांत आखाडा होता. सकाळीं कुस्तीगीर मुलांना कुस्ती शिकवायला येई. कडक थंडींतहि हा कार्यक्रम चुकत नसे. रवीन्द्रांचे थोरले बन्धु पोहण्यांत फार पटाईत होते. घरच्या तळ्यावर ते सारखे डुंबत असत. त्यांच्यापासून जलतरणाची कला रवीन्द्रांनीं लहानपणींच हस्तगत केली. एका दमांत पद्मानदी ओलांडून जाण्याचा विक्रमहि त्यांनीं केला. त्या वेळीं बंगालमध्यें दरोडेखोरी हा प्रतिष्ठित व्यवसाय होता. ह्या दरोडेखोरांनाहि कांहीं मूल्यें असत. हीं माणसें उजळ माथ्यानें वावरतांना मोठमोठ्या जमीनदारांच्या घरीं मर्दानी खेळ आणि कसरती करून दाखवीत. टागोरांच्या वाड्यांत अशा काळ्याकुट्ट रानदांडग्यांनीं केलेले खेळ रवीन्द्रांनीं लहानपणींच पाहिले होते. आणि त्यांची त्यांच्या मनावर एवढी पकड होती कीं, पुढें त्यांपैकीं एक-दोन खेळ त्यांनीं शांतिनिकेतनच्या विद्यार्थ्यांकडून बसवून घेतले. ज्योतिदादा हे मोठे पटाईत घोडेस्वार होते. त्यांनीं रवीन्द्रांकरितां एक तट्टू विकत घेतलें होतें. त्या अवखळ तट्टानें रवीन्द्रांची खूप फजिती केली, पण रवीन्द्रांनीं अश्वारोहण सोडलें नाहीं.

मृगया हा त्या काळच्या जमीनदारांचा एक आवडता छंद असे. पण रवीन्द्रांनीं प्रत्यक्ष शिकार केली नाहीं. मात्र भावाबरोबर कधीं हत्तीवर बसून तर कधीं पायउतार होऊन त्यांनीं शिकारीची मौज जवळून पाहिली. त्या वेळच्या जमीनदारांच्या सरंजामांत नदींतून जाण्यासाठीं नौका असत. नदीमध्यें कांहीं काळ मुक्काम करावा यासाठीं नौकाघरहि असे. टागोर-

घराण्याचें असें एक नौका-घर होतें. त्यांत मुलांना घेऊन देवेन्द्रनाथ त्यांना कथा सांगत– आणि त्यांच्याकडून उत्तमोत्तम ग्रंथ वाचून घेत. निसर्गाच्या सान्निध्यांत अशी रमणीय ज्ञानोपासना चाले. एकदां देवेन्द्रांनीं रवीन्द्रांना पाण्यांत ढकलून दिलें. रवीन्द्रांनीं तेव्हांपासून पाण्याची भीति सोडून दिली; अशा तऱ्हेनें खानदानी संस्कारांत शारीरिक शक्तीची साधना होत गेली आणि रवीन्द्रांचा सर्वांगीण विकास झाला.

रवीन्द्रनाथांचें मन केवळ भूतकालच्या सुवर्ण-नागरींतच घोटाळत होतें असें मात्र म्हणतां येणार नाहीं. राजा राममोहन रॉय यांनीं नव्या दृष्टिकोणानें स्थापन केलेला ब्राह्मसमाज रवीन्द्रांना जवळचा होता. मात्र ब्राह्मसमाजाच्या यमनियमांत व व्रतांत त्यांचा मुक्तात्मा गुंतून पडला नाहीं. सामाजिक बाबतींत त्यांना सुधारणेचा परंपरागत वारसाच मिळाला होता. टागोर-घराणें हें बंगालमधील प्रतिष्ठित असें मानलें जात असलें तरी त्यांना 'पीराली' असें निंदाव्यंजक नांव दिलें गेलें होतें. ही ब्राह्मणाची एक पोटजात समजली जाई. टागोरांचे पूर्वज मुसलमान सुलतानांचे दिवाण होते, तेव्हां सुलतानांकडे त्यांनीं अपेयपान, अभक्ष्य भक्षण केलें असलेंच पाहिजे या समजुतीनें उच्चवर्णीय बंगाली त्यांना 'पीराली' (पीर-अल्ली) ब्राह्मण म्हणत. या विशेषणांत मुस्लिम नांवाचा वास मुद्दाम लावलेला आहे ! पण याचमुळें रवीन्द्रांना प्रथमपासून समाजाच्या वरच्या थराचा संकुचितपणा प्रत्ययाला येऊन त्यांचें मन उदार बनलें. राममोहन-देवेंद्र यांच्या संस्कारांना अतिशय योग्य अनुकूल भूमि मिळाली. सामाजिक औदार्याची ही भरारी पुढें मानव तेथून एक या विशाल तत्त्वापर्यंत पोंचली हें आपण पहातच आहों.

टागोर–घराण्यांत इंग्रजीचा अभ्यासहि आस्थेनें चालूं होता. खुद्द रवीन्द्रांनीं ज्या शाळांमधून भ्रमंती केली त्यांचीं नांवें 'सेमिनरी', 'नॉर्मल स्कूल', 'सेंट झेव्हिअर्स' अशीं होतीं. येथें रवीन्द्र रमले नसतील, पण पाश्चात्त्य संस्कृतीचे संस्कार त्यांच्या बालमनावर स्फुट-अस्फुट होत गेले हें नाकारतां येणार नाहीं आणि पुढें १८७८ मध्यें त्यांनीं विलायतेची पहिली सफर केली तेव्हां त्यांनीं पदवी जरी मिळवून आणली नाहीं तरी इंग्रजी वाचन विपुल केलें. विज्ञानसंस्कृतीचा आदर्श म्हणून

गाजणारें संपन्न इंग्लंड त्यांनीं डोळे भरून पाहिलें. तेथील रससिद्ध कवि आणि थोर तत्त्वज्ञ यांचा परिचय करून घेतला. समता, शिस्त, उद्योग, बुद्धिवाद आणि त्याजबरोबर परंपरापूजन या इंग्लंडच्या वैशिष्ट्यांशीं त्यांची दाट ओळख झाली. आपल्या आवडत्या शैलीचें सौंदर्यवादी माहेर त्यांना जवळून पाह्यला मिळालें. सामाजिक संस्था आणि कलासृष्टि यांत इंग्लंडनें ज्या परंपरा घालून दिल्या होत्या आणि जे प्रयोग चालविले होते त्यांचे परिणाम रवीन्द्रांच्या संस्कारक्षम मनावर कसे झाले असतील हें सहज समजून येण्यासारखें आहे.

अशा रीतीनें रवीन्द्रांची असामान्य प्रतिभा अष्टपैलू बनत गेली. एका दृष्टीनें भगवान् बुद्धाचा ‘ आत्मदीप व्हा ’ हा आदर्श त्यांनीं गिरविला होता. म्हणजे ते स्वतःच स्वतःचे शिक्षक झाले होते. निसर्गसौंदर्यावर जीवाची कुरवंडी करून ‘ आपलाची वाद आपणाशीं ’ करायचा आणि जाणीवेची एक एक पायरी वर चढत जायचें असें त्यांनीं केलें. लोकगंगेंत खोल बुडी मारून तेथील वाङ्मयधन त्यांनीं मिळविलें. आणि संस्कृत व इंग्रजी वाङ्मयांतील हिरेमोतींहि पारखलीं. पण या साधनेंत त्यांनीं कुणाचेंहि मार्गदर्शन पत्करलें असें दिसत नाहीं. ‘ एकला चालो रे ’ या त्यांच्या सुविख्यात गीतांत वर्णिल्याप्रमाणें त्यांची यात्रा एकाकीच चालू होती. आणि त्यांनीं मंजील गांठलें तेथेंहि ते एकटेच आहेत. त्यांच्या महायात्रेचा मागोवा घेत जे जातील ते अखेर धन्य होणार आहेत.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 3५3५४ वि:
क्रमांक नों: दि: 12-11-६४

# राष्ट्रकारण

" रात्र संपून प्रभात झाली. पूर्व उदयगिरीच्या भाळीं रविबिंब उदय पावलें. पक्षी गाणीं गात आहेत. पावन असा वायु नवचैतन्य ओतीत आहे. तुझ्या करुणारुण रागानें हे भारत-भाग्यविधात्या! झोपलेला भारत जागा झाला आहे. तुझ्या चरणावर माथा नम्र करीत आहे. तुझा जयजयकार असो. "

अलीकडल्या काळांत एवढा संपन्न आणि अष्टपैलू महापुरुष क्वचितच झाला असेल. रवीन्द्र लोकोत्तर साहित्यिक म्हणून जगन्मान्य झाले. पण ते थोर शिक्षण-शास्त्रज्ञहि होते; देशभक्त होते, आणि तत्त्वज्ञ होते. आपल्या स्वप्नाला साकार करणारे ते श्रेष्ठ कर्मयोगी होते. अनंतांतून निनादत आलेली वाणी त्यांनीं ऐकली आणि तिच्यापासून स्फूर्ति घेऊन आजच्या युगाला, आपल्या मातृभूमीला योग्य मार्गदर्शन केलें. आज भारत स्वतंत्र होऊन एक तप लोटलें आहे. अशा वेळीं ज्या विचारसरणीवर आम्ही आमची प्रतिष्ठा ठेवून आहोंत तिच्या निर्मितीला रवीन्द्रांनीं किती स्फूर्ति दिली हें पाहणें फार स्फूर्तिदायक ठरेल.

भारताच्या राजकीय विचारावर रवीन्द्रांची मुद्रा फार स्पष्ट उमटली आहे. रवीन्द्र प्रत्यक्ष राजकारणांत पडले नाहींत. एखाद्या चळवळीचें नेतृत्व त्यांनीं पत्करलें नाहीं किंवा कायदेभंग करून ते तुरुंगांत गेले नाहींत.

ठोकळेबाज व्याख्येप्रमाणें ते देशभक्त नव्हते. पण त्यांच्या राष्ट्रप्रेमाला सीमा नव्हती. कलेची उपासना करणाऱ्या या सौंदर्यवादी महाकवीनें आपला सारा जन्म देशाविषयीं विचार करण्यांत घालविला. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या पंचविशींत भारतीय राष्ट्रीयत्वाचे दोन ध्रुव म्हणजे गांधी आणि टागोर हेच होत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. एक सत्याग्रही संन्यासी, दुसरा सौंदर्यवादी ऋषि. एकानें भारतीय जनतेंत लढाऊ वृत्ति निर्माण करून तिला संघटित व समर्थ केलें, तर दुसऱ्यानें तिच्या राष्ट्रीयत्वाची पातळी उंच नेली.

हा गीतांजलिनें दिगन्त पसरी हिंदी मनोवैभव
इच्छी पश्चिम-पूर्व-संगम, बघे आणूं नवी संस्कृति
हा सत्याग्रह-वीर राबत परी कैदेंत सत्यास्तव
अध्यापी नव राजनीति जगतां स्वाङ्गें करून कृति.

—माधव जूलियन्.

भारतीय राष्ट्रीयत्वाला कोणता वेगळा आणि उच्च आशय रवीन्द्रांनीं दिला ही गोष्ट प्रथम समजून घेतली पाहिजे. मानवी इतिहासांत आपल्या या प्राचीन आणि विशाल देशाला कांहीं खास स्थान आहे; परमेश्वरी शक्तीला या देशाच्या हातून कांहीं महत्कार्य घडवून आणावयाचें आहे, ही रवीन्द्रांची श्रद्धा होती. 'हे मोर अभागा देश !' असें करुण संबोधन ते वापरतात. पण, हा आपला अभागी देशच मानवांचें तीर्थक्षेत्र आहे असेंहि ते म्हणतात. या ठिकाणीं जगाच्या चोहीं भागांतून अनेक मानव-वंश आले आणि त्यांनीं ही आपली मायभूमि मानली. टागोरांच्या मतें भारतवर्षाचा खरा इतिहास हा राजवंशांचा किंवा राजकारणाचा इतिहासच नाहीं. म्हणूनच युरोपप्रमाणें येथें इतिहासाचीं साधनें उपलब्ध नाहींत. मात्र नाना जाति, पंथ, संप्रदाय यांच्या गलबल्यांत प्राचीन काळापासून एक सूत्र या ठिकाणीं गोवलें गेलेलें आहे तें धर्माचें किंवा आध्यात्मिकतेचें. युरोपांतील लोकांनीं एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीला लावण्याचा प्रयत्न केला. भारतांत धार्मिक एकता आणण्याची शिकस्त झाली. या प्रयत्नांत कदाचित् मधून मधून अपयश आलें असेल, पण त्या-मागील उदात्त हेतु कुणीहि नाकारूं शकणार नाहीं. धर्मांचा इतिहास हाच

खरा इतिहास असें भारतवर्ष मानतें. गांधीजींची भूमिका धार्मिक व नैतिक असल्यानें रवीन्द्रांच्या शिकवणीला त्यांचें विशाल कर्तृत्व सुसंवादीच ठरलें.

रवीन्द्रांच्या विशाल जीवनांत भारतीय राजकारणाचीं स्थूलमानानें दोन युगें होऊन गेलीं आणि दोन महापुरुषांनीं या दोन युगांवर प्रभुत्व गाजविलें. टिळक आणि गांधी हे ते दोन महापुरुष होत. टिळकांच्या मृत्यूपर्यंत टिळकच प्रभावी होते. कर्झननें केलेल्या बंगालच्या फाळणीमुळें बंगालमध्यें प्रत्यक्ष प्रतिकाराची लाट उसळली. रवीन्द्रनाथ या लाटेंत होतेच. पण प्रत्यक्ष कायदेभंगाऐवजीं आपल्या वाणी-लेखणीनें राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्याचें कार्यच मुख्यतः त्यांनीं केलें. ' वंदे मातरम् ' हें बंकीमचंद्राच्या ' आनंदमठ ' कादंबरींतील गीत आतां आपलें राष्ट्रगीत झाले. आहे. तें १८८६ च्या कॉंग्रेसमध्यें रवीन्द्रांनींच प्रथम जाहीर रीतीनें म्हटलें. पुढें कॉंग्रेसच्या अधिवेशनास ते विशेष कधींहि हजर राहिले नाहींत. पण वंगभंगाचे चळवळीस त्यांनीं स्फूर्ति दिली.

श्री अरविंद हे वंगभंगाच्या चळवळीचे मूलाधार. लोकमान्य टिळकांना ते गुरुस्थानीं मानीत. दोघेहि गीतेचे गाढ पंडित. भारतीय संस्कृतीचे विशेष अभ्यासक. रवीन्द्रनाथांनीं अरविंदांना आपले राजकीय गुरु मानलें नाहीं तरी अरविंदांबद्दल त्यांना महान् आदर होता. ' श्री अरविंद, रवीन्द्रांचे प्रणाम स्वीकारा. ' ही त्यांची कविता प्रसिद्ध आहे. पुढें अरविंद पॉंडेचरीला जाऊन योगीश्वर झाले तेव्हांहि त्यांच्या दर्शनाला रवीन्द्र गेले होते. आणि तेथून परत आल्यावर एका पवित्र आत्म्याच्या सन्निध जाऊन आलों असे धन्यतेचे उद्गार त्यांनीं काढले.

पण वंगभंगाच्या आगेंमागें विस्तारलेला कांहींसा दहशतवादी गूढ राष्ट्रवाद रवीन्द्रांना तितकासा मानवाला नसावा. पूर्व-पश्चिमेच्या मीलनाचीं स्वप्नें पाहणाऱ्या या महाकवीला दोन गोऱ्या अधिकाऱ्यांना ठार करून इंग्रज सत्ता येथून घालविण्याचा प्रयत्न मोठासा उत्तेजनार्ह वाटला नाहीं यांत नवल नाहीं. बंगाल आत्यंतिक भावनाप्रधान प्रांत आणि रवीन्द्र तर फार मोठे भावकवि. पण असें असूनहि वंगभंगांत प्रकट झालेल्या हत्यावादी संप्रदायाबद्दल त्यांना आकर्षण वाटलें नाहीं. कारण त्यांची राष्ट्रीयत्वाची कल्पनाच पार विशाल होती. वंगीय देशभक्तीच्या त्यागाबद्दल त्यांना

अर्थातच अभिमान वाटे पण त्यांचें अनुयायित्व पत्करणें रवीन्द्रांना जमलें नाहीं. ते पुनः शिक्षणसाहित्य यांच्या प्रशान्त वातावरणांत परतले आणि आपलें जीवितकार्य उत्साहानें करूं लागले. यांत पलायनवाद नव्हता. लोकक्षोभाच्या एखाद्या लाटेशीं आपली वृत्ति जुळली नाहीं तर आपल्या खास क्षेत्राकडे जावें यांत गैर तें काय आहे ! उलट हा प्रामाणिकपणा वाखाणण्यासारखाच नाहीं काय ?

गांधी-पूर्व युगांत भारतीय राजकारणाचे अध्वर्यु टिळक हे होत. टिळकांनीं खाजगी संभाषणांत रवीन्द्रांना केव्हां तरी ‘ ते एक श्रीमंत कवि आहेत झालं ! ’ असें म्हटल्याचें प्रसिद्ध आहे. टिळकांच्या या उद्गारांचा उपयोग करून रवीन्द्रांना कमी लेखण्याचा उपद्व्याप महाराष्ट्रांत गेलीं कित्येक वर्षे चालू आहे ! पण टिळक आणि रवीन्द्र यांचे परस्पर संबंध किती जिव्हाळ्याचे होते याचा स्पष्ट पुरावा पाहिला म्हणजे आमच्या संकुचित व विघ्नसंतोषी विद्वानांच्या कद्रूपणाची तारीफ करावीशी वाटते ! एक झुंजार देशभक्त म्हणून टिळकांबद्दल रवीन्द्रांना फार आदर वाटे. तर भारतीय संस्कृतीचा एक महान् प्रवक्ता या दृष्टीनें रवीन्द्रांना टिळक फार मानीत.

‘ शिवाजीचा उत्सव ’ ही कविता रवीन्द्रांनीं लिहिली ती टिळकांना फारच आवडली. त्या वेळीं टिळकांनीं त्या कवितेची प्रशंसा करतांना म्हटलें कीं, ‘ शेकडों व्याख्यानांनीं बंगाल व महाराष्ट्र यांच्यांत जें प्रेम निर्माण होणार नाहीं तें या एका कवितेनें होईल. ’ महाराष्ट्र हा निर्धनांचा देश. उच्च मूल्यांची कदर त्याला कितीहि असली तरी त्याचा खिसा रिकामाच. पण असें असूनहि लोकमान्य टिळकांनीं महाराष्ट्रांतून पन्नास हजार रुपये जमवून रवीन्द्रांना पाठविले. भारतीय संस्कृतीची उज्ज्वलता जगास पटविण्याचें जें कार्य रवीन्द्र करीत होते त्याचा हा गौरवच टिळकांनीं केला आणि तशा आशयाचें पत्रहि रवीन्द्रांना लिहिलें. स्वराज्या-साठीं विलायतेला शिष्टमंडळ घेऊन लोकमान्य गेले त्या वेळींहि त्यांनीं रवीन्द्रांना बरोबर येण्याचा आग्रह केला होता. आपण वकील किंवा राजकीय कार्यकर्ते नाहीं असें म्हणून रवीन्द्रांनीं टिळकांबरोबर जायचें नम्रतापूर्वक नाकारलें ही गोष्ट वेगळी. रवीन्द्रांसारखा भारताचा थोर

सांस्कृतिक प्रतिनिधि आपल्या शिष्टमंडळांत घेतल्यास विलायतेंत अनुकूल वातावरण निर्माण करण्यास मदत होईल असें टिळकांना वाटत होतें.

रवीन्द्रांचाहि लोकमान्यांवर फार जीव होता. टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला त्या वेळीं बंगालमधून त्यांना मदत पाठविण्यांत आली. पलित नांवाचे एक धनाढ्य गृहस्थ टिळक-साह्य-निधींत मोठी रक्कम घालण्यास तयार होईनात. तेव्हां रवीन्द्र स्वतः त्यांच्याकडे गेले आणि आपला शब्द खर्च करून मोकळ्या मुठीनें त्यांच्याकडून पैसे मिळविले. अमृतसर कॉंग्रेस ही टिळकांच्या जीवनांतली शेवटचीच कॉंग्रेस. त्या वेळीं रवीन्द्रांनीं टिळकांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. टिळकांनीं या कवीश्वरांचे दोन्ही हात घेऊन ते आदरानें आपल्या कपळाला लावले असें सांगतात! टिळक आणि रवीन्द्र यांचा हा लोभ म्हणजे दोन तेजोगोलांचें विलोभनीय असें परस्पराकर्षण होय.

टिळकांविषयीं रवीन्द्रांना आदर होता तर गांधीजींबद्दल त्यांना ममत्व वाटे. १९१५ सालीं आफ्रिकेहून गांधीजींचे कांहीं अनुयायी भारतांत आले. त्यांना 'शांतिनिकेतन'मध्यें आसरा मिळाला. महत्त्वाच्या वेळीं गांधीजी रवीन्द्रांचा कौल घेत. 'शांतिनिकेतन'मध्यें रवीन्द्र गांधी-जयंती साजरी करीत. रवीन्द्रांची स्तुति करतांना गांधीजी शब्दांचें धन काटकसर न करतां वापरीत, तर रवीन्द्र म्हणत :

"प्रत्यक्ष यज्ञपुरुषाचें दर्शन कोणास घ्यायचें असेल तर त्यानें गांधींना भेटावें. यज्ञाला स्वतः यज्ञरूप घ्यावेंसें वाटलें आणि गांधींच्या रूपानें तो अवतरला. गांधी हा जीवन्मुक्त आत्मा आहे. मला उद्यां कोणी गळफांस लावला तर 'धावा हो धावा' असा आक्रोश मी करीन. पण अशा स्थितींत गांधींच्या मुखावाटे दुःखाचा निःश्वासहि निघणार नाहीं याची मला खात्री वाटते. उलट, गळफांस लावणाऱ्याकडे पाहून त्यांना खरोखरच हंसूं येईल. मरतांनासुद्धां हसतमुखानें ते प्राण सोडतील."

टिळकांच्या झुंजार राष्ट्रवादापेक्षांहि गांधीजींच्या अहिंसात्मक सत्याग्रहाला रवीन्द्र अधिक जवळ होते. गांधीजी चळवळीच्या धुमाळींत गुंतलेले तर रवीन्द्र एकान्तप्रेमी. एक सत्याचा आग्रही तर दुसरा सौंदर्यांचा उपासक. एक प्रत्यक्ष कृतीचा प्रेरक तर दुसरा उच्च विचारांचा स्फूर्तिदाता.

पण असें असूनहि गांधीजी व रवीन्द्र यांची मनोमन एकता होती. कारण दोघांनाहि भारतीय राष्ट्रीयत्वाचा विजय हा जागतिक शांततेचा पाया वाटत होता. आपला राष्ट्रवाद पाश्चिमात्य राष्ट्रांसारखा आक्रमक न होतां संग्राहक व्हावा आणि प्रेम व सहकार यांचें साम्राज्य जगावर नांदावें असें दोघांनाहि वाटत होतें. यंत्रारूढ संस्कृतीनें मनुष्याचा आत्मा गुदमरला आहे, त्यानें निसर्गाच्या खुल्या वातावरणांत गेलें पाहिजे, हा दोघांचाहि आग्रह होता. सेवाग्राम आणि शांतिनिकेतन येथील निसर्गपूजन सारखेंच असे. 'शांतिनिकेतनां'त कदाचित् कलात्मक अंश जास्त असेल इतकेंच. खेड्यांतील साध्या खेडुताचें कर्तव्यमग्न जीवन हेंच खरें सुखी जीवन आहे याविषयीं गांधीजी आणि रवीन्द्र यांत मतैक्य होतें. ग्रामोद्योगाचा प्रयोग आपल्या 'श्री निकेनां'त करून रवीन्द्रांनीं गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाला सक्रिय मान्यता दिली. साध्याइतकींच साधनें शुद्ध असावींत किंवा जुलमाचा प्रतिकार आत्मशक्तीनें करावा या बाबतींतहि गांधीजी व रवीन्द्र यांची विचारधारा एकच होती. माणसामाणसांत भेद करणाऱ्या प्रवृत्तीचे दोघेहि कडवे विरोधक होते. आजच्या स्पर्धामय व हिंसाग्रस्त जगावर शांतिप्रेमाचा वर्षाव हे दोघेच महापुरुष करूं शकतील असें रोमां रोलाँसारख्या तत्त्वज्ञास वाटावें हें साहजिकच होय.

पण असें असलें तरी रवीन्द्रांचा गांधीजींशीं मतभेद होताच. मनुष्यानें आपल्या श्रमशक्तीचा वापर कमींत कमी केला म्हणजे जी शक्ति शिल्लक पडते तीमधून कला जन्मास येते. आणि कलानिर्मितीमुळेंच मनुष्यजीवनाला पूर्तता व सौंदर्य येतें ही रवीन्द्रांची खास विचारसरणी होती. मनुष्यानें यंत्राचा शोध लावला आणि आवश्यक कामें तो यंत्राकडून पार पाडूं लागला, यामुळें कलावृद्धि होत गेली. आपलें कापड प्रत्येक माणसानें आपणच विणावें, आपलें अन्न आपणच तयार करावें असें गांधीजी सांगत. रवीन्द्रांच्या विचारसरणींत हें साहजिकच बसत नव्हतें. चरख्याचा आणि स्वराज्याचा कांहीं संबंध नाहीं असें ते म्हणत. जी गोष्ट यंत्रानें करतां येण्यासारखी आहे ती आपण करीत बसणें म्हणजे आपली चैतन्यशक्ति फुकट घालविण्यासारखें आहे. सूत काढणारा आत्मकेंद्रित होतो. शेतकऱ्याला चरखा फिरवायला सांगणें म्हणजे त्याला शेतकीच्या कामापासून परावृत्त करण्या-

सारखें आहे. तरुणांनीं शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालण्याच्या गांधीजी-प्रणीत कार्यक्रमांवरहि रवीन्द्रांनीं कडक टीका केली. आमच्या तरुणांना पाश्चात्त्य वाङ्मयांतील सुंदर व मनोहर कल्पना परिचित झाल्याच पाहिजेत. तरुणांनीं गांधीजींचें म्हणणें विचार न करतां निमूटपणें ऐकणें ही एक-प्रकारची मानसिक गुलामगिरी होय. या गुलामगिरीविरुद्ध रवीन्द्रांनीं सूर उठविला.

या टीकेला गांधीजींनीं मार्मिक उत्तर दिलें. पण या दोन महापुरुषांत असा वाद रंगला होता तरी त्यांच्या अंतरात्म्यांच्या मीलनांत अंतराय आला नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध गांधीजींनीं असहकारितेचा जो अपूर्व संग्राम केला त्याचें मानवी इतिहासांतील महत्त्व रवीन्द्रांइतकें फारच थोड्यांनीं वर्णिलें असेल. पाशवी शक्तीची चलती कांहीं काळ झाली तरी अखेर सत्याचाच विजय होईल, या दृष्टीनें असहकारितेची चळवळ फार महत्त्वाची आहे. पूर्वेकडील तत्त्वज्ञानाचें रहस्य गांधींच्या रूपानें प्रगट झालें आहे. मनुष्याचें खरें स्वरूप नीतिमय व प्रेममय अवस्थेंत वाढीला लागतें हें गांधीजी सिद्ध करून दाखवीत आहेत, अशी मुक्तकंठानें रवीन्द्रांनीं प्रशंसा केली. थोडक्यांत म्हणजे जडावर चैतन्याची मात होण्यास किंवा द्वेषाची जागा प्रेमानें पटकावण्यास गांधीजींची चळवळ कारण होत आहे असें रवीन्द्रांनीं समाधानपूर्वक म्हटलें.

रवीन्द्रनाथांचें नांव वंगभंगाच्या वेळीं सरकारच्या 'काळ्या यादीं'त होतें आणि स्वदेशी-आंदोलनाला त्यांनीं उघड पाठिंबा दिला तरी ब्रिटिश सरकार त्यांना प्रत्यक्ष वैरी किंवा विरोधक मानीत नव्हतें. 'सर' हा किताब सरकारनें त्यांना दिला होता. परंतु जालियनवाला बागेंत हत्याकांड झालें आणि जनरल डायरनें जवळ जवळ २००० निरपराधी माणसें मुंग्यांसारखीं मारून टाकलीं तेव्हां रवीन्द्रांचें मन भडकून उठलें. त्यांनीं सरकारकडे आपली 'सर' ही पदवी परत केली आणि त्या वेळीं व्हाइसरॉयला स्पष्ट लिहिलें :

" माझ्या मूक व भयग्रस्त बांधवांच्या रागाला वाचा फोडणें व माझा निषेध नोंदविणें हें कमींत कमी मला केलेंच पाहिजे. मग त्याचे परिणाम कांहींहि होवोत. आजच्या अपमानास्पद वागणुकीच्या संदर्भांत मानाचीं

बिरुदें आमची लज्जा अधिकच स्पष्ट करून दाखवीत आहेत. मनुष्याला लाजिरवाणी अशी माझ्या देशबांधवांची संभावना होत असतां, ब्रिटिशांनीं दिलेल्या कुठल्याहि खास मानसन्मानाचा त्याग करणेंच मला इष्ट वाटतें...."

बंगालमध्यें हिजली येथील तुरुंगांत गोळीबार झाला तेव्हां रवीन्द्रांचें राष्ट्रप्रेमी मन असेंच खवळून उठलें. आपल्या देशाचा अथवा देशबांधवांचा अपमान कुणी केलेला त्यांना सहन होत नसे. रवीन्द्र मृत्युशय्येवर होते तेव्हांची गोष्ट. दुसरें महायुद्ध भयंकर प्रमाणांत पेटलें होतें. गांधीजींनीं हिंसात्मक युद्धांत भाग घ्यायचा नाहीं असें ठरविल्यानें कॉंग्रेस महायुद्धापासून अलिप्त राहिली. भारताला पारतंत्र्यांत ठेवणाऱ्या इंग्रजांना फॅसिस्ट राष्ट्रांशीं लढण्याचा नैतिक अधिकार नव्हता असें गांधीजींचें म्हणणें होतें. हिटलेरला नेस्तनाबूद करण्याकरितां अधिक संहारक हत्यारें शोधून काढणारे हिंसेलाच उत्तेजन देत होते. गांधीजींची नैतिक भूमिका उच्च होती. पण या भूमिकेचा दोस्तांच्या प्रवक्त्यांनीं मुद्दाम विपर्यास केला. मिस् राथबोन या इंग्रज बाईनें एक खोडसाळ पत्र प्रसिद्ध केलें. त्यांत तिनें म्हटलें होतें :

" आम्ही आक्रमकांशीं सामना देत आहोंत आणि हे भारतीय पुढारी व त्यांचे अनुयायी आमच्या युद्धविषयक प्रयत्नांत अडथळे आणीत आहेत. युद्धांत प्रत्यक्ष भाग तर ते घेत नाहींतच, पण कायदेभंग करून सरकारी यंत्रणा बंद पाडण्याचा उद्योग ते करीत आहेत. ही तटस्थाची भूमिका नसून आक्रमकांच्या मदतनिसाची आहे. अशा वागणुकीनें आक्रमक राष्ट्रांच्या विजयाचा संभव वाढला असून त्यायोगें परतंत्र राष्ट्रांच्या हालअपेष्टा मात्र ते वाढवीत आहेत. "

पं. जवाहरलाल नेहरूंच्याविषयीं तर बाईनें फारच कुत्सित टीका केली होती :

" पं. नेहरू ! ' इंग्लंडमधील जो पुष्कळ चांगला भाग आहे त्यावर माझें प्रेम आहे. ' या तुमच्या आश्वासनाचा आम्ही कसा भरंवसा धरावा? तुमच्या कृतीनें आपल्याला प्रिय असलेल्या इंग्लंडवर तुम्ही केवढी संकटपरंपरा आणीत आहां! एक गोष्ट सत्य आहे. तुम्ही आणि तुमचे

अनुयायी इंग्लंडपासून खूप शिकलां आहां, इंग्रजी विचारांचें आकंठ पान तुम्हीं केलें आहे. नागरिक हक्क व लोकाभिमुख संस्था यांचे प्रयोग इंग्लंडच्या उदाहरणांवरूनच तुम्हांला सुचले. या सर्वांचा परिणाम इंग्लंड आणि हिंदुस्थान यांत आत्मिक बंधनें निर्माण होण्यांत व्हावा अशी कुणीहि अपेक्षा करील. पण झालें आहे उलटेंच. आपल्या देशावर झालेल्या अन्यायानें तुमच्या भावना फाजील भारावल्या आहेत. हिंदुस्थान प्रथम ही तुमची वृत्ति असूं द्या. पण त्यासाठीं युद्धविषयक प्रयत्नांत खीळ घालण्याचा उपद्व्याप कां ? ब्रिटिश सैन्यांचें व आरमाराचें संरक्षण आम्हांला नको असें नेहरूंनीं अगदीं आणीबाणीच्या वेळीं जाहीर केलें, काय अविचारी ताठा हा ! इतकी स्वतंत्र भूमिका घेण्यास फार तयारी व वेळ लागतो. जालियनवाला बागेपेक्षां भयानक आपत्ति तुमच्यापुढें येतील ! ”

हें सर्व पत्रच अत्यंत खोडसाळपणाचें आहे. याला जून १९४१ मध्यें रवीन्द्रनाथांनीं मृत्युशय्येवरून एक कडक उत्तर लिहिलें. यानंतर दोनच महिन्यांनीं ते स्वर्गस्थ झाले, हें लक्षांत घेतलें म्हणजे अखेरपर्यंत त्यांचें मन किती संवेदनाक्षम होतें आणि राष्ट्राच्या इभ्रतीबद्दल ते किती जागरूक होते हें कळून येईल. रवीन्द्रांनीं लिहिलें :

“ राथबोनबाईचें पत्र मुख्यतः जवाहरलालना उद्देशून आहे. राथबोन-बाईच्या देशबांधवांनीं जर त्यांना तुरुंगांत आज डांबून ठेवलें नसतें तर स्वातंत्र्यसंग्रामांतील त्या धीरोदात्त वीरानें या पत्राला तडफदार व बिनतोड उत्तर दिलें असतें. पण ते आज बोलूं शकत नाहींत म्हणून रुग्णशय्येवरून मला हा निबंध प्रसिद्ध करावा लागत आहे. ”

इंग्रजांचा या देशावरील ऋणाचा वाजवीपेक्षां जास्त बकवा करण्यांत अर्थ नाहीं असें बजावून रवीन्द्रांनीं म्हटलें :

“ गेलीं दोन शतकें या देशाची ब्रिटिशांनीं जी अखंड लूट केली तिचें काय ? मी भोंवतीं पाहतों तेव्हां हाडांचे सापळे झालेले लोक भुकेसाठीं धडपडतांना दिसतात ! खेड्यांतील स्त्रिया पिण्याच्या पाण्यासाठीं चार थेंब मिळतील म्हणून चिखल उपसून काढतांना मला दिसल्या आहेत. खेड्यांत शाळांपेक्षांहि विहिरींची टंचाई आहे. इंग्लंडचे लोक आज संकटांत आहेत

याचा मलाहि खेद होतो. पण आज आमच्या शेजारीं गांवांत पिकणारा तांदूळ आमच्या गांवांत आणतां येत नाहीं, तर तोच तांदूळ इंग्लंडला पोंचविण्यासाठीं आगबोटी धांवत आहेत. आमचे बांधव अन्नावांचून उपाशी मरत आहेत...आमच्या पायांत बेडया घालणाऱ्यांच्या हातांचें आम्ही चुंबन घ्यावें असें राथबोनबाईंना वाटतें. सरकार आपल्या प्रजेच्या हितासाठीं काय करतें यावर त्याची योग्यता ठरते. त्याच्या प्रवक्त्यांच्या लंब्याचवडया भाषणांनीं नव्हे...ब्रिटिश परके आहेत म्हणून आम्ही त्यांचें स्वागत करण्यास अनुत्सुक आहोंत असें नाहीं, तर आपण या देशाचे विश्वस्त आहों असा बहाणा करून या देशाचा त्यांनीं विश्वासघात केला आणि स्वतःच्या भांडवलदारांचे खिसे गरम करण्याकरितां या देशांतल्या लक्षावधि लोकांच्या सुखाची होळी केली, यामुळें त्यांना आमच्या हृदयांत स्थान राहिलेलें नाहीं."

रवीन्द्रांची राष्ट्रप्रीति अशी जाज्वल्य होते. ती केवळ भावुक नव्हती. भारत स्वतंत्र कां झाला पाहिजे याची निश्चित कारणमीमांसा त्यांनीं केली होती. जगांतील एकंदर दलितांविषयींच त्यांना सहानुभूति वाटे. इटलीनें अबिसिनियावर हल्ला केला त्या वेळीं त्यांनीं निषेध केला. जपाननें चीनचा घास गिळण्याचा प्रयत्न केला तेव्हांहि त्यांना मनस्वी दुःख झालें. पारतंत्र्यानें आर्थिक, सांस्कृतिक आणि आत्मिक गळचेपी होते म्हणून ते जगांतील कुठल्याहि आक्रमक राष्ट्राचा तिरस्कार करीत. हुकूमशाहीचे ते कट्टे विरोधक होते. स्वातंत्र्य असूनहि नागरिक हक्कांची पायमल्ली होत असेल आणि जनतेला साचेबंद शासनांतून जावें लागत असेल तरीहि रवीन्द्र त्याचा निषेध करीत. सोव्हिएट रशियाला त्यांनीं भेट दिली त्या वेळीं सोव्हिएट रशियानें मानवी समाजाच्या समृद्धीसाठीं चालविलेले पर्वतप्राय प्रयत्न आणि विज्ञानावर आधारलेल्या प्रचंड योजना यांचा त्यांनीं गौरव केला. पण त्याचबरोबर मानवाच्या आत्म्याला गुदमरून टाकूं नका, असा इषारा देण्यासहि ते कचरले नाहींत. राजकीय स्वातंत्र्यानेंच आर्थिक समता येईल ही त्यांची आधुनिक दृष्टि होती. पण केवळ समतेनें भागणार नाहीं, माणसाला आत्मिक स्वातंत्र्य असेल तरच जीवनाचें खरें सार्थक आहे ही त्यांची श्रद्धा कधीं सुटली नाहीं.

रवीन्द्रांच्या राष्ट्रकारणांतील ऋणांचें सुंदर वर्णन पं. जवाहरलाल नेहरूंनीं केलें आहे :

" आपणांला त्यांनीं अंधारांतून मार्ग दाखविला आणि जीवनाच्या सूक्ष्म व उदात्त बाजूंची ओळख करुन दिली. ज्यायोगें व्यक्ति आणि राष्ट्रें नष्ट होतात अशा चक्रांत आपण सापडलों नाहीं याला कारण रवीन्द्रांची शिकवणच होय. स्वातंत्र्यासाठीं लढण्याची स्फूर्ति देणारा राष्ट्रवाद चैतन्यशील आणि उदात्त असतोच. परंतु पुष्कळदां तो संकुचितपणाची भूमिका घेतो आणि आपल्या भक्तांना जीवनाचें सर्वांगीण दर्शन होऊं देत नाहीं. पण रवीन्द्रनाथांनीं आपल्या राष्ट्रवादाला आंतरराष्ट्रीय विचाराची व्यापक बैठक दिली आणि साहित्य-संगीतादि कलांच्या जादूनें त्याला संपन्न केलें. म्हणूनच आज तो भारताच्या जागृतीचें संपूर्ण प्रसादचिन्ह झाला आहे. "

आधुनिक भारताच्या राष्ट्रवादाची उंची व खोली वाढविण्याच्या दृष्टीनें रवीन्द्रांची कामगिरी केवळ अतुलनीय आहे. भारताच्या सुवर्णयुगांतून जरी त्यांनीं स्फूर्ति घेतली होती तरी पाश्चात्त्यांच्या उत्कृष्ट संस्था व सुधारणा घेण्यास त्यांचा विरोध नव्हता. जुनें तें सर्वच सोनें आहे असेंहि ते म्हणत नसत. भारतांत वर्णभेदाचा बकासुर प्रत्यहीं या देशांतल्या केवढ्या तरी सत्त्वाचा फडशा पाडीत आहे असेंच ते म्हणत. परंतु राष्ट्रवादानें पाश्चात्त्य देशांत जें आक्रमक रूप घेतलें तें भारतीय राष्ट्रवादानें घेतां कामा नये आणि यासाठीं प्राचीन संस्कृतींतला उज्ज्वल आदर्श आधुनिक भारतानें नव्या आशयांत व संदर्भांत पुनः उभारला पाहिजे अशी रवीन्द्रांची शिकवण होती.

" परमेश्वरानें हिंदुस्थानच्या मागें जें कर्तव्य लावून दिलें आहे तें न करतां आम्ही राजकारणाच्या मागें लागत आहों म्हणूनच आमचें तेज पडत नाहीं ही गोष्ट विसरतां कामा नये...साऱ्या मनुष्यजातीला मिळून एकच इतिहास आहे आणि निरनिराळ्या राष्ट्रांचे इतिहास म्हणजे त्या इतिहासांतलीं निरनिराळीं प्रकरणें आहेत . माझें मत विचाराल तर तें असें आहे कीं, प्रेम आणि आध्यात्मिक ऐक्य या शक्ति ज्यांना ईश्वरकृपेनें प्राप्त झाल्या आहेत, परकीयाविषयींच्या द्वेषबुद्धीचा लेशहि ज्यांच्या ठायीं नाहीं व ज्यांना कल्पनेनें दुसऱ्यांच्या स्थितीचा अनुभव घेतां आल्यामुळें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत

त्यांच्याविषयीं सहानुभूति वाटते तेच भविष्यकालीं जिवंत राहतील आणि ज्यांच्या ठायीं परकीयांविषयीं द्वेषबुद्धि प्रबळ आहे त्यांचा नायनाट होईल ...पूर्वीच्या काळच्या आकुंचित भौगोलिक मर्यादा आतां राहिल्या नाहींत; अर्थात् आपला भ्रातृभावहि पूर्वींप्रमाणें संकुचित स्वरूपांत ठेवण्याचें कारण नाहीं...हिंदुस्थान पाश्चात्यांपुढें भीक मागण्यास उभें राहिलेलें नाहीं. पाश्चात्य राष्ट्रें तसें समजत असलीं तरी हिंदुस्थाननें पाश्चात्य सुधारणा झुगारून द्यावी आणि स्वतंत्र पण एकलकोंडेपणानें राहावें असें मी म्हणणार नाहीं. दुसऱ्याशीं मिळून मिसळून राहावें असेंच मी म्हणेन. मग त्यांत स्वत:कडे कमीपणा आला तरी पत्करेल."

हे उतारे पुरेसे सुबोध आहेत. रवीन्द्रांच्या राष्ट्रवादाची झेप केवढी होती हें यावरून कळून येईल. आज भारताच्या परराष्ट्रीय राजकारणांत जो संयम व विधायक दृष्टि आणि औदार्य दिसत आहे त्याचीं बीजें रवीन्द्रांच्या या आदेशांत सांपडतील. विशेषत: दुसऱ्या महायुद्धांत संहारक अस्त्रांची जी राक्षसी वाढ झाली आणि भारत स्वतंत्र झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाशीं त्याचा जो संबंध आला तो लक्षांत घेतां रवीन्द्रांच्या शिकवणींतलें द्रष्टेपण कळून येतें. चढेलपणा करून दुर्बळ राष्ट्रांना पाशवी शक्ति वाढवायला लावणाऱ्या प्रबळ राष्ट्रांचा रवीन्द्रांनीं निषेध केला आहे. मानवी संस्कृतीवर अण्वस्त्राचें संकट यायच्या पूर्वींच रवीन्द्रांनीं युद्धखोरीच्या दुष्परिणामाबद्दल इषारा दिला होता.

भारतीय स्वातंत्र्य केवळ भारतीय जनतेच्या सुबत्तेसाठीं नाहीं तर जगाच्या सुखशांतीसाठीं आहे, हा रवीन्द्रांचा ठाम सिद्धान्त होता. पण ही उच्च भूमिका पार पाडण्यास स्वातंत्र्याच्या आशयांतच संपूर्ण परिवर्तन त्यांना पाहिजे होतें. केवळ गोरी नोकरशाही गेली म्हणजे सर्व कांहीं संपलें नाहीं.

"राजकीय स्वातंत्र्य मिळालें म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. असा आपल्यापैकीं ज्या कित्येकांना भ्रम वाटत आहे त्यांनीं पाश्चात्यांच्या इतिहासांतलीं तत्त्वें वेदवाक्याप्रमाणें उचललीं आहेत आणि माणुसकीवरचा त्यांचा विश्वास उडाला आहे. पण आपण हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं,

समाजांतलें जें जें दुर्बळ अंग आपण उराशीं धरून ठेवूं तें तें राजकारणांत संकटें प्रसविल्याखेरीज राहणार नाहीं. ”

यांत केवळ ध्येयवाद नाहीं तर व्यवहारी शहाणपणहि आहे. समाज-सुधारणेची पोटतिडीक तर आहेच आहे. स्वतंत्र भारताची राज्यघटना सादर करतांना त्या घटनेचे शिल्पकार कै. डॉ. आंबेडकर म्हणाले होते कीं, ‘ या घटनेपासून मिळणाऱ्या फायद्यापासून जे वर्ग वंचित राहतील ते ही घटना उध्वस्त केल्याखेरीज राहणार नाहींत. ’ रवीन्द्रांच्या वरील विवेचनाच्या संदर्भांत हें विधान मनन करण्यासारखें आहे. आपल्या देशांत समता, समृद्धि आणि सामर्थ्य यावें याची तळमळ रवीन्द्रांना रात्रंदिवस लागलेली होती. मात्र बाजारीपणा किंवा वणिक्वृत्ति यांच्या आहारीं आपला देश लागेल याचें भय त्यांना वाटे. विज्ञान–संस्कृतीपासून दूर राहूं नये, पण आपला चिरंतन आदर्शहि दूर ठेवूं नये असा रवीन्द्रनाथांचा बाणा होता.

“ आपलें जीवन बाह्यतः साधें आणि अंतर्यामीं संपन्न असावयास पाहिजे आहे. समाजाच्या सहकारित्वाच्या पायावर सुधारणेच्या इमारतीची उभारणी झाली पाहिजे. दुसऱ्याशीं विरोध आणि अन्यायाची प्राप्ति ही सुधारणेच्या मुळाशीं असूं नयेत. आमच्या देशांतल्या द्रव्याचें चोहींकडून शोषण चाललें असतां ही गोष्ट कशी साधतां येईल, हा सध्यांच्या काळीं मनुष्याच्या आत्म्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या प्राच्य देशांतल्या विचारवंत पुरुषा-पुढें मोठा प्रश्न उभा आहे. आपल्याहून ज्यांचीं ध्येयें अगदीं भिन्न आहेत अशा परकीयांनीं आपणावर लादलेल्या अटी बिनहरकत मान्य करणें हें आळसाचें आणि दुर्बलतेचें लक्षण आहे. आपला इतिहास जेणें-करून पूर्णत्वाला जाईल अशा दिशेनें जगांतल्या मोठ्या सत्तांचें स्वरूप पालटण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे. ”

यांत आखलेला ध्येयवाद आजच काय कायमचाच ताजा राहणारा आहे. प्रत्यक्ष राजकारणांत रवीन्द्रांनीं भाग घेतला नाहीं. बंगाल प्रांतिक परिषदेचें अध्यक्षपद एकदां त्यांनीं भूषविलें होतें. पण पुढें ही भूमिका त्यांनीं क्वचितच केली. राष्ट्रकारणांत त्यांचा भर ज्ञानयोगावर मुख्यतः होता. मातृभूमीवर त्यांचें अपार प्रेम होतें. “ माझा भारत कितीहि

कंगाल, दुःखपूर्ण असला तरी तो मला प्रिय आहे. देवानें मला येथेंच पुनः-पुनः जन्माला घालावें. " असें ते म्हणत. या भारताची त्यांनीं आपल्या अलौकिक प्रतिभेनें महनीय सेवा केली. भारताचा राष्ट्रवाद सात्त्विक झाला, जगच्छांतीचा तो प्रचारक बनला, स्वतंत्र भारताकडे जगांतील राष्ट्रें दलितांचा कैवारी म्हणून पाहूं लागलीं. या सर्व वैभवाचें बरेंच श्रेय रवीन्द्रांनीं दिलेल्या उदार राष्ट्रवादाच्या शिकवणीलाच द्यावें लागेल.

★

# शांतिनिकेतन

**" निसर्गाची हांक इतकी मोहक असते कीं, तिच्याबरोबर माणसाला धांवत जाण्याची इच्छा झालीच पाहिजे. आमच्या सुट्या आम्ही सृष्टीच्या इच्छेवर अवलंबून ठेविल्या. आकाश ढगाळलें, विजा चमकूं लागल्या कीं आम्ही पुस्तकें मिटून निघून जातों. पशु, पक्षी, लता-वृक्ष यांच्यापासून दूर पळणें हा रानटीपणा आहे. माझ्या संस्थेंत कुणालाहि मज्जाव नाहीं."**

रवीन्द्र नवभारताचीं जीं स्वप्नें पहात होते तीं केवळ कल्पनेंत ठेवायला ते तयार नव्हते. तीं त्यांना प्रत्यक्षांत आणायचीं होतीं. आणि तीं प्रत्यक्षांत आणायचीं म्हणजे ज्यांच्या हातीं नवभारत जाणार त्या विद्यार्थ्यांना तयार करायचें; त्यांचा अंतरात्मा विकसित करायचा; त्यांच्या बुद्धीची मशागत करायची. चालू शिक्षण–पद्धतींत तें शक्य नव्हतें. कारण भारताची मनोरचना लक्षांत घेऊन ती शिक्षणपद्धति आखलेली नव्हती. भारताचा आत्मा खची करायचाच तिचा उद्देश होता. म्हणून रवीन्द्रांनीं आपली स्वतंत्र शिक्षणपद्धति काढली.

एकान्तवास हा एक अवर्णनीय अनुभव आहे. वृक्षवल्ली आणि वनचरें यांना सोयरीं मानून आकाशाच्या विस्तीर्ण छताखालीं ज्यांनीं विजनवासाचें सुख भोगलें त्याच संतांना देवाचा साक्षात्कार झाला. जगाच्या धकाधकींत माणूस सतत बहिर्मुख असतो. मनाचीं कवाडें बंद करुन अंतर्मुख झाल्या-

शिवाय माणसाला हृदयींच्या तळींचा दैवी अंतर्नाद कधींच ऐकूं येणार नाहीं. ‘ अरतिर्जनसंसदि ’ म्हणजे जनसमूहाबद्दल एक प्रकारची विरक्ति हा ज्ञानी माणसाचा एक गुण भगवद्गीतेनें सांगितला आहे. माणसाचें मन एकाग्र होऊन तें एखाद्या उच्च कल्पनेवर स्थिर झाल्याशिवाय माणसाची बुद्धि आणि प्रतिभा पूर्ण विकसित होणार नाहीं. विद्या काय किंवा ईश्वरोपासना काय एकान्तांतच केली तर परिणामकारक होते. निसर्गाच्या सान्निध्याचा परिणाम मनुष्यावर जादूप्रमाणें होतो. ‘ शांतिनिकेतना ’ची कल्पना याच पायावर आधारलेली आहे.

या कल्पनेचें स्पष्टीकरण करतांना रवीन्द्रांनीं म्हटलें आहे :

“ भारतामध्यें थोर थोर गुरूंचीं अरण्यांत विद्याभवनें असत. त्या गुरुकुलांची स्मृति आपणांला आजहि होते. हीं गुरुकुलें आजच्या अर्थानें मठ किंवा पाठशाळा नव्हत्या. हीं मोठालीं कुटुंबें होतीं आणि परमेश्वराचें रूप कळून त्यायोगें आत्मज्ञान करून घेतलें जाई. हीं गुरुकुलें समाजापासून लांब असलीं तरी सूर्य दूर राहून ग्रहगोलांना उजेड व जीवन देतो तद्वत् तीं समाजाला चैतन्य देत. गृहस्थाश्रमांत पदार्पण करण्यापूर्वीं येथें मुलांना शाश्वत जीवनाचें ज्ञान मिळत असे.

“ अशा रीतीनें प्राचीन भारतांत शाळा हें जीवन-शिक्षणाचें केंद्र होतें. तेथें मठाचा रुक्षपणा नव्हता किंवा केवळ पुस्तकी विद्वत्तेचें वातावरण नव्हतें. त्या ठिकाणीं चैतन्यमय आणि स्फूर्तिदायक घराची शोभा होती. मुलें गुरांना कुरणांत चरायला नेत, सर्पण गोळा करून आणीत, कंदमुळें जमवीत, आणि प्राणिमात्रांविषयींचें प्रेम वाढवीत. गुरूच्या आत्मिक विकासाबरोबरच ते आपली उन्नति करून घेत. याचें कारण या गुरुकुलांचें उद्दिष्ट केवळ ज्ञानदान हें नव्हतें. परमेश्वराच्या सान्निध्यांत राहूं इच्छिणाऱ्यांना तेथें आसरा दिला जाई....शिष्य गुरूच्या मुलांप्रमाणें त्याच्या झोपडींत राहत. गुरु स्वत: साधेपणानें राहून आपलें अध्ययन करी आणि शिष्यांना त्यांच्या ज्ञानोपासनेंत मदत करी. हें काम व्यवसाय म्हणून नव्हे तर आपल्या जीवनाचा एक भाग म्हणून तो पत्करीत असे.”

हा रवीन्द्रांचा आदर्श होता. दगडी भिंतींत आणि कातडी पुठ्याच्या पुस्तकांत सरस्वती देवी बंदिस्त आहे, तिला निसर्गाच्या हिरव्या गालिच्या-

वर वृक्षांखालीं सिंहासन घालून बसवावें हा रवीन्द्रनाथांचा हेतु होता. मुलांच्या शिक्षणांत स्वयंस्फूर्तीला प्राधान्य पाहिजे. शाळेच्या कोंडवाड्यांत त्यांना कोंडून ठेवल्यानें तीं निरुत्साह होतात. मुलांना सक्तीनें शिक्षण देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे सुंदर फुलांवर गारांची वृष्टि करण्यासारखें आहे, असें रवीन्द्रांचें म्हणणें होतें.

आज आपल्या शालेय जीवनांत पुष्कळच स्वतंत्रता आली आहे. मुलांच्या उपक्रमशीलतेला आज किती तरी प्राधान्य देण्यांत येतें. पण रवीन्द्रांचा लहानपणीं तशी स्थिति नव्हती. संध्याकाळीं गच्चीवर उभें राहून बालरवीन्द्र पश्चिमेकडील सोनेरी तांबूस रंग किंवा भराऱ्या मारणारे पक्ष्यांचे थवे पाहण्यांत दंग असतांना एकदम मास्तर उगवायचे ! तल्लीनपणा भंग व्हायचा. मास्तर या व्यक्तीबद्दल रवीन्द्रांना तेव्हांपासून आठी बसली. तेराव्या वर्षापासूनच त्यांनीं शाळा सोडली. आणि शांति-निकेतनची स्थापना करतांना असे सारे अनुभव लक्षांत घेऊन आपल्या संस्थेची रवीन्द्रांनीं उभारणी केली. विशेषतः निसर्गाचें सान्निध्य आणि अंतःस्फूर्ति यांवर त्यांनीं विशेष भर दिला. आणि या कामीं त्यांच्या थोर परंपरेनें त्यांच्यासाठीं जणूं तयारीच करून ठेवली होती.

रवीन्द्रांचे वडील महर्षि देवेंद्रनाथ हे विरागी आणि साधुशील असे पुरुष होते. 'सुखालागिं आरण्य सेवीत जावें' अशी त्यांची वृत्ति असे. ते हिमालयांत साधनेसाठीं जाऊन बसले. तेथेंच आमरण राहण्याचा त्यांचा विचार होता. त्यांनीं गंगेचा ओघ हिमालयांतून खालीं जातांना पहिला. देवेंद्रनाथांनी विचार केला कीं, गंगामाई एवढी पवित्र असतांना ती खालीं कां बरें जात आहे ? केवळ लोकांचा उद्धार करण्याकरितां. आपणहि या ठिकाणीं न राहतां खालीं लोकसेवेसाठीं गेलें पाहिजे असें म्हणून ते परत संसारांत आले. पण तरीहि त्यांचें मन शहरांत फारसें रमेना. विजनवासाची विलक्षण ओढ त्यांना लागली आणि त्यांनीं असें ठरविलें कीं, कलकत्त्या-जवळच एखादें निवांत विश्रांतिस्थान तयार करावें. म्हणून इ. स. १८६३ मध्यें म्हणजे रवीन्द्रांच्या जन्मानंतर दोन वर्षांनीं, त्यांनीं कलकत्त्यापासून ९० मैल पश्चिमेस बोलपूर येथें जमीन खरेदी केली. ही जमीन अगदी पडीक होती, परंतु महर्षींच्या दिव्य सान्निध्यानें थोड्याच काळानें तिला सुंदर

रूप आलें. महर्षींनीं तिथें आंबे आणि नारळ यांचीं झाडें लाविलीं आणि लहानशी बाग तयार केली. तसेंच एक घर आणि देऊळहि बांधलें. महर्षींना या ठिकाणीं पाहिजे असलेली मनःशांति मिळाली आणि म्हणूनच या जागेला त्यांनीं 'शांतिनिकेतन' हें नांव ठेविलें. कांहीं दिवसांनीं त्यांनीं हा आश्रम लोकांकरितां खुला केला. मुमुक्षूंनीं येथें येऊन धर्मसाधना करावी अशी महर्षींची इच्छा होती. पण शहरापासून जरा आडबाजूस हें ठिकाण असल्यानें इकडे माणसें फारशीं आकर्षित झालीं नाहींत. आणि हें ठिकाण १९०१ पर्यंत कांहींसें अज्ञातच राहिलें. १९०१ मध्यें या ठिकाणाच्या प्रसिद्धीचा काळ सुरू झाला. कवि या नात्यानें रवीन्द्र विख्यात झाले होते. आपल्या पित्याजवळ या ठिकाणीं एक विद्यालय चालविण्याची परवानगी रवीन्द्रांनीं मागितली आणि ती महर्षींनीं आनंदानें दिली. येथूनच शांतिनिकेतनच्या नव्या आणि आधुनिक पर्वास सुरुवात झाली.

ही शाळा झाडाखालीं भरत असे. पहिल्यानें या शाळेंत पांचच विद्यार्थी होते. त्यांपैकीं दोन रवीन्द्रांचीं मुलेंच होतीं ! मुलांच्या हृदयांत शिरण्याची कला रवीन्द्रांना जन्मतःच अवगत असल्यामुळें ते मुलांत लवकरच लोकप्रिय झाले. निसर्गाच्या ऐन मध्यावर वर्ग भरलेला आणि रवीन्द्रांच्यासारखा अद्वितीय प्रतिभेचा गुरु. तेव्हां त्या अध्ययनांत केवढें अमृत भरलें असेल याची कल्पनाच करावी. फुलें, फळें, तारका यांचें निरीक्षण हा शिक्षणाचाच भाग होता. आकाश मेघानें भरून आलें कीं, वर्ग बंद करून शिक्षक निघून जात. झाडें, पशु-पक्षी हे तेथें मुलांचे मित्र होते. रवीन्द्र कविता रचून मुलांना म्हणून दाखवीत. रामायण—महाभारतांतील सुंदर कथा सांगत. मुलें गाणीं म्हणत. नाट्यप्रयोग करून दाखवीत. अशा रीतीनें एका काव्यमय दिव्य वातावरणांत या शाळेचा विकास होऊं लागला.

शांतिनिकेतनमध्यें जी आदर्श शिक्षणपद्धति गुरुदेवांनीं सुरू केली त्यांतलीं कांहीं सूत्रें अशीं होतीं :

( १ ) निसर्गाशीं एकरूप होणें हें मुलांचें पहिलें कर्तव्य. पंचमहाभूतांशीं समरस व्हायला त्यांनीं शिकलें पाहिजे.

( २ ) साधी राहणी हा विद्यार्थिधर्म आहे. त्याखेरीज जगाचें आणि जीवनाचें सत्यदर्शन होणार नाहीं.

( ३ ) शाळेची जागा प्रसन्न अशी मोकळ्या मैदानांत असावी. मुलांनीं संयम आणि स्वावलंबन अंगीं बाणवलें पाहिजे.

( ४ ) शब्दांप्रमाणेंच स्वर, रेषा, रंग, अंगविक्षेप यांच्यांतहि त्यांनीं निपुणता मिळविली पाहिजे. कारण शब्दांप्रमाणेंच हीं ज्ञानाचीं आणि विकासाचीं साधनें आहेत.

( ५ ) शिक्षण हें समाजाशीं संबंधित असलें पाहिजे. मुलांनीं आपल्या भोंवतालच्या वातारणांत हिंडावें, तेथील खेडुतांची आर्थिक स्थिति समजून घ्यावी. त्यांना आपली उन्नति करण्यास मदत करावी. सुधारणा आणि विज्ञान त्यांना शिकवावें. या सर्व कामांत ग्रामीण मंडळी, शिक्षक, आणि विद्यार्थी यांची एकजूट झाली पाहिजे.

( ६ ) शरीरश्रम हें एक महत्त्वाचें जीवनमूल्य आहे. शेतकरी आणि मजूर यांचीं कामें शिकून त्यांच्याशीं एकरूप होण्यास विद्यार्थी आणि शिक्षक यांनीं शिकलें पाहिजे. कारण असें केल्यानेंच त्यांच्या जीवनांत खऱ्या अर्थानें प्रवेश करतां येईल.

अशा तत्त्वावर शांतिनिकेनमधील विद्यार्थिजीवन आधारलेलें होतें. रवीन्द्रांना लहानपणीं जे कटु अनुभव आले त्याचप्रमाणें त्यांच्या थोर पिताजींनीं त्यांना जें शिकविलें, वेदकालीन आश्रमांत त्यांच्या दिव्य प्रतिभेनें जें पाहिलें त्या सर्वांचा परिपाक त्यांच्या शांतिनिकेन येथील शिक्षण-पद्धतींत उतरला आहे.

१९१४ मध्यें युरोपहून परत आल्यानंतर रवीन्द्रनाथांना असें वाटूं लागलें कीं, आपल्यावर एक मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. नोबेल पारितोषिक मिळाल्यामुळें रवीन्द्र जगन्मान्य झाले. आणि साहजिकच या संस्थेच्या मर्यादा संकुचित ठेवणें त्यांना चुकीचें वाटूं लागलें. सर्व जगांतील विद्यार्थ्यांना या संस्थेचीं दारें उघडीं करणें योग्य ठरेल असें त्यांच्या मनानें घेतलें. या वेळीं दीनबंधू अँड्र्यूज हे रवीन्द्रांबरोबर आले होते. तसेंच मिस्टर पारसन हेहि त्यांच्याबरोबर होते. त्यांनीं रवीन्द्रांचें ध्येय साकार करण्यास फार मदत केली. सन १९२१ सालीं 'शांतिनिकेतन' या विद्यालयाचें 'विश्वभारती' विद्यापीठांत रूपांतर झालें. या विद्यापीठाच्या उद्देशपत्रिकेंत मुख्यतः पुढील गोष्टी होत्या :

पौर्वात्य देशांत ज्या भिन्न संस्कृति आहेत त्या त्यांतील आंतरिक एकतेच्या पायांवर निकट आणणें. या एकतेच्या आधारेंच पाश्चात्त्य सुधारणेचा विचार करणें. पूर्व-पश्चिम यांचा अखेर संगम व्हावा आणि जागतिक शांतता ही या दोन गोलार्धांतील कल्पनांचा विनिमय करून प्रस्थापित व्हावी यासाठीं झटणें." असें विश्वभारतीचें विशाल ध्येय होतें. साम्राज्यवादाच्या मदानें धुंद होऊन किपलिंगसारखे कवि असें म्हणत कीं, "पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम. या दोघींचें मीलन होणें शक्य नाहीं." रवीन्द्रांची विश्वभारती ही असल्या क्षुद्र कल्पनांवर उतारा म्हणून जन्माला आली. सर्व मानवरूपी पांखरांचें जग हें एकच घरटें आहे. ( यत्र विश्व भवत्येकनीडम् ) या विश्व-भारतीच्या ध्येयवाक्यांत तिच्या उंचीची आणि खोलींचीहि कल्पना येईल.

विश्वभारती विद्यापीठ हें १८६० च्या २१ व्या कायद्याअन्वयें सरकारांत नोंदण्यांत आलें. रवीन्द्र हे विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष होते. याच वर्षीं कला आणि विद्या यांच्या अनेक शाखा तेथें सुरु झाल्या. वैदिक अभ्यासाबरोबर बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाला. तिबेटी आणि चिनी भाषांनाहि स्थान मिळालें. हैद्राबादच्या निजामांनी देणगी देऊन इस्लामी संस्कृतीची एक स्वतंत्र शाखा काढण्यास मदत केली. मुंबईच्या कांहीं पारशी धनिकांनीं फंड जमा करुन झरतुष्ट्री धर्माच्या अभ्यासाची सोय करून दिली. अशा रीतीनें एक एक पाकळी उमलत जाऊन हें जागतिक संस्कृतीचें कमल पूर्ण विकसित झालें.

मुलांच्याबरोबर मुलींचीहि संख्या वाढूं लागली. मिश्र शिक्षणाबद्दल रवीन्द्रांचीं मतें ठाम होतीं. भारतीय नारीचा आदर्श त्यांना शिरोधार्य होता आणि त्यांच्या कथा-कवितांतून त्यांचें दिव्य चित्रण त्यांनीं अनेक ठिकाणीं केलें आहे. पण मानवी संस्कृति ही पुरुषप्रधान झाल्यामुळें युद्ध, स्पर्धा, द्वेष यांनींच इतिहास बरबटला आणि एके बाजूला लंबक तागला गेला. मानवी समाज विनाशाच्या कड्यावर येऊन ठेपला. याचें कारण पुरुषांचें संस्कृतीवर असलेलें प्रभुत्व होय. स्त्री ही अहिंसा, त्याग, सहकार्य इ. ची मूस असल्यानें तिनें संस्कृतीच्या बांधणींतला व संरक्षणांतला आपला वांटा उचलला पाहिजे. हें कर्तव्य तिनें केलें तरच मानवी संस्कृतीला समतोलपणा येईल आणि तिचा विनाश टळेल असा रवीन्द्रांचा दृष्टिकोण होता. म्हणूनच

शांतिनिकेतनांत मुलींना प्रथमपासूनच प्रवेश होता. इतकेंच नव्हे, तर मुला-मुलींनीं एकत्र अभ्यास करणें हेंहि एक शिक्षणाचेंच अंग होऊन राहिलें.

'शांतिनिकेतन'-सारख्या रमणीय तीर्थाचें वर्णन प्रसिद्ध वंगकवि व टीकाकार बुद्धदेव बसू यांच्या शब्दांत देणेंच योग्य ठरेल. बसू लिहितात :

" शांतिनिकेतननें एकप्रकारची समता निर्मिली आहे. शांतिनिकेतनांत जीवन व कला एकरूप झालीं आहेत. जीवनाचें ऐश्वर्य येथें पूर्ण रूपानें प्रकट झालें आहे. येथें गुणी जनांचा सन्मान स्वतःसिद्ध आहे. शांतिनिकेतननें एक प्रकारची समता निर्माण केली आहे.

" येथें सौंदर्य प्रीतीला नानाप्रकारांनीं उत्तेजन मिळत असतें. रोजच्या वापरण्यांतला जिन्नस सुंदर असावा; पण त्या सौंदर्याला आधार श्रीमंती नसावा. तो जिन्नस आपल्या आंतरिक प्रेरणेनें, सहजअभिरुचिसंपन्नतेनें, कलात्मक रीतीनें सुंदर असावा. असा जिन्नस विकत घ्यायचा नसतो, निर्माण करायचा असतो.

" शांतिनिकेतनांतल्या इमारती ठेंगण्या, खिडक्या ठेंगण्या, सामानसुमानहि ठेंगणें. इथल्या खिडक्यांची प्रशंसा मात्र शतमुखांनीं केली पाहिजे. इतकी उदार व मोकळीं गवाक्षें आमच्या देशांत दृष्टीला पडत नाहींत—चोरांची भीति नाहीं. त्यामुळें कड्या-कुलपांची कटकट नाहीं. हवेच्या येण्याजाण्याचा राजपथ नेहमींच खुला...निर्जन माळावरून नजर सरळ दौडत दौडत थेट निःसीमापर्यंत पोहोंचते आणि वाटतें, पृथ्वीचा शेवटचा प्रान्त हाच, या पलीकडे आणखी कांहीं नाहीं !

" इथली एकहि प्रयोजनीय वस्तु अशी नाहीं कीं जी सुंदर नाहीं. अगदीं क्षुल्लक वस्तूदेखील सुंदर. नुसती सुंदरच नव्हे तर अभिनव....प्रत्येक वस्तूला स्वतःचें असें व्यक्तिमत्त्व—वस्तुमत्व म्हणावें हवें तर—आहे. कोणांतहि फाफटपसारा नाहीं. स्वच्छ साधेपणा आहे. धनाढ्य विलासीपणाची भावना मुळींच नाहीं. या ठिकाणीं प्रत्येक वस्तूंत पूर्व आणि पश्चिम यांचें मीलन आढळतें. सामानसुमानाची चौकट विलायती पण रचना भारतीय पद्धतीची.

" या साऱ्या सामानसुमानांत 'आम्ही मोठे' ही भावना नाहीं, हीच मला सर्वांत आवडणारी गोष्ट होय. शांतिनिकेतनमधील फर्निचरची किंमत

रुपयांच्या मापानें ठरविण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. या फर्निचरच्या मागें जी सृजनशील बुद्धि आहे, जी कलाकृति आहे तीच मुळीं मोलाची आहे."

बुद्धदेवांनीं म्हटलें आहे कीं, फॅशनकडे लक्ष देऊन येथील फर्निचर केलेलें नसल्यानें तें जुनें होण्याची भीति नाहीं. काळ बदलला तरी त्याचें वैशिष्ट्य कायमच राहणार. रवीन्द्रांच्या सृजनशीलतेचा थोर प्रत्यय कणिकेपासून कादंबरीपर्यंत जसा येतो तसाच तो शांतिनिकेतनमधील कोपऱ्यापासून सर्व कल्पनेपर्यंत येतो.

विश्वभारतीच्या वैशिष्ट्याची माहिती हळूहळू सर्वत्र पसरली. देशोदेशींचे विद्वान्, नर्तक, चित्रकार, तत्त्वज्ञ, नेते या ठिकाणीं येऊं लागले. परकीय विद्यार्थीहि येथें येऊन राहूं लागले. हें विद्यादेवीचें एक प्रमुख तीर्थक्षेत्र बनलें. देश, वंश, वर्ण यांचा भेदाभेद न करतां विश्वात्मक आत्म्याशीं एकतानता प्राप्त करून घेण्याची साधना येथें केली जाते हा लौकिक जगाच्या कोनाकोपऱ्यांत गेला. एका फ्रेंच विद्वानानें लिहिलें, "आधुनिक पद्धतीनें माणसाचें मन सुबुद्ध, मनमिळाऊ, स्वतंत्र, उदार करण्याचा हा महान् प्रयोग आहे." येथील मोकळ्या मैदानांतलें वर्ग आणि गुरुशिष्यांचे खेळीमेळीचे संबंध यांविषयीं कौतुकाचे उद्गार अनेक परकीय प्रवाशांनीं काढले आहेत.

ही संस्था सुरू केल्यानंतर सुमारें वीस वर्षांनीं रवीन्द्रांनीं झालेल्या कामाचा आढावा घेतला. तेव्हां ते म्हणाले,

"मला एवढें समाधान वाटतें कीं गेलीं तीस वर्षे ज्या ध्येयानें धुंद होऊन मीं शिक्षणकार्य केलें त्या ध्येयाचा आराखडा मला जगापुढें मांडतां आला. ध्येयदेवतेचा एकनिष्ठ भक्त या नात्यानें मला माझें उद्दिष्ट जगाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विश्वबंधुत्व हें माझ्या शिक्षण-संस्थेचें ध्येय आहे. निरनिराळ्या देशांचे आणि निरनिराळ्या संस्कृतींचे लोक ज्या ठिकाणीं एकत्र येऊन विचार करूं शकतील असें माझ्या शिक्षण-संस्थेसारखें केंद्र जगांत दुसरीकडे कुठें सांपडणार नाहीं. मानवजातीचें आध्यात्मिक ऐक्य हें माझें ध्येय आहे. जगानें ही



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ३/२५४२ दि.

माझी सेवा मान्य करावी. जगाला जर माझें ध्येय मान्य झालें तर माझें जीवितकार्य सफल झालें असें मी समजेन. ”

ध्येय उच्च असलें आणि तें उच्चारणारा लोकोत्तर पुरुष असला तरी त्यागाचें खतपाणी घातल्याशिवाय ध्येयबीजाचा वृक्ष कधींच होत नाहीं. रवीन्द्रांनीं या संस्थेसाठीं अक्षरशः हाडाचीं काडें केलीं. भारतांत आणि परदेशीं दौरे काढले. अध्यापनापासून प्रार्थना चालविण्यापर्यंत सर्व कांहीं जातीनें करून उत्तम परंपरा घालून दिल्या. चाकोरीबाहेर ज्यांना विचार करतां येत नाहीं तेच समाजशिक्षणाचे बहुधा धुरीण असतात ! अशांना रवीन्द्रांची कल्पना अशक्य व विक्षिप्त वाटली. यांत काय नवल ? त्यांच्या विरोधाचा परिहार करणें हाहि उद्योग रवीन्द्रांना करावा लागला. ‘शांतिनिकेतन’-मधील शिक्षकांशींहि त्यांचीं भांडणें होत. कारण रवीन्द्रांचा सर्वस्वीं स्वतंत्र दृष्टिकोन शिक्षकांना एकदम पचत नसे. एकदां कांहीं मुलें झाडावर बसून अभ्यास करीत होतीं. शिक्षक त्यांना दटावूं लागले. तेव्हां रवीन्द्रांनीं पुढें होऊन विद्यार्थ्यांची बाजू घेतली आणि निसर्गाचें सान्निध्य हें जर आपलें ध्येय आहे, तर झाडावर चढून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचें चुकलें कुठें ? असा प्रश्न करून शिक्षकांना निरुत्तर केलें. बंधनांत स्वातंत्र्य आणि विविधतेंत एकता पाहणाऱ्या रवीन्द्रांनीं आत्मिक स्वातंत्र्य कायम राखून समाजोन्मुख कसें व्हावें हें प्रत्येक विद्यार्थ्याला शिकविलें. त्यांनीं शांतिनिकेतनची वडिलोपार्जित जमीन व तीवरील मालमत्ता यांवर तर उदक सोडलेंच, पण नोबेल पारितोषिकाची मिळालेली रक्कम आणि आपल्या इंग्रजी व बंगाली पुस्तकांचें उत्पन्न व अग्रहक्क शांतिनिकेतनला देऊन टाकले. अशा रीतीनें हें अलौकिक संस्कृति-मंदिर आज भारताचें भूषण म्हणून झळकत आहे. “ ज्यानें शांतिनिकेतन पाहिलें नाहीं त्यानें भारत पाहिला नाहीं ” हे पं. जवाहरलाल नेहरू यांचे उद्गार या साऱ्या वर्णनावरून कुणाला अतिशयोक्तीचे खास वाटणार नाहींत.

शांतिनिकेतनलाच एक शाखा फुटून तिला पुढें स्वतंत्र रूप आलें. या संस्थेचें नांव ‘ श्रीनिकेतन ’. शांतिनिकेतनमधील विद्यार्थ्यांनीं शेजारच्या खेड्यांत जावें आणि साक्षरता-प्रसार करावा असा कार्यक्रम होता. आपला भारत देश खेड्यांचा बनलेला आहे. खेड्यांची उन्नति केल्याशिवाय देशाचा

उद्धार होणें शक्य नाहीं हें गांधीजींप्रमाणें रवीन्द्रांचेंहि ठाम मत होतें. आधुनिक सुधारणांनीं खेड्यांतलें शांत, सात्त्विक, सहकार्यपूर्ण जीवन नष्ट केलें याचें त्यांना वैषम्य वाटे. म्हणूनच ग्रामसुधारणा व ग्रामसंघटना या कार्याला विद्यार्थ्यांनीं सर्वस्व वाहिलें पाहिजे अशी रवीन्द्रांची शिकवण होती.

पण ग्रामसुधारणा हें रवीन्द्रांनीं केवळ राष्ट्रीय चळवळीचें अंग म्हणून पत्करलें होतें असें नाहीं. त्यांच्या जीवनांत कप्पे असे त्यांनीं ठेविलेच नव्हते. त्यांची एक खास जीवननिष्ठा होती आणि साहित्य, राजकारण, शिक्षण इ० क्षेत्रांत अगदीं क्षुद्र तपशीलावरहि त्या निष्ठेची मुद्रा उमटावी असा त्यांनीं आमरण प्रयत्न केला. रवीन्द्रांना आपल्या जमीनजुमल्याची व्यवस्था पाहण्याच्या निमित्तानें ग्रामीण भागांत राहण्याचा व फिरण्याचा योग तारुण्यांतच आला. खेड्यांतील जीवनाची त्यांच्यावर त्याच वेळीं मोहिनी पडली होती. डोंगरपठार किंवा समुद्रकिनारा त्यांना विशेष पसंत असे. त्या वातावरणाशीं आणि तेथील समाजाशीं ते एकरूप होऊन जात. एके ठिकाणीं ते म्हणतात,

"मी जितका अधिक काळ एकान्तांत राहिलों, नदीकांठीं मोकळ्या मैदानावर जितके अधिक दिवस घालविले तितकें मला अधिकाधिक समजूं लागलें कीं, दररोजचीं साधीं व सरळ कर्तव्यें करण्यांत खरा जीवनानंद आहे."

गाझीपुरला आपल्या मळ्यांत राहत असतांना दारिद्र्यानें पीडिलेले ते शेतकरी पाहून रवीन्द्रांचें हृदय भरून येई. सोशिक, आज्ञाधारक आणि कुटुंबवत्सल शेतकऱ्यांच्या जीवनांत त्यांना अपूर्व असा कांहीं आनंद आढळून आला. नियतीच्या या लेंकरांचें भरणपोषण आपण केलें पाहिजे. त्यांनीं त्या वेळच्या एका पत्रांत लिहिलें आहे :

"या खेडुतांबद्दल मला फार जिव्हाळा आहे...जेव्हां धरित्रीमातेचे स्तन शुष्क होऊन यांना पोषण मिळत नाहीं तेव्हां काय करावें या विवंचनेंत तीं पडतात. पण त्यांची भूक तृप्त झाली कीं पूर्वीचे सर्व क्लेश ते विसरतात."

रवीन्द्रांना खेडुतांबद्दल वाटणाऱ्या याच जिव्हाळ्यांतून 'श्रीनिकेतन' जन्माला आलें आहे. एका आदर्श खेड्याची रचना त्यांनीं केली. 'शांतिनिकेतन'जवळ सुरुल येथें लॉर्ड सिंह यांची जमीन होती. ती विकत

घेऊन रवीन्द्रनाथांनीं तेथें 'श्रीनिकेतन' स्थापन केलें. या आल्मूहर्स्ट नांवाच्या पाश्चात्य कार्यकर्त्यांचें त्यांना फार साह्य झालें. हे साहेब ग्रामसुधारणेच्या ध्येयानें अगदीं वेडे झाले होते. त्यांना रवीन्द्रांनीं कार्यक्षेत्र मिळवून दिलें. "या ठिकाणीं विद्यार्थी प्रयोग करतील आणि त्याचें फल शेतकऱ्यांच्या पदरांत टाकतील. शेती, कालवे, पशुपालन हीं सर्व कामें अति आधुनिक शास्त्रीय तंत्रानें केलीं जातील. " असें रवीन्द्रांनीं प्रथमच सांगितलें. रवीन्द्रांची ही कल्पना त्या काळीं केवळ अपूर्व होती. आज ग्रामसुधारणेचा कार्यक्रम चोहींकडे सुरू असून ' खेड्याकडे चला ' असा संदेश अहोरात्र कानीं पडत असतो. पण विज्ञानसंस्कृतीनें ज्या वेळीं शहराची मयसृष्टि नुकतीच निर्माण करण्याचें काम आरंभिलें होतें त्या वेळीं भारताचा आत्मा खेड्यांत आहे हें ओळखून रवीन्द्रांनीं ' श्रीनिकेतन ' ची स्थापना केली. यांत त्यांचें द्रष्टेपण दिसून येत नाहीं काय ? श्रीमंत आणि सुखवस्तू लोकांतला आणि अशाच लोकांसाठीं हा महाकवि होता असा आक्षेप घेणारांनीं हें ' श्रीनिकेतन '-पर्व नीट अभ्यासलें तर हा संकुचित विचार ते खासच टाकून देतील.

★

# तत्त्वज्ञान

**" तुझी लीला वर्णन करण्यास मी असमर्थ आहें. तुझी दानशूरता अपार आहे. हे परमेश्वरा ! या लहानशा हातांत तुझा प्रसाद मावेल तरी कसा ? ही कायारूपी नौका जीर्ण झाली कीं रिकामी करून ती पुनः दुरुस्त करतोस. तींत नवें चैतन्य भरतोस...अनेक युगें लोटलीं. असंख्य जन्म झाले. तुझें दातृत्व अखंड चालूच आहे."**

यापुढें रवीन्द्रांच्या साहित्याचें नंदनवन पाह्यला जायचें. पण त्याच्यापूर्वी त्यांचें तत्त्वज्ञान समजून घेतलें पाहिजे. कारण रवीन्द्रांनीं वाङ्मय लिहिलें तें आनंदाइतकेंच उद्‌बोधनाकरितां लिहिलें. सर्व वाङ्मयांत एक सूर गुप्त—प्रकट असा वहात आहे. जगाचीं सुखदु:खें रंगवितांना रवीन्द्र जगाशीं संपूर्ण मिळून जातात. पण त्यांच्या तत्त्वज्ञानाचें सूत्र सुटत नाहीं. तें समजून घेतलें तरच त्यांच्या वाङ्मयाचें रसग्रहण मनाची तृप्ति होण्याइतकें करतां येईल. आणि त्यांचें तत्त्वज्ञान कठीणहि नाहीं. त्याची अभिव्यक्ति गूढ असेल पण मूळ आशय स्वच्छ आहे.

श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या जन्मशताब्दीच्या समारोहांत अध्यक्ष या नात्यानें भाषण करतांना रवीन्द्रनाथ म्हणाले होते, ' मी कवि आहें; म्हणजेच माणसें आणि परमेश्वरनिर्मित प्रत्येक पदार्थ यांचा चहाता आहें. '

( I am a poet, a lover of men and creation. ) रवीन्द्रांच्या एकंदर तत्त्वज्ञानाचें रहस्य एका वाक्यांत आलें आहे असें म्हटल्यास चूक होणार नाहीं. रवीन्द्रांचें मानवांवर प्रेम होतें, निसर्गावर होतें, किंबहुना प्रेम हाच त्यांचा स्थायीभाव होता. आपल्या एका गीतांत ते म्हणतात कीं, " हे परमेश्वरा, माझ्यामध्यें तुझी लीला प्रगट व्हावी यासाठींच मी येथें आलों आहें. " उपनिषदाच्या तत्त्वज्ञानाची त्यांच्यावर मोहिनी होती. जग हें आनंदरूप आहे, ही त्यांची श्रद्धा होती. आणि म्हणूनच जरी जगांतील अन्यायाचीं अथवा दुःखाचीं चित्रें त्यांनीं रंगवलीं तरी त्यांना संशयवादानें कधीं पछाडलें नाहीं. आनंदवादी तत्त्वज्ञ हा वास्तवाला पराङ्मुख असलाच पाहिजे असें नाहीं. तो वस्तुस्थितीचा पूर्ण ज्ञाता असेल, जगांतील दैन्य आणि कुरूपता त्याच्या परिचयाचीं असतील. परंतु त्याच्याहून पलीकडे असें एक सत्तत्त्व आहे. तें अविनाशी आणि आनंदमय आहे असा गाढ विश्वास त्याला असतो. तसाच रवीन्द्रनाथांना होता. ते म्हणत, " जगाच्या या आनंदयज्ञांत मला निमंत्रण आलें आहे. माझें जीवन धन्य झालें. "

परंतु रवीन्द्रांचा आनंदवाद हा भोळसट नव्हता. म्हणजेच त्याला पलायनवादाची कळा आली नव्हती. जगांतलें दुःख पहायला नको म्हणून त्यापासून पळून जाऊन आपलेंच एक कृत्रिम व सुंदर जग तयार करणें आणि त्यांत स्वतःला विसरून जाणें ही पलायनवादी वृत्ति आहे. कित्येकदां ही विरक्तीच्या गोंडस नांवाखालीं खपली जाते, तर कित्येकदां सौंदर्यवाद हें गोंडस रूप घेऊन प्रकट होतें. पण खरा सौंदर्यवाद हा या वृत्तीपासून फार भिन्न आहे. रवीन्द्रांनीं वास्तव जगापासून पळून जाण्याचा उपदेश केला नाहीं अथवा कृत्रिम सुंदरतेच्या हस्तिदंती मनोऱ्यांतहि ते बसून राहिले नाहींत. बुद्धीला अगम्य अशा प्रदेशापर्यंत त्यांचें मन पोहोंचलें. पण त्याचबरोबर सामान्य माणसाच्या सुखदुःखाशींहि ते समरस झाले. दुःखापासून पळून जाऊन नव्हे, तर दुःखाचें आवरण दूर करून आनंद-शोध करण्याचें त्यांचें तंत्र त्यांनीं जगाला शिकविलें. रोजचें जग आणि आनंद यांचा त्यांनीं मेळ घातला.

रवीन्द्रांचा आनंदवाद केवळ दुःख सहन करायला सांगणारा नव्हता. दुःखाचें विषहि अमृतमय कसें होईल ही किमया रवीन्द्रांनीं शोधून

काढली. दुःखावांचून धर्माचा साक्षात्कार होणें अशक्य हा रवीन्द्रांचा ठाम सिद्धान्त होता. दुःख ही साधना आहे. दुःखाच्या अग्नींत व्यक्तित्वांतलें हीण जळून जातें. आणि सत्त्वगुणाचे सुवर्णकण अधिक तेजस्वी होतात. 'शाकुंतल 'वरील आपल्या अप्रतिम निबंधांत या साधनेची महती रवीन्द्रांनीं फार उत्तम रीतीनें दाखविली आहे. पहिल्या अंकांत ज्या वेळीं दुष्यन्त–शकुन्तला भेटतात तेव्हां प्रथमदर्शनीं जडलेलें त्यांचें प्रेम उत्कट असलें तरी शारीरिक पातळीवरचें असतें. त्यांत सौन्दर्य आहे, पण तें मादक आहे. यानंतर विरह, शाप, त्याग असल्या क्लेशपरंपरेंतून शकुन्तलेला जावें लागतें. दुष्यन्तहि पुढें पश्चात्तप्त होतो. आणि नंतर या युग्माचें जें मीलन होतें तें फार उच्च पातळीवर होतें. त्यांत वासना जळून गेली आहे. आतां या प्रेमाला विस्मृतीची किंवा नाशाची भीति नाहीं. दुःख हें माणसाच्या जागृतीची पातळी निश्चित वाढवितें. मात्र दुःखाचा आघात श्रद्धेला प्राणघातक ठरतां कामा नये. आणि म्हणूनच रवीन्द्र परमेश्वराला म्हणतात,

"संकटामध्यें माझें रक्षण कर अशी मी तुला प्रार्थना करीत नाहीं. मात्र, संकट आलें असतां मी खचून न जावें एवढेंच माझें तुझ्याजवळ मागणें आहे. दुःखावर मी विजय मिळवावा अशी शक्ति मला दे."

जीवात्मा आणि परमात्मा यांच्या नात्यांसंबंधीं रवीन्द्रांची खास अशी मधुर उपपत्ति होती. मनुष्य हा प्राणी परमात्म्याचा अंश आहे ही श्रद्धा तर प्राचीनकाळापासूनची आहे. पण एकाच ब्रह्मानें अनंत रूपें धारण केलीं या ऋषिकल्पनेला रवीन्द्रांनीं फारच वेगळें सुदर रूप दिलें. परमात्मा हाहि भक्ताच्या सहवासासाठीं आतुर झाला आहे. भक्ताच्या जीवनांत एकरूप होऊन विविध लीला करण्याचा छंदच आहे त्याला. भक्त आपल्या तोंडाला बांसरी लावील तेव्हां त्यांतून सुंदर सुरावट काढणारा परमात्माच. भक्ताला विरहांत होरपळत ठेवणें हीहि त्याची लीलाच म्हणतां येईल. अशा विरहानें भक्ति तीव्र होते. पण भक्ताला भेटायला तोहि उत्सुक आहे. एका गीतांत रवीन्द्र म्हणतात,

"मला भेटण्यासाठीं तूं केव्हापासूनचा चालून येत आहेस. तुझे चंद्र आणि सूर्य तुला कोठवर झाकून ठेवतील ? किती तरी सकाळ सांज येऊन

गेल्या. तुझीं पावलें हळूंहळूं जवळ येतांना ऐकूं येतात आणि आतां तर तुझा दूत हळूच येऊन माझ्या हृदयांत सांगून गेला कीं आतां भेटण्याची वेळ जवळ आली आहे. चल तयार हो. ”

परमेश्वरी शक्ति माणसाला मधून मधून साक्षात्कार देत असते. माणसानें आपल्या जीवनांतील अगदीं विरळ असे येणारे आनंदाचे अनुभव नीट तपासून पाहिले तर त्याला ब्रह्मानंदाची उंची व स्वरूप यांचा अंदाज येण्यास अडचण पडूं नये. बुद्धानें अगदीं तारुण्याच्या आरंभीं जीवनसंग्राम पाहिला आणि खिन्न होऊन तो जंबू वृक्षाखालीं बसला. जगाविषयींच्या करुणेनें बुद्ध भारून गेला आणि कांहीं वेळानें त्याच्या हृदयांत अपूर्व आनंदाच्या ऊर्मि उठल्या. पुढें त्याला जो शाश्वत धर्म दिसला, त्याचा हा त्रुटित ओझरता साक्षात्कार होता. पुढें राजवाड्यांतून बाहेर पडल्यावर अनेक साधना व व्रतवैकल्यें त्यानें केलीं, पण त्यांच्या मर्यादा कळून तीं त्यानें सोडून दिलीं, कारण त्या सर्व तपस्येंत जंबू वृक्षाखालीं क्षणभर उपभोगलेला तो परमोच्च आनंद मिळत नाहीं याची जाणीव त्याला होई. रवीन्द्रांच्या अंतःकरणांतहि दिव्य प्रकाशाचा असा कवडसा क्वचित् पडून गेला. कारवार येथें आपल्या बंधूकडे ते आले असतां एकदां समुद्रकिनाऱ्यावर हिंडतांना सारी सृष्टि आपल्याशीं व आपण सृष्टीशीं एकरूप झाल्याचा भास त्यांना झाला. चराचरांत कांहीं एक सुसंगति आहे; एकत्व भरून राहिलें आहे असें त्यांना वाटूं लागलें. तेव्हां पासून त्यांच्या प्रतिभेला कांहीं वेगळेंच सौष्ठव व सामर्थ्य आलें. थोड्या प्रमाणांत हा अनुभव पुष्कळांना येतो. पण कित्येकदां हा साक्षात्कार माणूस नीट समजून घेत नाहीं. मुमुक्षूच्या अंतःकरणाच्या तारा विश्वशक्ति छेडून गेली हें त्याला मागून कळतें. हे मधुर भावाच्या रूपकांत रवीन्द्रांनीं काव्यमय भाषेनें वर्णिलें आहे :

“ तो जेव्हां जवळ येऊन बसला तेव्हां तूं जागी झाली नाहींस. हे हतभागिनी ! तुला कसली झोप लागली होती.

शांत नि स्तब्ध रात्रींच्या वेळीं तो आला. त्याच्या हातांत वीणा होती. याचें संगीत ऐकून मी जागी झालें नाहीं, पण माझें स्वप्न मात्र त्याच्या

गंभीर रागांनीं अगदीं गजबजून गेलें आणि सारें स्वप्न असाधारण सुखमय झालें......

माझ्या रात्री अशाच फुकट जातात. तो निकट असूनहि नसतो. त्याचें संगीत ऐकूं येतें, त्याचा सुगंध डोक्यांत भरतो. पण त्याच्या माळेचा स्पर्श माझ्या हृदयाला होत नाहीं!"

भक्त आणि भगवंत यांच्या मीलनाच्या आड माणसाचा अहंकार येतो. हेंहि रवीन्द्रांनीं एका समर्पक रूपकानें सांगितलें आहे. अभिसारिका आपल्या प्रियतमाला भेटायला निघाली. बरोबर कुणी तरी जणूं पाळत ठेवूनच येत आहे. कोण आहे हें? हा मानवी अहंकार. हाच जीवात्म्याची परमात्म्यांशीं गांठ पडूं देत नाहीं. 'नदी आणि किनारा' यांत रवीन्द्रांनीं हेंच कांहीं वेगळ्या पद्धतीनें सांगितलें आहे. आत्म्याचा अनंत ओघ पहिल्यापासून नदीसारखा अखंड वाहत आहे. पण 'अहं' किनाऱ्यामुळें या ओघाला शांतता-मर्यादितपणा येतो. जें विश्वव्यापी आहे तें संकुचित होतें. 'अहं' आत्म्याला म्हणतो, 'तूं वाढतां कामा नये, वाहतां कामा नये, घरादारांत, धनदौलतींत, मानापानांत गुंतून पड.' किनारा नदीचें साधन न होतां नदीच किनाऱ्याचें साधन होते. आत्मा 'अहं'च्या अधीन होतो. या 'अहं'चा विनाश करणें हाच मोक्ष. हें प्राचीन व सर्वधर्मसंमत तत्त्व रवीन्द्रांनीं आपल्या प्रतिभेनें अनेक दृष्टान्त-रूपकांनीं आपल्या वाङ्मयांत मांडलें आहे.

जग आनंदमय मानणाऱ्या या तत्त्वज्ञ कवीला मृत्यूचें भय नसावें हें उघडच आहे. मृत्यु म्हणजे जन्मान्तर किंवा पुनर्जन्म. स्तनपान करणाऱ्या बालकाचें तोंड ज्याप्रमाणें आई एका स्तनापासून काढून दुसऱ्या स्तनाला लावते त्याप्रमाणें जगज्जननी प्राण्याला एका जन्मांतून दुसऱ्या जन्मांत नेत असते. पण तोंडांतून स्तन सुटलें कीं अजाण बालक रडूं लागतें. आतां दूधच संपलें असें त्याला वाटतें. माणसाला एक जीवन नष्ट झाल्याचा शोक होतो तोहि असाच अज्ञानमूलक आहे. वास्तविक मृत्यूनेंच जीवनाला माधुरी आणली आहे. जरा, दुःख, कटु स्मृति पुसून टाकून नवजीवन देणारी संजीवनी म्हणजे मृत्यु. आपल्या घरीं नेण्याकरितां जणूं कांहीं दूतच आला

आहे अशी मृत्यूची भूमिका आहे. अमरत्वाची शाश्वती वाटल्यामुळेंच रवीन्द्र मृत्यूचें स्वागत फार प्रेमानें करूं शकले.

कुणीसें असें म्हटलें आहे कीं, मृत्यु आणि स्त्रीप्रेम यांवर कवि किती स्वतंत्र व स्फूर्तिदायक विचार प्रकट करतो, यांवर त्याच्या प्रतिभेची उंची मोजतां येते. मृत्यूविषयीं रवीन्द्रांचे पल्लेदार विचार वर सांगितलेच. स्त्रीप्रेमाचें भव्य दिव्य स्वरूप रवीन्द्रांनीं आपल्या कथा-कवितांतून आणि प्रबंधांतून फार उत्कृष्ट रेखाटलें आहे. संस्कृति आणि मानवी जीवन याविषयींच्या त्यांच्या कल्पनाहि स्त्रीप्रेमावरील त्यांच्या विवेचनानें स्पष्ट होतात.

रवीन्द्रांच्या मतानें स्त्री ही पुरुषजीवनाची पूर्तता आहे. स्पर्धा नव्हे तर सहकार्य ही तिची भूमिका असावी. पुरुष उपयुक्ततेच्या दृष्टीनें अनेक गोष्टींकडे पाहतो तर स्त्रीची या गोष्टींकडे पाहण्याची दृष्टि मानवी असते. पुरुष स्त्रीप्रेमाकरितां भुकेला आहे. स्त्रीशिवाय पुरुषाचें चित्र अपूर्णच राहणार. सुजातानें बुद्धाला जें दिलें किंवा मेरीनें ख्रिस्तासाठीं जी पार्श्वभूमि तयार केली ती वगळल्यास बुद्ध-ख्रिस्तांच्या मूर्ति ओक्याबोक्याच वाटतील. परंतु प्रेम हें स्त्रीचें सारें जीवन व्यापून बसतें तसें पुरुषाचें होत नाहीं. विश्वात्म्याशीं एक होण्यांत स्त्रीचाहि मोक्ष आहे. पण स्त्री पुरुषाच्या प्रेमाच्या माध्यमांतून तो मिळवितें. प्रेमांत स्त्रीला जीवनाची संपूर्ण सार्थकता मिळेल तशी पुरुषाला वाटणार नाहीं.

पण स्त्री प्रेमांत आपल्या जीवनाची परिपूर्णता पहात असली तरी तिनें केवळ गृहजीवनांतच रमून जावें असें मात्र रवीन्द्रांचें मत नाहीं. आधुनिक संस्कृतींत कार्यक्षमता आणि संघटना यांनाच फार महत्त्व आलें आहे. डौल आणि सौंदर्य यांची तिच्याशीं फारकत झाली आहे. ही जगाला फारशी उपकारक गोष्ट नाहीं. आधुनिक सुधारणा ही पुरुषांच्या वर्चस्वामुळेंच अशी एकारलेली आहे. स्त्रियांनीं जर जगाच्या घडामोडींत आपला वांटा उचलला आणि आपले आत्मीय गुण पूर्णांशानें प्रकट केले तर आजच्या मानवी जीवनांत जिव्हाळा आणि सौंदर्य येईल. आज केवळ सत्ता-संपत्तीच्या हव्यासानें जी अपार हिंसा होत आहे ती नाहींशी होईल.

सर्व तत्त्वज्ञानाचा शोध शाश्वत सुखशांति कशी मिळेल यासाठीं चाललेला

आहे. विज्ञान फोफावूं लागलें तेव्हां माणसाच्या सुखाचें अमोल साधन हस्तगत झाल्यासारखें वाटूं लागलें, पण नंतर त्याच्या मर्यादा कळल्या. इतकेंच नव्हे, तर सुखासाठीं अवतरलेलें विज्ञान अखेर मानवी समाज नष्ट करून टाकील कीं काय, असें आज भय वाटूं लागलें आहे. प्राणी कांहीं संरक्षक साधनांसह जन्मास येतात. पण नंतर भोंवतालची परिस्थिति बदलली कीं, तींच साधनें भारभूत होतात. त्यांच्यावर उलटतात. माणसांचें तसेंच आहे. एका काळीं वन्य पशूंपासून बचाव करण्याकरितां माणसांनीं शस्त्रास्त्रें शोधून काढलीं. पुढें तींच तो आपल्या बांधवांविरुद्ध वापरूं लागला. आजच्या युगांत माणसाचें मन अभद्र लोभाशीं आपली सांगड घालीत आहे. वासना हें सुकाणू आणि लोभ हें वल्हें करून तो आपली जीवन-नौका हाकीत आहे. अशा स्थितींत निरपराधी स्त्री-पुरुषांवर बॉंब टाकण्याच्या कृत्याबद्दल आश्चर्य वाटून घेण्यांत काय अर्थ आहे ? हें असेंच व्हायचें. विषवृक्षाला अमृताचीं फळें कुठून लागणार ?

जगाची ही स्थिति पालटण्यासाठीं पक्ष-संघटना उपयोगी पडणार नाहींत असें रवीन्द्रांचें ठाम मत आहे. भुसभुशीत पायावर उंच इमला कसा उभा राहणार ? पक्ष म्हटला कीं कांहीं आग्रह आलेच. हे आग्रह सत्याला विरोधक असतात. पक्ष आणि प्रतिपक्ष यांच्या हाणामारींत सत्य घायाळ होऊन बाजूला पडतें. रवीन्द्र म्हणतात, ‘ आजचें सर्व पाप लोभमूलक आहे. तें भयाचें वातावरण निर्माण करतें. लोभ सुटेल तेव्हांच भय नाहींसें होईल आणि मग प्रसन्न व सुस्थिर वातावरणांत मानवता आपली खरीखुरी प्रगति करूं शकेल. ’ या सर्व कोलाहलांत आणि अंधेरनगरींत माझ्या हृदयांतील सत्याच्या प्रकाशास अनुसरून मी चालेन मग कुठलीहि आपत्ति येवो अशा निर्धारानें माणसानें चाललें पाहिजे.

आजच्या नैतिक अराजकावर रवीन्द्र नाखूष होते तरी ते निराशावादी मात्र बनले नाहींत. युगायुगाचे ठायीं सत्य व प्रेम यांचा संदेश देणारे महात्मे सर्व देशांत अवतरले आहेत. त्यांच्या अनुयायांनीं पंथस्थापना केली कीं त्या महात्म्यांनीं प्रतिपादिलेलें सत्य स्थानभ्रष्ट होतें. आजहि असे सत्यशोधक व सत्यपूजक लोक जगांत अनेक ठिकाणीं आहेत.

त्यांची संकलित तपस्या हाच जगाचा खरा आधार होय. रवीन्द्रांनीं हें जें उद्धारकांचें महामंडल वर्णिलें त्यांत त्यांचेंहि प्रमुख स्थान नाहीं काय ?

भारतीय संस्कृति ही अरण्यांत जन्म पावली. या आरण्यक संस्कृतीमुळेंच जग सत्य - शिव - सुंदर होईल ही रवीन्द्रांची श्रद्धा होती. भारतीय संस्कृति ही मूलतः ग्रामीण आहे. तिच्यांत फार मोठ्या शहरांना किंवा केंद्रीकरणाला जागा नाहीं. यंत्रानें माणसाचें सेवक झालें पाहिजे. पण आज पाहावें तों इतरांना गुलाम करण्याचें राक्षसी कार्य यंत्र करीत आहे ! आपलीं ग्रामराज्यें सुखी असत आणि तेथील माणसांच्या संबंधांत सुसंवाद असे. हें साधें जग नष्ट झाल्यानंतर द्वेष व स्पर्धा वाढली. आजचें जग केवळ सुधारून सुखी होणार नाहीं तर त्याची पुनर्रचना केली पाहिजे. आणि त्यासाठीं रवीन्द्र सतत तरुणांना आवाहन करीत असत.

राज्ययंत्र हा कांहीं समाजाचा शेवट होऊं शकत नाहीं. समाजाची दिनचर्या सुरळीत चालावी यासाठीं राज्ययंत्र हें साधन असतें. समाज हाच राज्ययंत्राचा मूळ झरा आहे. अर्थात् तो जर निर्मळ व जिवंत राहिला तरच राज्ययंत्र कार्यक्षम राहील. पक्षाधिष्ठित राजकारणानें समाजजीवनांत गाळ सांचतो असें रवीन्द्रांचें मत होतें. समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे आणि प्रेम व त्याग यांच्याच बळावर ती करतां येईल असें गांधीजींप्रमाणेंच रवीन्द्रांना वाटे. ते हुकूमशाहीच्या अर्थातच विरुद्ध होते. आणि संघटना किंवा पक्ष याबद्दल जरी त्यांना घृणा असली तरी अखेर जगांतील सर्व दलित राष्ट्रांनीं अन्यायाच्या प्रतिकारासाठीं एकत्र यावें या मतापर्यंत ते आले होते. दोन महायुद्धांमुळें त्यांच्या विचारांत खूपच बदल झाला. भारत हें गुरुस्थान आणि जग हें भारताचें कार्यक्षेत्र या श्रद्धेनें त्यांनीं आपला संदेश देण्यास सुरुवात केली. पण उत्कट व प्रांजल वृत्तीमुळें पुढें पुढें अनुभवाच्या निकषावर जें जें निरुपयोगी ठरलें तें तें त्यांनीं सोडून दिलें. भारत आणि जग यांच्या संबंधाविषयीं पुढें त्यांचा दृष्टिकोण अधिक वास्तववादी झाला.

रवीन्द्रनाथांचें थोरपण तें हेंच. आपल्या सिलेल्दा खेड्यांतील अलिप्त, शांत, एकाकी जगांत वावरणाऱ्या या स्वप्नाळू कवीला साम्राज्यवादापासून साम्यवादापर्यंत आधुनिक जगांतले सारे मतप्रवाह बरोबर उमजले होते. महायुद्धाच्या भयंकर पडझडींतून उदयाला येणारें नवें जग कसें असावें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

यासंबंधीं त्यांचें खास चिंतन चालू होतें. अर्थशास्त्रावर त्यांनीं भर दिला नाहीं, परंतु मानवतावादाच्या मार्गानें ते आर्थिक समतेपर्यंत पोंचले होते. ते बदल करण्यास कधींहि घाबरले नाहींत. आत्मा कायम ठेवून कुठलीहि सामाजिक पुनर्घटना करावी असें त्यांनीं सुचविलें. त्यांचे विचार शास्त्रीय बैठकीवर आधारलेले नसले तरी एकंदरीनें ते निकोप व पुरोगामी आहेत. स्वप्न आणि सत्य यांचा मेळ घालण्याचा रवीन्द्रांनीं आटोकाट प्रयत्न केला.

जीवनांतील अंतर्गत सुसंगतीवर आणि एकतेवर रवीन्द्रांची गाढ श्रद्धा होती. मनुष्यानें परमेश्वर निर्माण केला असें ते म्हणत नसले तरी जीवात्म्या-वांचून परमात्म्याला सार्थकता नाहीं असें ते मानत. त्यांचा अहंभाव सात्त्विक होता. व्यक्तीची प्रगति हेंच जीवनाचें मुख्य उद्दिष्ट होय. राष्ट्र, राज्ययंत्र किंवा समाज हीं त्या उद्दिष्टाचीं फक्त साधनें आहेत असें ते म्हणत. अर्थात् या साधनांनीं साध्यरूप घ्यावें असें त्यांनीं कधीं प्रतिपादलें नाहीं. सहकारी भावना ठेवून सामुदायिक कार्य करण्यांतच समाजाचें हित आहे. सेवा आणि त्याग हींच व्यक्तीचीं आणि समष्टीचीं मुख्य कर्तव्यें आहेत. हे सारे गुण मनुष्याच्या अंगीं प्रथमपासूनच जीमुळें बाणतील अशी शिक्षण-पद्धतीहि रवीन्द्रांनीं शोधून काढली.

त्यांच्या शिक्षणपद्धतीचें वर्णन प्रो. महालनबीस यांनीं फार थोडक्यांत पण अतिशय समर्पक केलें आहे; ते म्हणतात, “मुलांना आनंदमय जीवन जगतां यावें आणि जास्तींत जास्त स्वातंत्र्य उपभोगतां यावें असा रवीन्द्रनाथांचा उद्देश होता. जेथें अभ्यासक्रम आणि जीवन यांची फारकत झालेली नाहीं, ज्या ठिकाणीं सामुदायिक जीवनांत विद्यार्थी समरस होत आहेत आणि निसर्ग व भोंवतालचें वातावरण यांच्याशीं सुसंवाद साधलेला आहे असें विद्यालय रवीन्द्रांनीं निर्माण केलें.” अशा या आदर्श विद्यालयांतील छात्रच पुढें रवीन्द्रांचीं जीवनमूल्यें जगण्यास लायक होणार हें सांगणें नकोच.

रवीन्द्रनाथ ज्या आपल्या ध्येयाची जन्मभर उपासना करीत आले तें ध्येय एका बाजूनें एका स्वयंपूर्ण खेड्यांत व्यक्त होणारें होतें. परंतु त्याच-बरोबर दुसऱ्या बाजूनें सर्व जगाचें एक कुटुंब करावें एवढा त्याचा आटोप

होता. ' जें पिंडीं तें ब्रह्मांडीं ' असें त्यांना वाटे आणि म्हणूनच एक मनुष्य किंवा एक खेडेगांव हें संपूर्णपणें विकसित झालें तरी विश्वकार्यांतील एक टप्पा गांठला असें त्यांना वाटे. किंबहुना व्यापक प्रमाणावर कायदेकानू करून ठोकळेबाज सुधारणा करण्यापेक्षां अंत:स्फूर्तीनें, प्रेमत्यागानें प्रत्येक समाजघटक जर सुधारेल तर सर्व जगाचें नंदनवन होईल अशी त्यांची विचारसरणी होती. कुठल्याहि प्रकारच्या संकुचिततावादाला त्यांचा विरोध होता. रवीन्द्रांच्या धर्माचें किंवा तत्त्वज्ञानाचें सार सांगावयाचें झाल्यास प्रेमधर्म किंवा मानवधर्म असें सांगता येईल. ते म्हणत मनुष्य जेव्हां इतर जगाशीं आपला ऋणानुबंध नाहीं असें मानतो, तेव्हां तो आपल्याभोंवतीं कारागृहाच्या भिंती उभ्या करतो. जेव्हां सर्व चराचरांत भरून राहिलेल्या आत्म्याशीं तो एकजीव होतो तेव्हां ज्या जगांत तो जन्मला त्याचा खरा अर्थ त्याला कळला असें होतें. जातीयवाद किंवा संकुचिततावाद हा नास्तिकतेपेक्षां सुद्धां धर्माला अधिक मारक आहे. कारण त्या योगें एक तऱ्हेची अलिप्तता वेगळेंपण असें माणसाला येतें. सिंधूतून बिंदु वेगळा पडतो आणि म्हणूनच तो सुकून जाण्याचा संभव असतो. एका ठिकाणीं ते म्हणतात, " हे जगता, मी गेल्यानंतर माझ्यासाठीं एवढेंच म्हण कीं, यानें आमरण प्रेम केलें. " या लहानशा अवतरणांतच या प्रकरणाच्या आरंभीं दिलेल्या रवीन्द्रांच्या उद्गाराची सांगता होती.

आजच्या जीवनांत जें बीभत्स होतें तें बाजूला करून रवीन्द्रांनीं चिरंतन सत्याचें दर्शन घडविलें. उपनिषदांतला आनंदवाद त्यांनीं भक्तिप्रेमाच्या तल्लीनतेंत कसा उपभोगतां येतो हें दाखविलें. आणि त्याला समतेची जोड देऊन तो विश्वव्यापी केला. रवीन्द्रांचें तत्त्वज्ञान म्हणजे आनंद, भक्ति, आणि समता यांचा त्रिवेणी संगम होय. या संगमाच्या दोन्ही तीरांवर कधींहि न कोमेजणाऱ्या सौंदर्याची वनश्री आहे. भारतीय संस्कृतींत आणि तत्त्वज्ञानांत जें जें उच्च उदात्त होतें तें प्राचीन काळीं महाकवि कालिदासाच्या ललितकृतींत प्रकट झालें. आधुनिक काळांत रवीन्द्रांच्या वाङ्मयांत तेंच नव्या रूपानें विकसित झालेलें दिसत आहे. जें वास्तव आहे तरीहि चिरंतन आहे, व्यवहार आणि ध्येय या दोहोंनाहि ज्यानें स्पर्श केला आहे, असें याचें वैभव आहे.

" आनंदसूर्यांकडे मुख करून तुझ्या काव्याचें सौंदर्यकमल निर्लेप निर्मळ फुललें आहे. त्यावर दुःख, दैन्य, दुर्दिन यांचें कोठेंच कांहीं चिह्न दिसत नाहीं. जीवनाच्या मंथनांतून निघालेलें विष तूं स्वतः प्राशन केलेंस आणि अमृत निघालें तें जगाला देऊन गेलास. "

हें कालिदासाबद्दल रवीन्द्रांनीं लिहिलें. त्यांच्या स्वतःच्या महान् कृतीचें वर्णन याहून वेगळें थोडेंच आहे !

★

# साहित्य-विचार

" काव्य हाच माझा धर्म "

विश्वकवि रवीन्द्रनाथ यांच्या प्रतिभेनें अनेक क्षेत्रांत नवरचना केली असली तरी साहित्य हेंच त्यांचें खरें वैभव, मुख्य जीवितकार्य, आणि अंतिम कृतार्थत्व होतें यांत शंका नाहीं. उच्च साहित्याचे कांहीं कायमचे निकष असतात. काल ही साहित्याची प्रमुख कसोटी मानतात. पण त्याचबरोबर रवीन्द्रांसारखे वाग्भट आपलें स्वतःचें एक स्वतंत्र टीकाशास्त्र तयार करीत असतात. साहित्याचा हेतु, आविष्कार आणि फलश्रुति यांविषयीं त्यांची कांहीं विचारपद्धति असते. केवळ त्यांचें स्वतःचेंच नव्हे तर इतरहि उत्कृष्ट वाङ्मय कसें पारखावें याचें तंत्र या विचारपद्धतींत सहज सापडतें. म्हणूनच रवीन्द्रांच्या साहित्याचा परिचय करून घेण्यापूर्वीं त्यांची साहित्यांविषयींचीं मतें जाणून घेणें योग्य ठरेल.

जेव्हां जीवनाच्या प्राथमिक गरजा संपतात आणि माणसाची शक्ति शिल्लक राहते तेव्हांच कला निर्माण होतें हा रवीन्द्रांचा मूळ सिद्धान्त आहे. आहार, निद्रा, भय इ. विषयांना तोंड देण्यांतच मनुष्य आपली सर्व शक्ति खर्च करीत होता तेव्हां कला निर्माण होण्याची शक्यताच नव्हती. त्याचें सर्व सामर्थ्य रोजच्या आवश्यक कामांतच संपून जाई. या वेळीं तो आणि इतर प्राणी यांत फारसा भेद नव्हता. पण हळूहळू शिकार-

लागवड यांमुळें भक्ष्य मिळविण्यासाठीं कमी श्रम पडूं लागले आणि मग कांहीं बळ शिलकेंत राहूं लागलें, रिकामा वेळ मिळूं लागला. यांतूनच कला जन्मास आली. दगडी हत्यारांवर ओबडधोबड नक्षी चढली, गुहेंतील भिंतींवर जनावरांचीं स्थूल रेषाचित्रें उमटूं लागलीं, आनंद प्रगट करतांना पावलें थोडीं तालांवर पडूं लागलीं, सहजस्फूर्त उद्गारांना कांहीं लयबद्धता आली. मनुष्य संस्कृतीचे पहिले धडे गिरवूं लागला. कला आणि संस्कृति एकाच वेळीं वाढूं लागली.

प्राथमिक गरजेच्या पातळीवर गेल्यावरच कला निर्माण होते. या सिद्धान्ताचा परिणाम रवीन्द्रांच्या सर्वच कलाविषयक मतावर झाला आहे. त्यांचें विशाल वाङ्मय अत्यंत स्फूर्तिदायक असलें तरी उद्बोधनाचा हेतु धरून त्यांनीं तें लिहिलेलें नाहीं. ‘ मेघदूत ’ लिहितांना रामटेकपासून कैलासापर्यंत भूगोल सांगण्याचा कालिदासाचा उद्देश थोडाच होता ! रवीन्द्र तर म्हणतात कीं, यक्षाला मिळालेला शाप आणि त्याच्या विरह-वेदना रंगविणें हेंहि कालिदासानें योजलें नव्हतें. आषाढाच्या पहिल्या दिवशीं राजवाड्याच्या गच्चीवर उभा राहिला असतां समोर एक प्रचंड ढग पर्वतशिखरावर आदळतो आहे असें दृश्य त्याला दिसलें. आणि त्या गूढधूसर वातावरणामुळें त्याचें अंतःकरण हेलावलें. कांहीं अनामिक हुरहूर त्याला लागली. ही हुरहूर व्यक्त केल्याशिवाय त्याला राहवेना. आणि मग मंदाक्रान्ता छंदाचें माध्यम घेऊन त्यानें आपली ती अंतःकरणांतील ऊर्मि व्यक्त केली. यक्षाची कथा ही निमित्तमात्र. मनाला लागलेली हुरहूर प्रकट करणें ही खरी इच्छा. म्हणून रवीन्द्र म्हणतात, जें अहेतुक आहे तें काव्याच्या सुवर्णपात्राखालीं झाकून ठेवणें चांगलें.

रवीन्द्रांचें मन सौंदर्यानें ओसंडत होतें. हीं चराचर सृष्टि आश्चर्यानें भरलेली आहे असें त्यांना वाटे. मनुष्यानें मनाच्या खिडक्या बंद केल्या नाहींत तर हें आश्चर्य त्याच्या वृत्तीला खास पुलकित करील. ज्यांचें आश्चर्य, प्रेम आणि कल्पना जागृत आहे त्यांना बाह्य सृष्टि कांहीं निराळेंच रूप घेऊन दिसतें. भोंवतालची मानवजात हालचाल करीत असतां कला-काराच्या भावलहरी उसळूं लागतात. एखादें दृश्य सामान्य माणसाला अगदीं साधें वाटलें तर तेंच कलाकाराला हृदयंगम वाटतें. कारण त्याच्या

जाणीवेच्या भट्टींत या दृश्याला कांहीं वेगळा रंग व आकार येत असतो. हें आंतर जग सदैव नवीन, टवटवीत असतें. कलाकार हा बाहेरील जगाबद्दल बेफिकीर राहील. पण बाहेरच्या जगाला हृदयांत सामावून आणि त्यावर आपल्या जाणीवेची रासायनिक क्रिया करून जी सृष्टि तो आपल्या हृदयांत निर्माण करतो तिची मात्र तो प्राणपणानें जपणूक करील. आणि त्या सृष्टीचें सौंदर्य इतरांना कळावें यासाठीं धडपड करील. या धडपडींतूनच कला जन्माला येते. समुद्रांतून ढगाच्या रूपानें निघालेलें पाणी जसें पुन: समुद्राला मिळावें तद्वत् मानवजीवनामुळें उदयाला आलेली कला पुन: त्याच जीवनांत प्रवेश करूं पाहते.

कलाकाराच्या मनांत निर्माण झालेली सृष्टि बाहेर प्रकट होण्यासाठीं कलातंत्र अवगत असलें पाहिजे. कलाकाराचा अनुभव जितका संपन्न आणि तो मांडण्याची त्याची शैली जितकी समर्थ तितकी त्याची कला अधिक चिरस्थायी, अधिक सुंदर. रवीन्द्र साहित्यकलेला अलंकाराची आवश्यकता आहे असें मानतात. स्त्रीप्रमाणें कलेला दुसऱ्याचें हृदय काबीज करायचें असतें, स्वत:चें हृदय द्यायचें असतें. म्हणून तिनें स्वत:ला रमणीय केलें पाहिजे. "... स्त्री सूचक असते, गूढ असते, तिच्यापाशीं लपंडाव असतो, मौन असतें. साहित्यानेंहि आपल्या हेतुसिद्ध्यर्थ अलंकार धारण करायला हवेत. छंद, उपमा, नादमाधुर्य सारें हवें. सूचकता हवी, अस्पष्टता हवी, शास्त्राच्या, तत्त्वज्ञानाच्या भाषेसारखी सूत्रमय भाषा येथें चालणार नाहीं."

अर्थात् मूळ सौंदर्य गुदमरून टाकण्याइतकें अलंकाराचें ओझें कलेनें चढवावें असें रवीन्द्र खासच म्हणत नाहींत. साहित्यांत कित्येकदां शब्द अपुरे पडतात. साहित्यिकाला आपुली अनुभूति नुसती वाच्यार्थानें सांगतां येणें पुष्कळदां अशक्य होतें. कारण कांहीं अनुभव, संवेदना या शब्दातीत असतात. 'शब्देवीण संवादिजें' असें जें कांहीं असतें तें शब्दांच्याद्वारें सांगणें जवळजवळ अशक्य असतें. यासाठींच चित्र आणि संगीत यांची जोड साहित्याला पाहिजे. पण चित्र म्हणजे काय? आणि संगीत कशाला म्हणायचें? साहित्यांतलें चित्र हें रंगरेषांचें नव्हे त्याप्रमाणें साहित्यांतलें संगीत हें रागरागिण्यांचें नव्हे. चित्र शब्दांनींच उभें करायचें. संगीत म्हणजे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

तालबद्धता. अलीकडील भाषेंत म्हणजे प्रतिमा आणि लय या साधनांनींच साहित्यिक हा आपल्या हृदयांत उसळत असलेलें सौंदर्य वाचकापर्यंत पोंचवतो. चित्रामुळें विचाराला, कल्पनेला आकार मिळतो व संगीतानें गति मिळते. रवीन्द्रांच्या मतें, ' चित्र म्हणजे शरीर व संगीत हा आत्मा होय.'

रोजचा परिचयाचा अर्थ एकदम भव्य दिव्य वाटायला लावणें हीं चित्र-संगीताची कामगिरी आहे. रवीन्द्र आपल्या विवेचनाच्या स्पष्टीकरणासाठीं दाखला देतात, " बलरामदास म्हणतो, ' तुझें दर्शन व्हावें म्हणून माझे हृदयपक्षी उड्डाण करतात ! ' येथें जें सांगितलें गेले नाहीं असें कांहीं आहे का ? डोळ्यांची उत्कण्ठा केवळ शब्दांनीं दाखवितां आली नसती. उत्कण्ठेच्या भावनेला कसें प्रकट करतां येईल ? पक्षी, त्यांचे झपाट्यानें नेणारे पंख, तें उड्डाण हें सारें आणून उत्कण्ठेची भावना येथें मूर्त होते. "

खुद्द रवीन्द्रांच्या विशाल वाङ्मयसरोवरांत अशा प्रतिमा कमलदलासारख्या जागोजाग विखुरल्या आहेत. ' उर्वशी ' भूतलावर अवतरली तेव्हां सागरानें शेषासारख्या आपल्या हजारों फणा उभारून तिचें स्वागत केलें असें रवीन्द्रांनीं वर्णन केलें आहे. किनाऱ्यावर उभें राहून ज्यांनीं क्षितिजापासून जमिनीकडे येणाऱ्या उंच उंच भरतीच्या लाटा पाहिल्या असतील त्यांना या प्रतिमेची खुमारी कळेल. उर्वशीसारखें स्वर्गीय सौंदर्य प्रकट झाल्यावर जगांत कसा आनंद उसळला हें रवीन्द्रांना दाखवायचें होतें. तेव्हां सागराला त्यांनीं एकंदर मानवसमूहाच्या जागीं कल्पिलें आणि त्याच्या उसळणाऱ्या आनंदलहरींना शेषाच्या फणांची उपमा दिली. यांतली समर्पकता आणि भव्यता ज्याला न उमजेल तो अरसिकच म्हणावा लागेल !

रवीन्द्रांच्या आणखी एका प्रसिद्ध प्रतिमेचा दाखला घेऊन हें अधिक स्पष्ट करतां येईल. ताजमहाल हें जगद्विख्यात शिल्प शहानजहान बादशहानें आपल्या लावण्यखनी राणीच्या – मुमताज महालच्या – प्रेमाची स्मृति म्हणून बांधलें. या शिल्पाचें सौंदर्य केवळ अवर्णनीय आहे आणि कुठलाहि रसिक पहिल्यानें तें पाहतों तेव्हां मंत्रमुग्ध होऊन जातो. आपल्या ' शहाजहान " या कवितेंत रवीन्द्रांनीं ताजमहालचें वर्णन करतांना म्हटलें आहे :

एक अश्रु नयनेर जल
कालेर कपोलतले शुद्ध समुज्जल
ए ताजमहाल

( कालाच्या गालावरील हा पांढरा शुभ्र अश्रुबिंदु आहे. )

प्रतिमेचें सामर्थ्य दाखविण्यास याहून सुंदर ओळी जगाच्या वाङ्मयांत क्वचितच सांपडतील. पत्नीच्या चिरवियोगाची वेदना अश्रुवाटेच प्रकट होणार. पण हा अश्रु अमर आहे. कारण अनंत कालाच्या गालावर तो एका अलौकिक शिल्पाच्या रूपानें स्थिर झाला आहे. खऱ्या प्रेमाच्या अमरत्वाचें तें प्रतीक आहे. या ठिकाणीं बादशाही वैभव, उत्कट प्रेम, त्याचें अमरत्व, स्मरणीय व्यक्तीचें लावण्य, शिल्पाचा रंग व असामान्यता सारें सारें एका प्रतिमेनें सूचित केलें आहे. ताजमहालइतकीच ताजमहालवरील रवीन्द्रांची ही कविता अनुपम ठरेल !

चित्राइतकेंच रवीन्द्रांचें वाङ्मय संगीतानेंहि समृद्ध आहे. आपल्या कविता विशिष्ट स्वर-समूह-पद्धतीनेंच म्हटल्या पाहिजेत असा रवीन्द्रांचा आग्रह होता. ही पद्धति ' रवीन्द्र-संगीत ' म्हणून प्रसिद्ध आहे. रवीन्द्रांचें शास्त्रीय संगीताचें ज्ञान फार खोल होतें. त्यांचा गळा फार गोड होता आणि ते तालासुरावर उत्तम गाऊं शकत. आपल्या गीतांतील भाव-कल्पना–लय यांना धरून त्यांनीं त्या गीतांना सुबक चाली लाविल्या. परंतु वर साहित्यांतलें संगीत म्हणून जें सांगितलें तें याहून वेगळें आहे. चित्रानें साकार केलेल्या कल्पनेला किंवा दृश्याला समर्पक शब्दांची, नादमाधुर्याची जोड देणें ही कलाकाराची करामत असते. हेंच साहित्यांतलें संगीत. पतीच्या प्रेमळ सहवासांत रात्र घालवून खूप उशीरां उठलेली एक लज्जावती नववधू म्हणते :

पाँखी डाके बोले गेली विभावरी
जले चले वधू लइया घागरी
आमि ओ आकुल कबरी सावरी
केमन जाइबे काजे ?
...बेला होलो मरि लाजे.

[ पक्षी हांक मारून सांगत आहेत कीं, रात्र संपली. सासुरवाशिणी

घागरी घेऊन पाणवठ्यावर जात आहेत. मी आपली विस्कटलेली वेणी सावरीत आहें. कामाला कशी जाऊं? उठायला उशीर झाल्यानें मी लाजेनें चूर झालें आहें.]

एस गो शारदलक्ष्मी
तोमार शुभ्र मेघेर रथे
एस निर्मल नील पथे
एस धौत श्यामल
आलो झलमल
वनगिरि पर्वते

[ हे शारदलक्ष्मी, तुझ्या शुभ्र मेघांच्या रथांत बसून ये. या निर्मळ निळ्या रस्त्यावरून, पर्वतावर पडलेल्या या शुभ्रधूसर सुंदर प्रकाशांतून प्रकट हो. ]

रवीन्द्रवाङ्मयांतील हे दोन उतारे पहा. पहिल्यांत एका नववधूची गोड वेदना आहे. वृत्त थोडें लांब असलें तरी 'पाँखी डाके... ' 'जले चले' असे सूक्ष्म अनुप्रासात्मक खटके असल्यानें संभ्रमांच्या अवस्थेंत पदोपदीं उडणारा गोंधळ सूचित होतो. दुसऱ्या उताऱ्यांत शारदश्रीला आवाहन आहे. एकेका लहान ओळीनें एक एक दृश्य डोळ्यापुढें उभें राहतें. वृत्त गतिमान् आहे. त्यामुळें मेघांच्या रथाचा खडखडाट प्रतीत होतो.

आपल्या लेखनाला गति देणाऱ्या संगीताबद्दल रवीन्द्रांनीं अनेक प्रयोग केले. संस्कृत आणि प्राचीन बंगाली साहित्यांतले छंद तर त्यांना उत्तम हाताळतां येत होतेच. परंतु, आपल्या भावना लोकवाणींत मांडल्या पाहिजेत हा हेतु मनांत धरून त्यांनीं जुन्या छंदांना नवें वळण दिलें. लोकगीताच्या चालींची नवी मांडणी केली. आदर्श वाङ्मय आणि लोकवाङ्मय यांच्यांतला रुंद खंदक भरून काढण्याचे प्रयत्न रवीन्द्रांइतकें क्वचितच एखाद्या साहित्यकारानें केले असतील. त्यांच्यावर खानदानी वातावरणाचे संस्कार झाले असले तरी आपल्या संवेदना लोकभाषेंत प्रकट व्हाव्या, साध्या रसिकाला त्या कळाव्या ही रवीन्द्रनाथांची तळमळ होती. प्रादेशिकतेचा दोष पत्करून त्यांनीं भाषेची धाटणी आपल्या बाजूच्या वंग समाजाच्या बोलीसारखी ठेवली. प्रादेशिकतेमुळें रवीन्द्रांची भाषा कित्येकदां बंगालीच्या जाणकारांनाहि

समजत नाहीं ! पण हें वैगुण्य नसून वैशिष्ट्य आहे असेंच म्हणावें लागेल.

शब्द, चित्र, संगीत यांच्या साधनांनीं कलाकार जें सौंदर्य रसिकाला दाखवितो तें रसिकाला हृदयस्पर्शी वाटायला एक महत्त्वाचें कारण रवीन्द्रांच्या मतें, तें सौंदर्य रसिकाला अगोदरच ठाऊक असतें हें होय. एखादी व्यक्ति प्रथमदर्शनींच आपणांला आवडते ती आपणांला अगोदर कुठें तरी पाहिल्यासारखीहि वाटते. जणूं काय मध्यंतरीं अनेक युगांचा काळ गेला आणि त्यानंतर आज आपण पुनः भेटत आहों असा साक्षात्कार होतो. प्रथमदर्शन हें जणूं पुनर्दर्शन ठरतें. परमेश्वराचें असेंच आहे. ‘ नूतनेर माझे तुमि पुरातन ’ ( नवीनांत तूं जुनाच आहेस. ) हा न्याय रवीन्द्र सौंदर्यालाहि लावतात. कारण रवीन्द्रांना सौंदर्य आणि परमात्मा यांत अभेद वाटतो. सौंदर्याच्या पहिल्या दर्शनानें आश्चर्य वाटतें. पण तो आश्चर्याचा पूर जरा ओसरला कीं हें आपल्या ओळखीचें आहे असा भास होतो. म्हणजे साहित्यकार आपल्या अनुभवाचाच पुनःप्रत्यय वाचकाला देतो असें नाहीं तर वाचकाला जें प्रतीत होतें त्यांमुळें वाचकालाहि आपल्याच विस्मृत अनुभवाचा पुनःप्रत्यय आल्याचा आनंद होतो.

सौंदर्यवादी वृत्तीच्या या चमत्कारांचें सुरस वर्णन रवीन्द्रांनीं आपल्या ‘ मेघदूता ’ वरील निबंधांत केलें आहे.

“ आपण सर्व (मेघदूतांतील यक्षाप्रमाणें) एका निर्जन गिरिशृंगावर एकेकटे उभे राहून उत्तरेकडे पहात राहिलों आहोंत. मध्यें आडवे आले आहेत आकाश, मेघ इ० पलीकडे भूतकालीन पृथ्वीवरील रेवा, शिप्रा, अवंती, उज्जयिनी--सुख, सौंदर्य, भोग, ऐश्वर्य या सर्वांचें रम्य चित्र पसरलें आहे. कल्पना त्या चित्राकडे बोट दाखविते, पण त्याला जवळ आणूं शकत नाहीं. मनांत आकांक्षा उद्भूत करते, पण त्यांची तृप्ति करूं शकत नाहीं ! दोघांमध्यें केवढें हें अंतर !...पण मनांत असें येतें कीं, कोणत्या तरी काळीं आपण मानसलोकांत होतों. आतां मात्र त्या लोकांतून बहिष्कृत झालों आहोंत. ”

मात्र रवीन्द्रनाथांचा सौंदर्यवाद केवळ अशा हुरहुरीवर थांबलेला नाहीं. कलेंतील सौंदर्य हें साध्य नव्हे, तें साधन आहे. रवीन्द्र सांगतात कीं, कलाविष्कारांत कलाकार हा परमात्म्याच्या प्रश्नांना उत्तरें पाठवीत असतो

दृश्य जगाच्या किंवा प्रसंगांच्या पलीकडे हा परमात्मा आपणांस प्रतीत होतो. मध्यस्थित असें जें विश्वात्मक तत्त्व आहे त्याच्याशीं सुखसंवाद हीच कलेची खरी कामगिरी. एखाद्या वृक्षाचें चित्र रेखाटतांना तो वृक्ष जगापासून वेगळा काढून दाखविणें असें थोर कलाकार करणार नाहीं. भोंवतील जगाच्या पार्श्वभूमीवर त्या वृक्षाचें स्थान कोणतें आहे व कसें आहे हें तो रेखाटील. रवीन्द्र म्हणतात कीं, कलेचें रहस्य मिलाफ (Harmony) आहे, विभक्तता नाहीं. साऱ्या मानवजीवनाशीं जेव्हां एखाद्या कलाकृतीचा दुवा जुळतो म्हणजे मानवी जीवनाशीं असलेला तिचा ऋणानुबंध जेव्हां संपूर्णपणें व्यक्त होतो तेव्हांच त्या कलाकृतीला वजन येतें, सौंदर्य येतें. ढगाला रविकिरणांचा ओझरता स्पर्श होतांच जसें त्या ढगाचें रूप हृदयंगम होतें तसेंच कलाकृतीचें आहे. रवीन्द्र परमात्मा, विश्वात्मा ( Supreme person ) पुरुषोत्तम असे शब्द वापरतात तेव्हां मानवतेच्या, किंबहुना चराचराच्या अंतरंगांत नांदणारें महान् तत्त्व असें त्यांना म्हणायचें असतें. आपण या महान् तत्त्वाशीं आजन्म एकरूप होण्याचा प्रयत्न केला असें रवीन्द्रांनीं सत्तराव्या वाढदिवशीं जनतेनें केलेल्या सत्काराला उत्तर देतांना म्हटलें होतें.

याच महत्त्वपूर्ण भाषणांतील थोडा भाग देऊन कलेचें स्वरूप व रहस्य याविषयीं रवीन्द्रांचे काय विचार होते या विषयाचा समारोप करतां येईल.

" फूल फुललें हीच फुलाची अंतिम कथा. ज्याला तें आवडलें त्यानें जिंकली. फुलाचें साफल्य त्याच्या विकसनांत असतें. सौंदर्याच्या आंत रसमय, रहस्यमय, शब्दातीत असें सत्य असतें. त्याचा आपल्या अंत:करणाशीं गूढ संबंध आहे. या तत्त्वाच्या संस्कारामुळें आपली अंत:स्फूर्ति मधुर, गंभीर, उज्ज्वल होते. आपल्या अंतर्यामीं पुरुष विशाल होतो आणि रंगून जातो. आपलें सारें जीवन त्याच्या रंगारसांशीं मिळून जाते. या मीलनालाच अनुराग म्हणतात. या अनुरागानें मानवी चैतन्याला उद्दीप्त करणें, औदासीन्यापासून त्याला उद्बोधित करणें हें कवीचें कार्य होय. "

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..२८.२५४४.... दि:

# काव्य

**“ माझ्या जीवनांत जें कांहीं कडू, वाकडें, किंवा बेसूर असेल तें सर्व अमृतमय गायनामध्यें वितळून जातें. हें गायनच माझी साधना आहे. एखाद्या पक्ष्याप्रमाणें तें झेप घालून तुझ्या चरणाजवळ पोंचण्याचा प्रयत्न करतें. ”**

रवीन्द्रांचें काव्य ही त्यांची एक साधना होती. प्रेम, विरह, निसर्ग, इतिहास कुठलाहि विषय असला तरी त्यांची ही वृत्ति प्रकट होई. प्राचीन संतकवींचा वारसा वेगळ्या पद्धतीनें त्यांनीं चालविला. बाऊल लोकांची भक्तिगीतें, कबीरांचीं पदें यांचीं भाषांतरें रवीन्द्रांनीं केलीं यावरून त्यांचा काव्यहेतु पष्ट दिसतो.

“ असंख्य फुलांवर दवबिंदु पडावेत तसें रवीन्द्रांचें काव्य आहे. त्यांत अप्रतिम सौंदर्य आहे. पण हे सर्व बिंदु एकत्र करून एखादा महासागर रवीन्द्र निर्माण करूं शकले नाहींत. ” सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक ‘ दिनकर ’ यांनीं काढलेले हे उद्गार आहेत. रवीन्द्र हे कवि होते, मुख्यत: भावकवि होते. व्यास, वाल्मीकि किंवा होमर-मिल्टन यांची प्रतिभा बृहत्काव्यांत ( Epic ) रमली. ती अधिक व्यापक, समावेशक, वस्तुनिष्ठ होती. मानवी संसाराचा विराट् पट थोडया दुरून पाहण्याचें कौशल्य या महाकवींत होतें. त्यांनीं आपलें स्वत्व अलिप्त ठेवलें. शेली, गालिब या भावकवींचें सामर्थ्य

वेगळ्या प्रकारचें. एकेका सौंदर्यदर्शनांत, प्रसंगांत किंवा कल्पनेंत ते आपले सर्वस्व ओतीत. त्यांत पूर्ण विरघळून जात. रवीन्द्रांची जात काव्यापुरती या भावकवीची म्हटली पाहिजे. काव्यापुरती म्हणण्याचें कारण गद्यांत-विशेषतः कथा-साहित्यांत व्यासादिकांची अलिप्तता त्यांनीं पुष्कळच दाखविली आहे. एक विराट् संसारपट उलगडून दाखविण्याइतकी विशाल कृति जरी त्यांनीं रचिली नाहीं तरी त्या पटाचें प्रतिबिंब किंवा लहान आकाराचें छायाचित्र त्यांच्या गद्य-वाङ्मयांत दिसतें. कवितेच्या क्षेत्रांत मात्र भावकवीची भूमिकाच मुख्यतः त्यांनीं केली.

'भानुसिंह' या टोपणनांवानें भक्तिगीतें लिहिणारे बालरवीन्द्र हे प्राचीन भक्तिपरंपरेचे वारस होते आणि त्यांच्या काव्यांतला हा रस कधींच शुष्क झाला नाहीं. 'संध्या-संगीत' हें त्यांचें काव्य १८८१ सालीं प्रसिद्ध झालें. म्हणजे विशीच्या आंतबाहेर ते त्या वेळीं होते. वंग-साहित्याच्या क्षितिजावर त्या वेळीं सूर्यासारखे तळपणारे बंकीमचंद्र या काव्यानें हरखून गेले. आणि एका जाहीर सभेंत आपल्या गळ्यांतील पुष्पमाला त्यांनीं या प्रतिभासंपन्न युवकाच्या गळ्यांत घातली. "हा बालक वंगभाषेचे पांग फेडून तिची कीर्ति दिगंताला नेईल." असे उद्गार त्या वेळीं बंकीमचंद्रांनीं काढले. हे उद्गार पुढें सुमारें तीन दशकांनीं तंतोतंत खरे ठरले. हें जग जाणतेंच. 'गीताञ्जली'ला नोबेल पारितोषिक मिळून रवीन्द्र, वंग भाषा आणि भारत यांचें यश त्रिखंडांत दुमदुमलें.

कविता हें अंतरात्म्याच्या प्रगतीचें साधन आहे हें रवीन्द्रांचें आवडतें तत्त्व होतें आणि आमरण त्यांनीं त्याचाच ध्यास घेतला. कलेचा उपासक आपल्या आत्म्यावर संस्कार करून त्याला लयबद्ध करतो. संसाराच्या जंजाळांतून मुक्ति मिळविण्याची जशी जीवाची धडपड चालू असते तशी साहित्याच्या जीर्ण संकेतांना रजा देऊन कांहीं नव्या मोकळ्या वातावरणांत हिंडावें असें कवीला वाटत असतें. जुन्या छंदांचेंहि बंधन त्याला जाचक होऊं लागतें. रवीन्द्रांच्या पूर्वी मायकेल मधुसूदन दत्त यांनीं छंदाला नवीन वळण देण्याचे प्रयोग केले. पण रवीन्द्र या बाबतींत विशेष बंडखोर होते. संस्कृत साहित्यांतल्या वृत्तांत ते सफाईनें लिहूं शकले असते. पण 'पायर' या लोकप्रिय 'वंगीय' छंदाचा वापर करून त्यांनीं काव्याच्या रचनेंत अनेक

प्रयोग केले आणि लोकगीतांच्या व्यापक बैठकीवर कवितांची नवी घडण सुरू केली. मात्र या बंडखोरींत गणमात्रांना साफ बाजूला करण्याची वृत्ति नव्हती. गणमात्रांशीं मैत्री जोडून त्यांना आपल्या कल्पनेप्रमाणें नवे नवे आकार व बंध देण्याची करामत रवीन्द्रांनीं दाखविली आहे.

रवीन्द्रांनीं कवितालेखन विपुल प्रमाणांत केलें. सुमारें अडीच हजार कविता त्यांनीं लिहिल्या. पंक्तींची संख्या लाखावर जाण्यास हरकत नाहीं. कित्येक आवडत्या कल्पना त्यांनीं पुनः पुनः थोड्या-फार फरकानें मांडल्या आहेत. परमेश्वर, निसर्ग, प्रेम, विभूति हे साधारणतः त्यांच्या काव्याचे विषय म्हणतां येतील. ‘ गीताञ्जलि ’ हें परमेश्वराविषयींचें त्यांचें काव्य जगद्विख्यातच आहे. देशप्रेमाच्याहि कविता खूप आढळतात. बुद्ध, कालिदास, शिवाजी, बंदा बैरागी इ. महापुरुषांवरील त्यांचीं स्तोत्रें जशीं विभूतिपूजे-विषयींच्या भावनेनें भरलेलीं आहेत, त्याचप्रमाणें भारतीय इतिहास-संस्कृतीच्या अभिमानानें ओथंबलेलीं आहेत. ‘संध्या-संगीत,’ ‘सोनार-तरी ’, ‘बलाका’, ‘ फाल्गुनी ’, ‘ पूरबी ’, ‘ चैताली ’ या काव्यसंग्रहांच्या नांवावरूनसुद्धां त्यांच्या निसर्गप्रेमाची सहज कल्पना येईल. प्रेम-कवितांत विरह आणि प्रतीक्षा, हुरहूर आणि उत्कण्ठा या रवीन्द्रांच्या विशेष प्रिय असलेल्या वृत्ति होत. पण निसर्ग असो, विभूति असो, किंवा प्रेम असो अंतरात्म्याची विशाल होण्याची, विश्वात्मक बनण्याची धडपड हाच त्यांच्या कवितांतला स्थायीभाव म्हणतां येईल. अंतरंगांतलें पांखरूं पंख पसरून उडण्यासाठीं आतुर झालेलें आहे. त्याला सृष्टीच्या अगाध आश्चर्यांत बुडी घ्यायची आहे, दिक्कालाच्या सीमा ओलांडून जायचें आहे, आणि अमृतत्त्वाच्या सागरांत डुंबायचें आहे हाच रवीन्द्रांच्या कवितांतला खरा खरा आशय आहे. हा आशय पूर्ण कळला तरच रवीन्द्रांच्या कवितांचें खरें रसग्रहण करतां येईल.

रवीन्द्रांची कविता गूढ आहे, पण दुर्बोध नाहीं. दुपारच्या भगभगीत उन्हांत प्रत्येक वस्तु स्पष्ट दिसते. असला रखरखीत वास्तववाद रवीन्द्रांनीं मांडला नाहीं. त्यांनीं उभारलेल्या सृष्टीवर पौर्णिमेचेंहि नव्हे तर शुक्ल पक्षांतल्या अष्टमीचें चांदणें पसरलें आहे. अशा चांदण्यांत वस्तूचा आकार दिसला तरी रंग दिसतोच असें नाहीं. नुसत्या आकारावरून आणि अस्पष्ट रंगांवरून कल्पनाशक्ति किती तरी प्रज्वलित होते. ती अनेकविध चित्रें

रंगवूं लागते. दुपारच्या उन्हांत एखादा पर्वताचा सुळका आहे तसाच दिसेल इतकेंच. परंतु मंद चांदण्यांत तो कधीं ढगासारखा, तर कधीं हत्तीसारखा भासेल. किंवा एखाद्या किल्ल्याचा बुरूज पुढें असल्यासारखा वाटेल. रसिक जितका कल्पक किंवा संवेदनाक्षम असेल तितके त्याला अधिक मनोरम भास होतील. उत्तम काव्य सूचक असतें, गूढ असतें. आणि त्या काव्याच्या ज्योतीवर आपल्या कल्पनेच्या फुलवाती लावून हवी तेवढी आरास करतां येते.

> "हे अंधारांतील सहचरा, तुझ्या करुण हातावर मी माझी
> राखी बांधून दिली आहे."

ही पंक्ति वाचल्यानंतर त्यांतील प्रतिमेनें रसिकागणिक वेगवेगळ्या संवेदना होणें शक्य आहे. या ठिकाणीं अंधारानें एका अदृष्ट व अगाध सृष्टीचें भव्य चित्र डोळ्यापुढें उभें केलें आहे. राखी बांधणें म्हणजे ऋणानुबंध जोडणें हा स्थूल अर्थ झाला. पण या ऋणाबंधाच्या सूक्ष्म नाजुक छटा ज्याला पाहिजेत तशा त्यानें घ्याव्या. आणि सहचराचीहि हीच गोष्ट नाहीं का ? रवीन्द्रांना हा सहचर मृत्यु वाटला असावा. पण आपापला आप्त ज्याला त्याला या सहचराचे जागीं दिसेल. काव्यांतील गूढतेचें सामर्थ्य तें हेंच.

केवळ चित्र किंवा प्रतिमाच नव्हे तर अनुभूति सुद्धां एकाच काव्यांतून अशाच विविध व हृदयंगम रीतीनें घेतां येतात.

> "हे सुंदरा ! तूं आज पहाटे आलास – घरांतला अंधार कसल्या
> तरी आनंदानें कंपित झाला. कुठल्या तरी अनाहत नादानें माझी
> वीणा वाजूं लागली. माझें स्वप्न मोहक सुगंधानें भरून गेलें."

हें एक भक्तिगीत आहे. हा आध्यात्मिक अनुभव आहे. पण रवीन्द्रांनीं तो सामान्य रसिकालाहि आपलासा वाटेल असा सुगम आणि सुभग केला आहे. प्रिय व्यक्तीच्या आगमनानें अशा तऱ्हेचा चमत्कार झालेला कुणाहि सहृदय माणसाच्या अनुभवाला येईल. पण ही प्रतिमा धूसर आहे, गूढ आहे. दुर्बोध मात्र नाहीं. रवीन्द्रांचें हें वैशिष्ट्य म्हणा किंवा दोष म्हणा पण त्यांची सर्व कविता याच प्रकारची आहे.

रवीन्द्र पराकाष्ठेचे निसर्गप्रेमी आहेत. पण एका इंग्रजी ग्रंथकारानें वर्णन

केल्याप्रमाणें रवीन्द्रांचा निसर्ग मानवी समाजापासून दूर नाहीं. मानवी जीवनाला त्यानें पार्श्वभूमीच नव्हे तर रस पुरविला आहे. रवीन्द्रांच्या काव्यांत नद्या येतात. पण त्या नद्या निर्मनुष्य नाहींत. त्यावर लहान-मोठ्या होड्या फिरत आहेत. नाविक विचित्र हेलांत गाणीं गातांना दिसतात. रथयात्रेसाठीं जमलेल्या लोकसमूहाला रवीन्द्र ' लोकारण्य ' म्हणतात. आपली सुंदर संस्कृति हीच मुळीं अरण्यांत जन्माला आली असें त्यांचें मत आहे.

त्यांच्या कवितांतील उपमा—अलंकारांतून त्यांचें मन वन-उपवनाशीं किती एकजीव झालें आहे तें दिसून येतें. ' निर्झराचा स्वप्नभंग ' किंवा ' सोन्याची नौका ' अशा त्यांच्या कवितांत सृष्टिप्रेमाचा अपूर्व विलास तर दिसतोच. पण त्यांच्या लहान लहान कणिकांतहि याच्या उत्कृष्ट छटा आढळतात.

फूल विचारतें, " फळा, तूं कुठें आहेस ? "
फळ उत्तर देतें, " मी तुझ्या हृदयांतच आहें. "

× × ×

काल रात्रीच्या वादळानें आज सकाळच्या उषःकालाला
सोनेरी मुलामा दिला.

× × ×

" संध्येबरोबर मीं तुला पत्रें धाडलीं. " असें सूर्य म्हणाला.
" सकाळीं पृथ्वीजवळ दवबिंदूंच्या रूपानें मीं त्यांचीं उत्तरें
दिलीं. " रजनीनें सांगितलें.

या निसर्गवर्णनात्मक पंक्ति मानवी भावनांना किंवा प्रसंगांना जोडून, जिव्हाळ्याचा अर्थ कसा काढावा हें रसिकाला सांगावें लागणार नाहीं. चिंतनाचें थोडेंसें रसायन टाकलें तरी या पंक्तींतल्या काव्याचें प्रत्यक्ष जीवनांत रूपांतर झाल्याचा प्रत्यय येईल. कणिका किंवा क्षणिका हें रवीन्द्रांच्या अफाट काव्यसंभारांतलें एक स्वतंत्र व सुंदर दालन आहे. कविमनांत कित्येकदां एखादीच कल्पना किंवा तरंग उठून जातो. या कल्पनेला किंवा विचारतरंगाला एखाद्या मोठ्या गीतांत किंवा खंडकाव्यांत

स्थान देतां येईलच अशी स्थिति नसते. ही कल्पना किंवा विचारतरंग स्वतंत्र व स्वयंभू असतो. म्हणून लगेच तो शब्दरूप करून टाकावा असें कवीला वाटतें. सुभाषित किंवा अभंग हा काव्यप्रकार असाच निर्माण झाला आहे असें म्हणतां येईल. कणिका त्याच जातीची. मात्र तिच्यांत विविधता हवी तेवढी आणतां येते. सुभाषिताप्रमाणें तींत अर्थचमत्कृति किंवा नीति-बोध असलाच पाहिजे असें नाहीं. त्याचप्रमाणें अभंगाप्रमाणें भावना कांठोकांठ भरून वाहायला पाहिजेत असेंहि नाहीं.

" चूक आंत शिरूं नये म्हणून आपण दार लावून घेतों. पण
सत्य विचारतें,
' मी कुठून आंत शिरायचें ? ' "

अशा तऱ्हेचा एखादा सुंदर विचार कणिकांत असेल. किंवा—

" माझें काम कोण हातीं घेणार ? " मावळत्या सूर्यानें विचारलें.
पृथ्वी चित्रासारखी स्वस्थ बसली. इतक्यांत पणती म्हणाली,
" महाराज, माझ्या शक्तीप्रमाणें आपलें काम मी करीन. "

असें मनोहर रूपक असेल.

" हे मूक शक्ति कोण आहेस तूं ? " प्रेमलतेनें विचारलें.
अश्रुपूर्ण डोळ्यांतून उत्तर आलें–" मी कृतज्ञता. "

भावनांना असें काव्यमय रूपहि कणिकांत देतां येतें. रवीन्द्रांची अशी काव्य-संपदा संख्येनें आणि गुणांनीं विपुल आहे. ' स्टे बर्डस् ', ' फ्रूट गॅदरिंग ', ' फायर फ्लाइज् ' इ. इंग्रजी संग्रहांतल्या कणिका पुनः पुनः वाचण्यासारख्या आहेत. या स्फुट काव्यप्रकाराला ' मुक्तक ' हें एका व्यासंगी टीकाकारानें दिलेलें नांव फार समर्पक वाटतें. मुक्तक म्हणजे लहान मोती. लहान मोत्याप्रमाणें एक एक स्वतंत्र कल्पना, भावना किंवा विचार प्रकट करणारी कविता म्हणजे मुक्तक. कणिका हा मुक्तकाचा सर्वोत्कृष्ट नमुना होय. रवीन्द्रांच्या कित्येक कविता डायनामेटच्या फटाकड्याप्रमाणें प्रक्षोभक आहेत. विचारांना चालना देण्याचें सामर्थ्य त्यांत अफाट आहे. याच्या उलट दवबिंदूसारख्या शीतल व मोहक कणिकाहि ठायीं ठायीं आढळतात.

गार्डनर ही त्यांची कृति विशेष प्रसिद्ध आहे. ' गीताञ्जलि ' हा ग्रंथ जर भक्तीचा मळा असें म्हटलें तर गार्डनर हें प्रणयाचें उद्यान आहे. परंतु

रवीन्द्रांची प्रणयविषयक कल्पना ही इतकी उदात्त आहे कीं, त्या कल्पनेच्या सीमा अखेर भक्तीलाच जाऊन मिळतात. गीताञ्जलींत भक्तीला कुठें कुठें मधुर भावाची सूक्ष्म छटा दिलेली आढळते. गार्डनरमध्यें प्रणयगीतावर अनेक ठिकाणीं भक्तीचा साज चढविला आहे. गार्डनरमधील प्रियकर हा जवळ जवळ देवासारखाच आहे. प्रणयाच्या चित्रांत कुठेंहि भडकपणा येत नाहीं. जड किंवा स्थूल जें असेल तें चैतन्ययुक्त आणि सूक्ष्म करण्याची रवीन्द्रांची हातोटी प्रसिद्ध आहे. गार्डनरमध्यें याचा उत्तम विलास पहावयास मिळतो.

" ती माझ्याजवळ कुंपणाला कलिका जशी चिकटावी तशी ती माझ्या सन्निध राहते. थकलेल्या गात्रांना जशी निद्रा तशी ती मला प्रिय आहे. "

" हे प्रवाशा तूं मला सोडून जातोस ? तुला अडविण्याकरितां गीतांच्या शृंखलाखेरीज माझ्याजवळ दुसरें काय आहे ? "

हे दोन उतारे पाहिले तर गोचर आणि अमूर्त हे परस्परांत एकजीव करून टाकण्याची रवीन्द्रांची कला किती उच्च दर्जाची आहे हें दिसून येईल.

रवीन्द्र हे सृष्टींतील सौंदर्यावर मोहित होतात. त्याचप्रमाणें संस्कृतींतील सौंदर्यहि त्यांना भुरळ पाडतें. प्राचीन महाकाव्यांत ज्या अनन्यसुंदर अशा व्यक्तिरेखा आहेत त्यांचा प्रभाव रवीन्द्रांच्या मनावर फार पडला आहे. या व्यक्तिरेखांना पुराणाच्या संदर्भांतून काढून एक नवें सौंदर्य आणि आशय देण्याचा प्रयत्न रवीन्द्रनाथांनीं केला आहे. त्यांनीं आपल्या " काव्यसृष्टींतील उपेक्षिता " या हृदयंगम लेखांत रामायणांतील उर्मिलेला एक नवी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. अयोध्येच्या अंत:पुरांत एका कोपऱ्यांत निःश्वास सोडीत बसलेली ही रम्य विरहिणी रवीन्द्रांनीं साहित्याचा झोत टाकून सर्वांचा आदरविषय बनविली. हेंच त्यांनीं काव्यामध्यें उर्वशीच्या बाबतींत केलें आहे. पुरुरव्याला मोह पाडणारी अप्सरा याखेरीज अधिक माहिती या स्वर्गांगनेबद्दल फार थोड्यांना असते. पण या उर्वशीवर रवीन्द्रांनीं उत्कृष्ट स्तोत्र रचून तिला भारतीय वाङ्मयांत वेगळीच प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. मनुष्याचें मन सतत सौंदर्याच्या शोधांत असतें. चिरयौवनाचा ध्यास त्याला लागलेला असतो. ज्याचे मनोहर रंग कधीं फिकट होणार नाहींत अशा तऱ्हेची एखादी कल्पना तो सतत शोधीत असतो. उर्वशी हें

या सौंदर्यसंशोधनाचें एक फळ आहे. मानवी प्रतिभेनें निर्माण केलेलें हें चिरयौवनाचें आणि शाश्वत सौंदर्याचें प्रतीक आहे.

रवीन्द्रांच्या विशाल काव्यसृष्टीचें हें ओझरतें दर्शन आहे. रवीन्द्रांच्या कित्येक कल्पनाच नव्हे तर कित्येक वळणें सुद्धां पुनः पुनः येतात. महाकवि कालिदासाला ते विचारतात, "कुठल्या अज्ञात वर्षीं आषाढाच्या स्निग्ध अशा पहिल्या दिवशीं हें मेघदूत काव्य तूं रचलेस ?" हाच प्रश्न छत्रपति शिवाजी महाराजांनाहि ते करतात. "स्वतंत्र राज्याची ही अभिनव कल्पना तुम्हांला केव्हां सुचली ?" दवबिंदू हे अश्रु आहेत, प्रीतीचा उद्गार हा शब्दातीत असतो, हृदयवीणेवर कुणी झंकार देतो — अशा किती तरी कल्पना पुनः पुनः भेटतात. कित्येक प्रतिमा अस्पष्ट असतात. डोळ्यांतील रंगाला ते करुण म्हणतील. तसेंच सहचराच्या करकमलालाहि तेंच विशेषण लावतील ! त्यांच्या कित्येक कवितांनीं मन उत्तेजित किंवा विकंपित होतें, परंतु तें आश्वासित होत नाहीं. मनावरून एखादी गोड वायुलहरी निघून गेल्यासारखें वाटतें. मनाच्या तळापर्यंत ती जातेच असें नाहीं.

पण असें असलें तरी रवीन्द्र हे रससिद्ध या नात्यानें अजरामर आहेत यांत वाद नाहीं. आत्मनिष्ठेच्या भूमीवरून त्यांचें कल्पनायान एकदम विश्वप्रेमाच्या अंतराळांत चढतें. चराचर सृष्टींत भरून राहिलेल्या चैतन्याशीं मानवी मनाला समरस करून टाकण्याचा विलक्षण गुण त्यांच्या कवितेंत आहे. शब्दांत जें वर्णिलें आहे त्यापेक्षां किती तरी अधिक सूचित होतें. रवीन्द्र एखाद्या कवितेनें माणसाला एका अद्‌भुत सृष्टीच्या महाद्वारांत आणून सोडतात आणि मग त्याच्या जाणिवेची जितकी कुवत असेल तितका तो त्या सृष्टीच्या आंत विहार करूं शकतो. या काव्याला परतत्त्वस्पर्श झाला असल्यानें आतां त्याला जरा-मरणाचें भय राहिलेलें नाहीं.

★

# गीताञ्जलि

" हे माझ्या हृदयानंदा ! तुला ओळखल्यामुळें माझें हृदय विशाल झालें आहे. कुठल्या कोपऱ्यांत पाहूं तुला ? कुठें कोपराच उरला नाहीं. सर्वत्र अनंत आहे. "

रवीन्द्रवाङ्मयांतला कोहिनूर म्हणजे गीताञ्जलि. ही १०३ भक्तिगीतांची ओंजळ आहे. ही रवीन्द्रनाथांची वाङ्मयमूर्तीच म्हणतां येईल. गीताञ्जलींतलीं गीतें रवीन्द्रांनीं एखादें सूत्र धरून लिहिलेलीं नाहींत. तो एक संग्रह आहे. नैवेद्य, खेया, चैताली इ० आपल्या अनेक बंगाली संग्रहांतून रवीन्द्रांनीं हीं गीतें निवडलीं आणि तीं स्वतः अनुवादित केलीं. भक्तिगीतांच्या या संग्रहाला अभूतपूर्व लोकप्रियता लाभली. देशाच्या सरहद्दी ओलांडून रवीन्द्रांची कीर्ति जगाच्या कोनाकोपऱ्यांत गेली आणि या संग्रहाला नोबेल पारितोषिक मिळून भारताची मान जगांत उंचावली. रवीन्द्रांना ' आशियाचे महाकवि ' म्हणून पाश्चात्त्य राष्ट्रें ओळखूं लागलीं आणि या प्राचीन देशांत केवढी प्रतिभासंपदा आहे याचा प्रत्यय जगाला आला. खरोखर उमर खय्यामच्या रुबायानंतर आशिया खंडांतलें कुठलेंहि पुस्तक गीताञ्जलीइतकें पाश्चात्त्यांनीं डोक्यावर घेतलें नसेल !

१९१२ सालीं युरोपला रवीन्द्र गेले. परदेशपर्यटनाची ही तिसरी वेळ होती. यापूर्वीं थोडेच दिवस आधीं रवीन्द्रांचा सुवर्ण-महोत्सव साजरा

झाला होता. कलकत्त्याच्या नगरभवनांत त्यांचा सत्कार करण्यांत आला. आपल्या राष्ट्रीय कवीचा एवढा बहुमान भारतीय जनतेनें केला असा हा पहिलाच प्रसंग ! लहान-थोर, उच्चनीच, नाना मतांचे पंथांचे लोक या सत्कारासाठीं एकत्र आले होते. या समारंभाच्या हकीकती सर्वत्र प्रसिद्ध झाल्या आणि परदेशांतहि रवीन्द्रांबद्दलचें कुतूहल फुलविलें गेलें. रवीन्द्रांचें उंची व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या काव्यांतील सौंदर्य यांकडे पाश्चात्त्य जग विशेष आस्थेनें पाहूं लागलें.

रवीन्द्र विलायतेस पोहोंचले त्या वेळीं ते थोडेसे खिन्नच होते. जी अनामिक उदासीनता कविहृदयाला मधून मधून व्यथित करते, तिनें तें हैराण झाले होते. अशा वेळीं इंग्लंडच्या वास्तव्यांत संध्याकाळी त्यांच्या अंगावर येत. विरंगुळा म्हणून विल्यम रोदेस्टिन या प्रसिद्ध चित्रकाराकडे ते जात. सुयोग असा कीं, रवीन्द्रांच्या प्रतिभेची उंची मोजूं शकणारीं टोलेजंग माणसें त्यांना या चित्रकाराच्या घरीं भेटलीं. प्रसिद्ध दार्शनिक बर्ट्रांड रसेल, इतिहासज्ञ एच्. जी. वेल्स, टीकाकार स्टॅफोर्ड ब्रुक, पत्रपंडित नेव्हिनसन् यांचा परिचय झाला. पुढील आयुष्यांत रवीन्द्रांच्या अनेक चळवळींत ज्यांनीं सहृदयतेनें सहकार्य केलें ते दीनबंधु अँड्रयूज त्यांना येथेंच भेटले आणि सुप्रसिद्ध आयरिश कवि डब्ल्यू. बी. यीटस् यांची येथेंच ओळख झाली.

ही ओळख रवीन्द्रांच्या कीर्तिमंदिरावर कळस चढविण्यास कारणीभूत झाली असेंच म्हटलें पाहिजे. कारण गीताञ्जलीचें रवीन्द्रांनीं केलेलें इंग्रजी भाषांतर यीटस्ना वाचायला मिळालें. आणि यीटस् त्या काव्यानें मंत्रमुग्ध होऊन गेले. रेल्वेमधून प्रवास करतांना किंवा बसमधून जातांना यीटस् ‘ गीताञ्जलि ’ वाचत बसत. त्या नादांत ते भोवतालचें जग विसरून जात. मग त्यांच्या लक्षांत येई कीं, तल्लीनपणें आपण पुस्तक वाचत असतांना आजूबाजूचीं माणसें कुतूहलानें आपणाकडे पहात आहेत. लगेच ओशाळून ते पुस्तक मिटून घेत. परंतु मनांत मात्र गीताञ्जलींतल्या कवितांतली शब्दचित्रें कल्पनाफलकावर पुनः पुनः रंगवीत गुंग होऊन जात. “ मी माझ्या जन्मभर जी सृष्टि अंतश्चक्षूंनीं पहात आलों ती काव्यांत प्रकट झलेली मला दिसली. ” असे उद्गार त्यांनीं काढले. यीटस्नीं लिहिलें आहे, “ अनेक

पिव्या गेल्या तरी गीताञ्जलींतलीं गीतें लोकप्रियच राहतील. प्रवासी राजमार्गावर वाटचाल करतांना तीं गुणगुणतील. माणसें नौकाविहार करतांना तीं म्हणतील. प्रिय व्यक्ति एकमेकांची मार्गप्रतीक्षा करीत असतां तीं आपल्या मनांत घोळत राहतील. आणि परमेश्वरी भक्तीच्या या अद्भुत जलाशयांत आपली कामना धुऊन तिला अक्षय्य तारुण्य प्राप्त करून देतील. "

गीताञ्जलीची टंकलिखित प्रत रवीन्द्रांना परत करतांना स्टूफोर्ड ब्रुक यांनीं लिहिलें—" मी कविता परत करीत आहें. केवळ संतोष व आदर यांपेक्षां किती तरी उच्च भावनेनें मी त्या वाचल्या. आत्मिक उन्नतीस त्या साहाय्यक झाल्याबद्दल कृतज्ञता वाटली. त्यांनीं आनंद आणि सौंदर्य यांचा मनावर खोल ठसा उमटविला. " असे अनेक मोठ्या लोकांचे अभिप्राय पडले. यीटस् हे विशेष नादावून गेले होते. त्यांनीं रवीन्द्रांना मानपत्र देण्याचें ठरविलें आणि उत्साहानें तो कार्यक्रम घडवून आणला. या कार्यक्रमास इंग्लंडमधील विख्यात व्यक्ती उपस्थित होत्या.

या सर्व प्रशंसेमुळें नोबेल पारितोषिक-समितीचें लक्ष गीतांजलीकडे वेधलें आणि त्या समितीनें आधुनिक जगांतला तो सर्वोच्च मान रवीन्द्रांना द्यायचें ठरविलें. नोव्हेंबर १९१२ च्या सायंकाळीं हा निर्णय जाहीर होतांच भारतांत तर आनंदी आनंद झालाच, पण चोहींकडेच प्रतिभेचे खरे चहाते फार हर्षित झाले ! स्वीडनमधील एक धर्मगुरु म्हणाले, " द्रष्टा आणि कलाकार या दोन्ही भूमिका रवीन्द्रांच्या ठिकाणीं एकत्र झाल्या आहेत. नोबेल पारितोषिकाला इतका लायक मानकरी यापूर्वी मिळाला नव्हता. " पाश्चात्त्य देशांत बहुतेकांची हीच भावना होती.

' शांतिनिकेतनां 'त ही वार्ता येतांच कसा महोत्सव झाला याचें साधें पण सुंदर वर्णन श्यामकान्त सरदेसाई यांनीं केलें आहे. शामकान्त हे स्वतः त्या वेळीं शांतिनिकेतनमध्यें विद्यार्थी होते. आपल्या मातेला लिहिलेल्या पत्रांत हा मुलगा म्हणतो :

" दोन दिवसांपूर्वीं आम्ही सगळेजण रात्रीं जेवावयास बसलों असतां विलायतेहून दहा-बारा तारा येऊन पोंचल्या कीं, जगांतील सर्वांत मोठ्या कवीला प्रत्येक वर्षीं बक्षीस देण्यांत येतें तें रवीन्द्रनाथांना आज मिळालें. बक्षीस आठ हजार पौंड म्हणजे एक लक्ष वीस हजार रुपयांचें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

आशिया खंडांत तें कधीं कोणाला मिळालेलें नाहीं. यावरून रवीन्द्रनाथ केवढे सन्माननीय आहेत तें समजून येतें. ते नेहमीं शांत व गंभीर असतात. हा सन्मान रवीन्द्रनाथांना मिळाला म्हणून आम्हांला सुटी देण्यांत आली आहे. सर्व मुलांना अत्यंत आनंद झाला होता. काल सकाळीं प्रार्थनेच्या वेळीं गुरुदेव म्हणाले, 'देव आमच्या हातून मोठमोठीं कामें करवितो व लोक त्याबद्दल आमची प्रशंसा करतात. पण याबद्दल आपण स्वत: जर गर्व करूं लागलों तर आपला समूळ नाश होईल. सबब जेव्हां आपणांस मोठा सन्मान मिळतो तेव्हां आपण ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे कीं, हे ईश्वरा, हा जो सन्मान मला मिळाला तो माझा नव्हे, परंतु तुझें तूंच माझ्या हातून हें काम करविलेंस.' प्रार्थनेनंतर आम्ही येथून जवळच सुरूल वनांत वनभोजनास गेलों होतों."

"काव्यें कवीचीं जगतांत गावीं। त्याचेंच त्याच्या परि चोज गांवीं" असें पुष्कळदां होतें. रवीन्द्रांना नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर बंगालमधील सुमारें ५०० प्रमुख मंडळी त्यांना भेटायला गेली. रवीन्द्राना माहीत होतें कीं, या समूहांत फार थोडे आपल्या कवितेचे प्रथमपासूनचे चहाते आहेत. परकीयांनीं आपणांस मान्यता दिल्यामुळेंच यांपैकीं बहुतेकांना आतां आपला उमाळा आला आहे. ते त्रस्त मनानें कांहीं वैतागाचे शब्दहि बोलले. मात्र तो वैताग उच्च पातळीवरचा होता. आपल्या राष्ट्रांतील कर्तृत्व किंवा प्रतिभा याची आपणांस दखल नसावी आणि परकीयांनीं आपल्या कर्तृत्वाचें चीज केल्यावर मग आपण त्याविषयीं अभिमान धरूं लागावें यामागें जी परावलंबी व गुलामी मनोवृत्ति होती ती रवीन्द्रांना तिरस्करणीय वाटली.

परंतु ही मनोवृत्ति घालविण्यासहि रवीन्द्रांचेच श्रम कारण झाले यांत शंका नाहीं. कलाकत्ता विद्यापीठानें खास अधिवेशन भरवून रवीन्द्रांना 'डॉक्टरेट'ची पदवी अर्पण केली आणि डाक्का, उस्मानिया इ. विद्यापीठेंहि या कामीं पुढें सरसावलीं. सरकारनेंहि 'सर' हा किताब देऊन रवीन्द्रांचा गौरव केला. नोबेल पारितोषिक हा अशा रीतीनें रवीन्द्रांच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदु ठरला. आणि पुढें त्या पातळीच्या खालीं त्याच्या जगन्मान्यतेचा आलेख कधींच आला नाहीं.

असा अपूर्व लौकिक मिळवून देणारी 'गीताञ्जलि' भक्तिरसाची मूस

आहे. या गीतमालेंत सहजोद्गार आहे; कल्पनारम्य चित्रें आहेत; प्रार्थना आहे; विरहवेदना आहे; प्रीति आहे आणि भक्तिहि आहे. येथें भक्त आणि भगवंत यांच्यांतल्या नात्याला प्रीतीचें माधुर्य आलें आहे, तर प्रेममय चित्रांना अध्यात्माच्या वलयांनीं सुशोभित केलें आहे. आणि सर्वांखालून अद्वयानंदाचा गुप्त झरा वहात आहे.

भारतांतलें आदर्श वाङ्मय परमेश्वरभक्तीनें नटलेलें दिसतें. मात्र हा परमेश्वर एखादें दूरस्थ तत्त्व नाहीं. तो आमच्या घरांत आणि मंदिरांत सारखाच भरून राहिला आहे. आमचीं भक्तिगीतें हींच आमचीं प्रेमगीतें आहेत असें रवीन्द्र म्हणत. आमचें वाङ्मय रहस्यमयतेचा पडदा उलगडून त्यापलीकडील महान् तत्त्वाला स्पर्श करतें. या परतत्त्वस्पर्शानें सामान्याचा सुसंस्कृत माणूस होतो आणि सुसंस्कृत माणसाचा देव बनतो. या स्पर्शासाठीं आसावलेल्या भाविक हृदयाचें मनोहर चित्रण गीताञ्जलींत केलें आहे.

मर्यादित अशा मानवी जीवनांत अमर्याद परमेश्वराचा अनुभव घेणें हें रवीन्द्रांचें ध्येय होतें. श्रीरामकृष्ण म्हणत, " अत्यंत आतुर होऊन तुम्ही ज्या उत्कटतेनें प्रियेची वाट पहातां त्या उत्कटतेनें जर तुम्ही परमेश्वराची वाट पाहिलीत तर तो खासच तुम्हांला भेटायला येईल. " या उत्कट मार्गप्रतीक्षेचें हृदयंगम चित्र गीताञ्जलींत ठिकठिकाणीं आढळतें.

प्रपंचाचीं कामें करीत असतां भोंवतीं गोंधळ, गलबला चालला आहे. भक्त म्हणतो, "अशा वेळीं शांतिदेवा ! विश्रांति आणि शांति घेऊन ये. " कित्येकदां भक्त मंदिराच्या बाहेर उभा असतो. पूजेची तयारी केलेली असते, परंतु परमेश्वर येतच नाहीं, आणि येणारे जाणारे लोक मात्र त्या भक्ताकडे हंसून पाहतात. भक्त अशा वेळीं भिकारणीप्रमाणें तोंडावर बुरखा घेऊन बसतो. कित्येकदां भक्त असें म्हणतो कीं, तूं माझा देव आहेस म्हणून मी आदरानें तुझ्यापासून दूर राहतों– अशा उत्कंठेचीं चित्रें फार बहारदार आहेत.

पण गीताञ्जलींतला भक्त हा केवळ उत्कंठेंतच बुडून जातो असें नाहीं. कित्येकदां, त्याला परमेश्वराचें दर्शन अथवा साक्षात्कार होतो. तो म्हणतो, कीं, " एके दिशीं पहांटे तूं अरुण रंगाचें फूल घेऊन माझ्या घरीं आलास, त्या वेळीं माझ्या घरांतील अंधाराला कंप सुटला आणि माझी वीणा

(कुणीहि तिच्यावर बोटें फिरविलीं नसतांना) एकदम झंकार करूं लागली." अशा तऱ्हेचे उल्लेख गीताञ्जलींत पुष्कळ आहेत. भक्त एका कांठावर उभा आहे. आणि त्याच्या कानांत बांसरीचे सूर येत आहेत असे भास कित्येकदां भक्ताला होतात.

गीताञ्जलीच्या भक्तिरसांतील आणखी एका वैशिष्ट्याबद्दल थोडेंसें सांगितलें पाहिजे. भक्त हा—प्रियतमा असून परमेश्वर हा प्रियतम आहे—या भूमिकेवर आधारलेलीं कांहीं सुंदर गीतें गीताञ्जलींत आहेत. भक्तीच्या या प्रकाराला मधुरभाव असें म्हणतात. ज्ञानेश्वरांनीं "तो वल्लभा मी कांत' असे शब्द श्रीकृष्णाच्या तोंडीं घातले आहेत, त्यांत हाच आशय आहे. ह्यांत एक प्रकारचा उच्च दर्जाचा प्रणय असतो. स्त्री ही भक्तीची केवळ मूस आहे. किंबहुना स्त्रीच खरी भक्ति करूं शकते. म्हणून मोठाल्या भक्तांनीं मनानें स्त्रीरूप धारण करून परमेश्वराला पति मानलें आहे. सूरदास, चैतन्य, रामकृष्ण किंवा गुलाबराव महाराज ही संतमंडळी या मधुरभावानें धुंद झाली. हा भाव अत्यंत उच्च दर्जाचा असतो. म्हणूनच वासनाशून्य झाल्याशिवाय ही साधना करूं नये असें विवेकानंदांसारख्या तत्त्वज्ञांनीं सांगितलें आहे. रवीन्द्रनाथांच्या गीताञ्जलींत नवविधा भक्ति निरनिराळीं सुंदर रूपें घेऊन प्रगट झाली आहे. कांहीं ठिकाणीं त्यांत मधुरभावाच्या छटा तर अत्यंत रमणीय आहेत. वानगीदाखल पुढील दोन गीतें पहा :

"प्रियकरा, तुम्ही उषःकालीं माझ्या कानांत सांगितलें कीं, आपण दोघे एका नौकेंत बसून जाऊं. ज्या ठिकाणीं कुणाचीहि नजर पोहोंचत नाहीं अशा देशांत तीर्थयात्रेला जायचा तुम्ही संकल्प केला होता. नावेंतून जातांना मी सुस्वर गीत गात बसावें आणि तुम्ही तें आनंदित होऊन ऐकावें असें आपण ठरविलें होतें. परन्तु अजून आपण आलां नाहीं. संध्याकाळ झाली आहे. देवा, तुम्ही कुठें गुंतला आहांत! आपल्या प्रयाणाला प्रारंभ केव्हां होणार?"

"आज मुसळधार पाऊस पडत आहे. सोसाट्याचा वारा सुटला आहे. चोहोंकडे अंधार भरल्यामुळें वातावरण भेसूर झालें आहे. अशा वेळीं हे प्रियतमा! तूं कुठें निघालास? तुझ्या प्रियेच्या भेटीसाठीं जात आहेस काय? मी तुझ्यावर पूर्ण प्रेम ठेवून बसलें आहें. माझी झोप उडाली आहे. तूं

येतोस कीं, काय हें पाहण्याकरितां मीं दार उघडून बाहेर पाहिलें, पण चोहींकडे अंधार असल्यामुळें तुझा मार्ग मला दिसत नाहीं. तुझ्या स्वागतासाठीं, मी उत्सुक होऊन बसलें आहें."

हीं भक्तिगीतें प्रेमानें ओथंबलेलीं असलीं तरी एका उच्च व अशरीर अशा पातळीवर चढलेलीं आहेत. मनुष्याला परमेश्वरदर्शनाची उत्सुकता असते. त्या उत्सुकतेचें सौंदर्य आणि खोली अशा गीतांतून प्रगट झालेली दिसते. भक्ति कुठलीहि सुंदरच ! परंतु ती प्रगट करण्याच्या शक्तीवर तिच्या सौंदर्याचें आकलन होणें फार अवलंबून असतें. रवीन्द्रनाथांच्या ठिकाणीं ही शक्ति अफाट होती म्हणूनच आपल्या भक्तीला ते इतकें उत्कृष्ट काव्यरूप देऊं शकले.

पाश्चात्त्य जगांत एकोणिसाव्या शतकामध्यें विज्ञानाची प्रगति फार झाली. मनुष्याला असें वाटूं लागलें कीं, आपण आतां कर्तुमकर्तुम् झालों. सृष्टीचीं कांहीं रहस्यें कळल्यामुळें गूढ असें कांहींच उरलें नाहीं असा त्याचा ग्रह झाला. अर्थात् गूढतेमुळें ज़ी ईश्वरविषयक श्रद्धा होती ती कोलमडली. पण निसर्गावर विजय मिळविल्यानेंहि मनुष्याला शांति अशी लाभेना. राधाकृष्णन् यांनीं म्हटल्याप्रमाणें माणूस माशासारखा पाण्यांत खोल जायला शिकला, पक्ष्याप्रमाणें अंतराळांत वावरूं लागला, परंतु माणसाप्रमाणें मात्र तो वागूं शकत नाहीं. याच उणीवेमुळें माणूस असंतुष्ट होत गेला. विशेषत: भौतिक संपन्नता जेथें वाढत होती तेथें हा प्रकार विशेष तीव्रतेनें घडूं लागला. केवळ बुद्धि मनाचें समाधान करूं शकेना. निसर्गावरील विजयानें खरा आनंद होईना. रुक्षतेच्या वाळवंटांत सांपडून माणसाला कासावीस झाल्यासारखें होऊं लागलें. अशा वेळीं उपनिषदांतील आनंदकलशांत भक्तीचा मधुर रस भरलेला 'गीतांजलीं'त आढळून आला. ज्यासाठीं शोष पडला होता तें मिळालें आणि त्याचमुळें पाश्चात्त्य जगानें 'गीतांजली'चा एवढा जयजयकार केला.

'गीतांजलीं'त भारतांतील प्राचीन संतकवींचेच पडसाद आहेत, त्यामुळें भारताला या गीतमालेंत फारसें नवें कांहीं नाहीं, असा आमच्या कांहीं टीकाकारांनीं सूर काढला आहे. या स्वयंतुष्टतेंत रवीन्द्रांच्या दिगंत कीर्ती-विषयींचा कांहींसा मत्सर असतो असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. तसें

पाहिलें तर भक्तिगीतांची परंपरा पाश्चात्त्यांतहि नव्हती असें नाहीं. ' गीतांजली 'तलें तत्त्वज्ञान प्राचीन भारतीय दर्शनाशीं एकजीव झालेलें असलें तरी त्याची बैठक नवीन आहे. आशयाइतकेंच शब्दरूपालाहि काव्यांत महत्त्व असतें. म्हणूनच एकाच विषयावरील दोन श्रेष्ठ कवींच्या कविता अगदीं स्वतंत्र व हृदयंगम असूं शकतात. एकाच रामचंद्राच्या चरित्रांत वाल्मीकि, तुलसीदास, आणि मैथिलीशरण यांनीं स्वतंत्र रसोत्कर्ष दाखविला कीं नाहीं ? रवीन्द्रांनीं आपल्या काव्यांत प्राचीन भक्तिपरंपरेची झलक ठिकठिकाणीं दाखविली असली तरी काव्याचा थाट कांहीं वेगळाच आहे. 'रवीन्द्रांनीं देवाला मानवीपण दिलें' हे राधाकृष्णन्‌चे उद्गार खरेच आहेत. 'गीतांजली'त पाश्चात्त्य सौंदर्यवादी कवींच्या वळणाचें द्रव्यहि भरपूर आहे. ' गीतांजली 'तला भक्त हा परमात्म्याचा शोध घेणारा आहे, परमात्म्याच्या साक्षात्कारासाठीं त्याची व्याकुळता प्राचीन संतांइतकीच उत्कट आहे. परंतु या भक्ताला समाजपराङ्मुखता मान्य नाहीं. जेथें शेतकरी नांगर ओढीत आहे आणि कामकरी घण मारून लोखंडाला आकार देत आहेत तेथें परमेश्वर आहे असें त्याला वाटतें. तो एखाद्या प्रियतमेप्रमाणें देवावर अनुरक्त आहे, पण संसाराविषयीं विरक्त नाहीं. आपल्या राष्ट्राच्या पुनरुत्थानाचें स्वप्नहि तो पहात आहे. कीर्तनाच्या रंगांत रंगलेला भक्त येथें समाजाच्या मध्यभागीं येऊन बसला आहे. सत्यसृष्टींत असतांनाहि तो जगाची चाहूल घेत आहे. रवीन्द्रांचें पुढील विख्यात गीत म्हणजे व्यक्ति आणि समष्टि यांच्या सपूर्ण विकासाचा रंगीत आराखडाच होय—

जेथें चित्त निर्भय आहे आणि शिर उन्नत आहे,
जेथें ज्ञान स्वतंत्र आहे,
जेथें संकुचित अशा भिंतींनीं जगाचे शेकडों तुकडे पडलेले नाहींत,
जेथें शब्दाचा उगम सत्यापासून होतो,
जेथें श्रमाला पूर्णतेचें फळ येतें,
जेथें ज्ञानाचा शुद्ध निर्झर रूढीच्या रूक्ष वाळवंटांत लुप्त झालेला नाहीं,
जेथें विचार आणि कार्य यांच्यांत विस्तृत विहार करण्यास मनाला वाव आहे,
त्या स्वातंत्र्याच्या स्वर्गांत हे परमात्मन् ! माझा देश जागृत होवो !

★

# शिशुसृष्टि

"प्रत्येक जन्माला येणारें नवें मूल असा संदेश घेऊन येतें कीं देव अजून माणसाबद्दल निराश झालेला नाहीं."

* * * * * * * *

रवीन्द्रांच्या विशाल काव्यसृष्टींतील सर्वांत लोकप्रिय भाग जर कोणता असेल तर तो शिशुगीतांचा ! जगांतील लोकोत्तर साहित्यिकांत बालमनाचा ठाव ज्यांना घेतां आला असे फारच थोडे निघतील. मानवी जीवनाचीं करुण, उदात्त, रम्य अशीं चित्रें ज्यांना रंगवितां आलीं अशा असामान्य कलाकारांनाहि बाल-मनाच्या गूढ व निरागस हालचालींचें यथार्थ वर्णन करतां आलें नाहीं. क्वचित् एखादी दुसरी शिशूची भूमिका कोणी आपल्या कृतींत रंगविली असेल, पण मुलांचे मनोरथ, त्यांचें अजब तर्कशास्त्र, त्यांच्या तरलसंवेदना या सर्वांतून होणारें रम्यतेचें दर्शन मात्र कुणाला घडवून देतां आलें नाहीं. याबाबतींत रवीन्द्रनाथ हे एक अलौकिक अपवादच आहेत.

वात्सल्याइतका रमणीय शोध निसर्गानें दुसरा लावला नाहीं, असें एका इंग्रजी मानसशास्त्रज्ञानें म्हटलें आहे. मनुष्यांतील तमोगुणावर जर कोणती अजब मात्रा असेल तर ती वात्सल्याची. मनुष्य वात्सल्यानें मुग्ध झाल्यानंतर द्वेष, हिंसा, स्वार्थ इत्यादि विसरतो. परमेश्वरानें माणसाचा उद्धार व्हावा म्हणून जणूं काय घरोघर बाल-रूपानें सामान्य माणसाला मोक्षाचें साधन उपलब्ध करून ठेविलें आहे. परंतु ह्या वात्सल्याला देखील

सामान्य माणूस स्वार्थाचें कुंपण घालतोच. त्याचप्रमाणें आपल्या अहंभावाला पोषक म्हणूनहि वात्सल्याचा वापर तो करीत असतो. मूल आपली मत्ता आहे ही भावना तें सोडूं शकत नाहीं. रात्रीं घरांत आल्यानंतर आपल्या निजलेल्या बालकाच्या गोड मुद्रेकडे डोळे भरून पाहून त्याचें समाधान होत नाहीं. त्या मुद्रेवर उमटणारें हास्य पाहून त्याला कौतुक वाटत नाहीं. तर त्या मुलाला जागें करून, त्याला रडवून तो जेव्हां चुंबनें घेईल तेव्हां त्याला समाधान होतें. असल्या शिशु-कौतुकांत वात्सल्यापेक्षां प्रभुत्वाची भावनाच अधिक प्रभावी आहे असें म्हणावयास पाहिजे.

असल्या संकुचित वात्सल्यभावनेंतून माणसाला वर काढून शिशुसृष्टीकडे विशेष तल्लीनपणें पाहायला लावण्याचें कार्य वर्ड्स्वर्थ, बॅरी, लॅंब किंवा वॉल्टर द-ला मेर यांच्यासारखे कवी आणि साहित्यिक करीत असतात. We are seven ही वर्ड्स्वर्थची सुंदर कविता कोणाला ठाऊक नाहीं ? कवीला एका लहान मुलीला तिचीं दोन भावंडें मृत झालेलीं आहेत हें कांहीं केल्या पटवून देतां येत नाहीं. आत्म्याच्या अमरत्वाबद्दल जणूं तिची श्रद्धा ठाम झाली आहे असेंच वर्ड्स्वर्थनें मोठ्या कुशलतेनें चित्रित केलें आहे. जेम्स बॅरी हा पीटरपॅन या अमर बालकाच्या चरित्रांत रमलेला आहे. त्याच्या एका नाटकांत मूल आईला विचारतें, "आई मी या घरांत प्रथम केव्हां आणि कसा आलों ग ?" तिनें 'रात्रीं' असें उत्तर दिल्यावर तें मूल चटकन् म्हणतें, "मग मी रात्रीं तुला झोपेंतून जागे केलें नाहीं ना ?" या उत्तरांतून निघणारा अभावित विनोद आणि मार्दव किती सुंदर आहे ? चार्लस लॅंब हा मुलांना पऱ्या किंवा देवदूत मानून त्यांच्या मेळाव्यांत जगाला विसरला आणि वॉल्टर द-ला मेल हा मुलांना घेऊन पऱ्यांच्या सृष्टींत गेला. या जगद्विख्यात साहित्यिकांचीं हीं शिशुवर्णनें अत्यंत बहारदार आहेत.

रवीन्द्रांच्या शिशुसृष्टींत हे सर्वत्र आहेच, पण याहून कांहीं वेगळें सौंदर्य त्यांनीं आपल्या शिशुगीतांत ओतलें आहे. "प्रत्येक नवें मूल जन्मास येतांना असा संदेश घेऊन येतें, कीं ईश्वर माणसाबद्दल निराश झालेला नाहीं." असें रवीन्द्रांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. त्यांचीं शिशुसृष्टीकडे पाहण्याची दृष्टि यावरून स्पष्ट होते. मुलाचा जन्म हा एक आनंदाचा

सोहळा आहे तसाच तो दैवी चमत्कार आहे. जग आणि त्याचा निर्माणकर्ता यांच्या ऋणानुबंधाविषयीं विचार करावयास लावणारी ती एक घटना आहे. आई आणि मूल यांचें नातें तर विलक्षण उत्कटतेचें असतें. "मातेच्या अमर्याद प्रेमवित्ताची भिक्षा मिळावी म्हणून हा नयनमनोहर दिगंबर असा चिमुकला योगा सात्विक अपेक्षेनें आपले चिमुकले हात पुढें करून तिच्या सान्निध्यांत असतो." (शिशु) अशा सुभग शब्दांत रवीन्द्रांनीं हें नातें वर्णन केलें आहे. आई आणि आपण यांच्या अद्वैतांतून अधूनमधून बाहेर पडून हा चिमुकला जीव निरनिराळे मनोरथ करीत राहतो. आपण सोनचांफ्याचें फूल होऊन उंचावर बसलों तर आईला काय वाटेल याचा विचार त्याच्या मनांत येतो. आपण मांजरी किंवा पोपट होऊन आलों असतों तर आईनें आपणांस कसें वागविलें असतें, याच्या चिंतनांत तो दंग होतो. कधीं आपण नावाडी व्हावें—व्यापारी होऊन दूर देशीं जावें आणि आईसाठीं-रत्नें मोतीं जहाजांत भरून आणावींत असें त्याला वाटतें. त्याचें कल्पनासाम्राज्य फार मोठें असलें तरी त्याची राजधानी कुठें आहे ती पहा, "आई, माझ्या सम्राटाचा प्रासाद आणि हें सारें दुर्मिळ राजवैभव कुठें आहे हें कुणास ठाऊक नसलें तरी मी तें हळूच तुझ्या कानांत सांगूं? आपल्या घराजवळील सज्जावर एका कोपऱ्यांत नित्य तुझ्याकडून पूजाअर्चा होत असलेलें जें तुळशीवृंदावन आहे तिथेंच हें सर्व सांठलें आहे." (शिशु)

आणि झाडांच्या फांदींत पूर्ण चन्द्र अडकलेला जेव्हां त्याला दिसतो तेव्हां तो आपल्या हातांत कां येत नाहीं याचा त्याला अचंबा वाटतो. आईचा मुखचंद्रमा जर आपण आपल्या दोन चिमुकल्या हातांत धरूं शकतों तर हा चन्द्र हातांत कां न यावा? अशा रीतीनें मुलाचें प्रत्यक्ष जीवन आणि कल्पनाविश्व आईनें भरून राहिलेलें आहे.

आई तर बालरूपानें अगदीं वेडी झाली आहे. तिला जीवनांत कृतार्थता तर वाटतेच, पण मुलाला पाहून तिची कल्पनाशक्तीहि भराऱ्या मारूं लागते.

"विश्वाच्या जीवनसागरावर प्रचंड लाटा थैमान घालीत होत्या त्यावर तूं तरंगत आलास. प्रेमभरानें पाझरणाऱ्या माझ्या अंतःकरणाच्या किनाऱ्याला अखेर तुझे पाय लागले." (शिशु)

आपल्याच्या जन्मासुळें मातेनें लहानपणापासून पाहिलेलीं गोड स्वप्नें साकार होतात. प्रत्येक मूल हा विश्वात्मक देवाचाच एक लहानसा अवतार होय हें मुख्यतः रवीन्द्रनाथांना दाखवायचें होतें. आणि वात्सल्यरसांत घोळून त्यांनीं हेंच विविध स्वरूपांत दाखविलें आहे.

पण बालकाला देवरूप समजणें या संकेतापेक्षांहि बालकाच्या मनोव्यापाराचें चित्रण करणें यांत रवीन्द्रांचें असामान्य कसब दिसतें. भोंवतालच्या जगांतील लहान-मोठे धागे घेऊन मुलें कल्पनांचीं घरटीं बांधत असतात. या कल्पना जणूं काय साकार होणारच आहेत, किंबहुना झाल्या आहेत, असें त्यांना ठाम वाटत असतें. शक्याशक्य ही भाषा त्यांच्या गांवींहि नसते. बांगडीवाल्याच्या जवळील बांगड्यांचे रंग पाहिलें कीं, मुलाला बांगडीवाला व्हावेंसें वाटतें, पण या सौंदर्यदृष्टीप्रमाणें त्यांच्याजवळ मर्दुमकी गाजविण्याची ही हौस भरपूर आहे म्हणून मूल परीकथेंतील नायकांप्रमाणें राक्षसाच्या तावडींतून आईची सुटका करावी अशासारखीं कल्पनाचित्रें रंगवीत राहतें.

मुलें विचार करतांना कुठें तरी एक दुवा सोडून देतात किंवा एखाद्या कल्पनेचें शेवटचेंच टोंक घट्ट धरून उलट्या दिशेनें तर्क करूं लागतात. आपण मोठें झालों या कल्पनेच्या धुंदींत शिशूनें केलेले संकल्प मोठे मजेदार आहेत. गर्दींत चुकल्यानंतर काका भेटले आणि 'इकडे एकटा कसा आलास' असें त्यांनीं आश्चर्यानें विचारलें तर आतां मी मोठा झालों आहें असें उत्तर देऊं; इतकेंच काय पण दुर्गापूजेच्या सुट्टींत घरीं येतांना वडील खेळणीं घेऊन येतील. तेव्हां आपण मोठें झाल्यामुळें या खेळण्यांचा उपयोग नाहीं हें त्यांना आपण पटवून देऊं, असे विचार मूल करीत असतें. पण आपण जर मोठे झालों तर आपण कुणी बरोबर न नेतां बाजारांत कां गेलों असें कोणी विचारणार नाहीं, किंवा आपल्याला खेळणेंहि कोणी आणणार नाहीं हें त्याच्या ध्यानांत येत नाही. बाबांचें पत्र आलें नाहीं म्हणून उदास झालेल्या मातेची समजूत घालतांना आपण छान छान पत्रें तिला लिहून देऊं असें मूल सांगतें. विघ्नसंतोषी डाकवाला आपल्या बाबांचीं सुंदर पत्रें स्वतःसाठीं ठेवून घेत असावा असाहि त्याला वहीम येतो. म्हणजे आपल्या कांहीं अतर्क्य तर्कपद्धतीनें मूल भोंवतालच्या कांहीं गुंतागुंती मनाशीं सोडवीत असतें त्याचप्रमाणें नवनवीन कल्पनांत

दंग होऊन जातें. या कल्पनाचित्रांतील आराखडे आणि रंग जगांतील दुसऱ्या कुणाहि साहित्यिकांनीं इतक्या कुशलतेनें रेखाटले नसतील.

हें केवळ काव्य आहे असें नाहीं. कल्पनेची रम्यता त्यांत आहे. पण त्याला वास्तवाचीहि बैठक आहे. आपण जर आपल्या भोंवतालच्या शिशुसृष्टीकडे विशेष मन घालून पाहूं लागलों तर रवीन्द्रांच्या 'शिशु'-काव्यांतील कल्पनांच्या तोडीच्या किती तरी गंमती आपणांस दिसतील. रवीन्द्र शिशुसृष्टींत रममाण होतांना विरंगुळा म्हणून तिकडे पाहत नाहींत. किंवा शिक्षकाची भूमिकाहि ते पत्करीत नाहींत. वात्सल्य आणि भक्ति या दोन संमिश्र भावनांनीं त्यांचें मन उजळतें. 'जगा धाकुटा होईजे तैं जवळिक माझी।' याप्रमाणें ते लहान बनून जातात. आणि म्हणूनच बालस्वरूपी परमेश्वराच्या लीला ते इतक्या यशस्वी रीतीनें वर्णन करूं शकतात.

पण परमेश्वराचें रूप आनंदमय असतें तसें रौद्र किंवा करुणहि असूं शकतें. रवीन्द्र-साहित्यांतील बालजगताचा हा दुसरा भाग असाधारण महत्त्वाचा आहे. यांत रवीन्द्र केवळ बालमनापर्यंतच नव्हे तर दलित जगाच्या तळापर्यंत पोहोंचले आहेत. 'पोस्टमास्तर' या कथेंतील रतन ही एका आडगांवांतील लहानगी कामकरी मुलगी. पोस्टमास्तरच्या बदली-मुळें तिच्या जीवनाला आलेला भकासपणा रवीन्द्रांनीं कुठलेहि भडक रंग न वापरतां रंगविला आहे. रतनच्या या भावभंगाचें चित्र वाचून विरघळणार नाहीं असा रसिक विरळा! काबुलीवाल्याच्या राकट पण वात्सल्यपूर्ण पार्श्वभूमीवर रेखाटलेलें मिनीचें चित्र ही जगाच्या वाङ्मयांतील एक अतुलनीय भावरेखा म्हणतां येईल. निसर्गाच्या अत्यंत रमणीय शोधाची उत्कर्षाला गेलेली अवस्था या ठिकाणीं दिसते. "होम-कमिंग" मधला फटिक् हा ज्याच्या हृदयाचा ठाव न घेईल असा वाचक राक्षसच म्हटला पाहिजे. मुलाचें मन प्रेमाचा आश्रय शोधीत असतें. त्या-आश्रयाच्या अभावीं तें तडफडत राहतें. प्रेमाइतकेंच स्वातंत्र्यहि मुलाला आवश्यक आहे. स्वातंत्र्याशिवाय विकास नाहीं, आनंद नाहीं आणि निर्मिति नाहीं. बद्ध असलेला आत्मा हा दुःखी, कष्टी आणि अविकसितच राहणार. तसेंच मुलाचें आहे. 'डाकघर' मधील बालनायक हें बद्ध

आत्म्याचें प्रतीक आहे. आपल्या खिडकींतून बाहेर दिसणाऱ्या अफाट आणि सुंदर जगांत उडी घ्यायला उत्सुक असलेला असल म्हणजे पंजरस्थ मानवी जीवाचें छायाचित्रच म्हणतां येईल. पण या चित्रांना वेदान्ताचा उठाव असला तरी त्याची बैठक वास्तवाची आहे. बालवयांतील आपल्या मनाची धडपड प्रत्येकाला आठवावी इतकें हें चित्र प्रभावी आहे. रवीन्द्रांच्या साहित्यांतील शिशुसृष्टि अशी अद्‌भुत, करुण आणि उदात्त आहे. शिशुजीवनाच्या सागरांत आपली कल्पनानौका सोडून तीमधून अपार आनंदाच्या सफरी ते करीत असतात असें दिसून येईल. ज्या शांतिवादाचे ते थोर प्रवर्तक होते तो जगांत प्रत्यक्ष अवतारायचा असेल तर मनुष्य सत्त्वगुणी झाला पाहिजे आणि तो तसा व्हावा यासाठीं वात्सल्य हें एकच साधन आहे अशी रवीन्द्रांची श्रद्धा होती. वात्सल्यभावनेला सौंदर्यवादाची डूब देऊन त्यांनीं ती अध्यात्म्याच्या पातळीवर नेली. 'निळा पक्षी' लिहिणारा मेटरलिंक किंवा 'ड्रीम चिल्ड्रेन' हें अनुपम शब्दचित्र रेखाटणारा लॅंब शिशुसृष्टीचे चाहते आणि सवंगडी आहेत हें खरें. पण अद्‌भुतरम्यतेच्या वलयांनीं शोभिवंत करून शिशु-जीवनांत दडलेल्या ईश्वरी तेजाचा साक्षात्कार फक्त रवीन्द्रांनींच घडवून दिला असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. जगत्सागराच्या कांठावर मुलांचा मेळा बसला आहे आणि हा दिव्य ऋषि त्यांच्यांत बसून त्यांच्या-बरोबर किल्ले बांधीत आहे आणि शिंपले गोळा करीत आहे असें रवीन्द्र आणि शिशु-सृष्टि यांच्या गाढ ऋणानुबंधाचें चित्र काढतां येईल. प्रलयकालीं एका वटपत्रावर राहणाऱ्या बालस्वरूप परमेश्वराचें दर्शन रवीन्द्रांना प्रत्येक मूल पाहतांच होत असलें पाहिजे. एरवीं शिशु-जीवनावर एवढें हृदयंगम काव्य त्यांना कसें रचतां आलें असतें ?

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३७३५४... वि: ..................

# कथा-कादंबरी

> " माझ्या लघुकथा वास्तवाला सोडून आहेत हें मी केव्हांच कबूल करणार नाहीं. जें जें कांहीं मीं लिहिलें आहे, तें तें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. अनुभवलें आहे... मी गद्य लिहीत असलों तरी आपलें कविपण विसरत नाहीं. "

* * * * * * * *

रवीन्द्रांचें कथावाङ्मय हें सर्व साहित्यांत जगन्मान्य होण्यासारखें आहे. त्यांच्या कवितांत पुष्कळदां जी गूढता आणि धूसरता आढळून येते, ती अगम्य वाटण्यासारखी असल्यामुळें कांहीं वाचकांना त्यांच्या काव्याचा रसास्वाद घेतां येत नाहीं. त्यांच्या कादंबऱ्या कांहींशा हेतुप्रधान आहेत. अर्थात् या हेतूशीं ज्यांचा मतभेद होतो त्यांना त्या कमी रंजक वाटल्या तर त्यांत नवल काय? त्यांचीं नाटकें, वैशिष्ट्यपूर्ण असलीं तरी तीं बरींचशीं प्रतीकात्मक आहेत. त्यामुळें ज्यांना जीवनाचें वास्तव चित्र आवडतें त्यांना या नाटकांची गोडी वाटत नाहीं. परंतु रवीन्द्रांच्या कथांचें तसें नाहीं. त्यांत गूढता किंवा प्रतीकात्मकता नाहीं. त्याचप्रमाणें वास्तवाशीं फारकत झालेलें काव्यमय असें वातावरणहि त्यांत नाहीं. कवि रवीन्द्र हे प्रासादाचा सौधावर बसून आकाशाकडे पाहत काव्य रचणारे कवि वाटतात. नाटककार रवीन्द्र प्राचीन राजदरबारांत एखादें उच्चासन भूषविणारे राजकवि असावेत असें वाटतें. परंतु कथाकार रवीन्द्र हे जितके आधुनिक तितकेच वास्तववादी आहेत.

आपल्या जमीनजुमल्याच्या आसपास असणाऱ्या खेड्यांच्या लोकांत ते जाऊन बसलेले आहेत. त्यांच्या सुखदु:खाशीं ते समरस झाले आहेत. मोठाल्या शहरांतील गरीब रयतेचें जीवन त्यांनीं दांभिक सुखासीनांच्या तुलनेनें संपूर्ण न्याहाळलें आहे. आणि यांतील करुण व हृदयस्पर्शी प्रसंग हृदयाला भिडतील अशा सुबोध पद्धतीनें त्यांनीं रेखाटले आहेत. म्हणूनच रवीन्द्रांचें कथावाङ्मय आवाहनाच्या दृष्टीनें व्यापक मान्यता पावलें आहे.

तंत्राच्या कसोटीवरहि या कथा केवळ अनुपम ठरण्यासारख्या आहेत. रवीन्द्र हे कथानिवेदनांत इतके कुशल आहेत कीं, एखादा प्रसंग किंवा जीवनांतील एखादाच पैलू ते संपूर्ण जीवन-दर्शन घडवावें अशा पद्धतीनें सांगतात. रवीन्द्र हे जुन्या पद्धतीचे कथाकार नाहींत. कारण कथेचे तपशील देत बसण्याची त्यांची पद्धति नाहीं. कथेपेक्षां प्रसंगचित्रण किंवा विश्लेषण हे जास्त असल्यामुळें त्यांना चांगल्या अर्थानें आधुनिक कथाकार म्हणतां येईल. चांगल्या अर्थानें म्हणण्याचें कारण आधुनिक कथाकारांत दिसणारी विकृतिचित्रणाची आवड त्यांच्यांत मुळींच नाहीं. मानवी जीवनाचा उपेक्षित आणि करुण भाग त्यांनीं आपल्या कथांत दाखविला असला तरी उदात्ततेचा ताल चुकलेला नाहीं. जगांतील दैन्य त्यांनीं रंगविलें असलें तरी उच्च मूल्यांविषयीं अश्रद्धा निर्माण करण्याची खटपट त्यांनीं केली नाहीं. त्यांच्या कथांतील वातावरण मनाला व्यथित करतें, पण कडवट बनवत नाहीं.

'पोस्टमास्तर' ही साधीच कथा पहा. यांतील कथावस्तु अगदीं क्षीण आहे. एका आडवळणी गांवीं राहणारा एक प्रेमळ पोस्टमास्तर आणि त्यानें जिला माया लावली अशी लहानगी रतन हीं दोनच पात्रें या कथेंत आहेत. पोस्टमास्तरची बदली झाली हें कळल्यानंतर रतनचें मन कसें विच्छिन्न होतें याचें अत्यंत हृदयंगम चित्रण रवीन्द्रांनीं केलें आहे. रतन जितकी भाववेडी आहे, तितकीच उत्कट आणि स्वाभिमानी आहे. माझ्या जागेवर येणाऱ्या पोस्टमास्तरला तुझी काळजी घ्यायला सांगेन असें तो जेव्हा रतनला सांगतो तेव्हां ती फार भडकते. प्रेमाचें अधिष्ठान असें बदलतां येणें शक्य आहे का ? रतनसारख्या अजाण निरक्षर मुलीला हें जें दिव्य ज्ञान होतें, तें केवळ अवर्णनीय आहे. पोस्टमास्तर हा जाणता

होता. तत्त्वज्ञानाची फुंकर घालून तो आपल्या वेदना कमी करूं शकत होता. या साऱ्याच व्यथा अगदीं वास्तवरूपानें पण उदात्ततेच्या पार्श्वभूमीवर रवीन्द्रांनीं आपल्यापुढें उभ्या केल्या आहेत. वास्तवता म्हणजे विकृति नव्हे. त्याचप्रमाणें वास्तव चित्रणांत मानवी मनांतील हीन भागच दिसला पाहिजे असें नाहीं. वास्तव हें शोकान्त असतें आणि तरीहि त्यांतील अंधारांत उदात्ततेचे, स्वार्थत्यागाचें प्रकाशकिरण दिसतात. हें रवीन्द्रांच्या कथांवरून कुणाच्याहि प्रत्ययाला येईल.

रवीन्द्रांची जगभर गाजलेली दुसरी कथा त्यांच्या अपूर्व कलेचें उत्कृष्ट प्रतीक आहे असें म्हणतां येईल. या कथेचा विषय कांहींसा नवीन आहे. आपली डोंगराळ मायभूमि हजारों मैलांवर सोडून कलकत्ता शहरांत आलेला एक ओबडधोबड पठाण रहमान हा या कथेचा विषय आहे. एका लेखकाची छोटी मुलगी मिनी रहमानला पाहून प्रथम घाबरतें, पण पुढें तिला त्याचा लळा लागतो. तो तिच्याकरितां नेहमीं खाऊ घेऊन येतो. पहाडासारख्या धिप्पाड आणि बाह्यतः क्रूर दिसणाऱ्या पठाणाचें आणि परीसारख्या दिसणाऱ्या छोट्या मिनीचें सख्य ही गोष्टच मोठी हृद्य वाटते. मिनीच्या सहवासांत हा पठाण अगदीं विरघळून गेलेला असतो. परंतु इतर वेळीं त्याचा रगेलपणा कायमच आहे असें दिसतें. ( आणि यामुळें तर त्याच्या शब्दचित्राला खरी खुमारी आली आहे. ) एका मारामारींत भाग घेतल्यामुळें त्याला दीर्घ मुदतीची शिक्षा होते. त्याला पोलिस पकडून नेत असतां मिनी त्याला भेटते आणि ' तूं कुठें चालला आहेस ? ' म्हणून विचारते. ' मी माझ्या सासरीं चाललों आहें ' असें तो हसून सांगतो. ( सासर याचा अर्थ पठाण तुरुंग असा करतात. ) मिनी गोंधळून जाते. कांहीं वर्षांनीं रहमान तुरुंगांतून सुटतो. तो तडक मिनीच्या घरीं जातो. घराला तोरण लागलें आहे. समारंभाची धांवपळ सुरू आहे अशा वेळीं मिनी त्याला भेटते ती वधू-वेषांत. ' मिनी, कुठें चाललीस ? ' असें रहमाननें विचारतांच ती उत्तर देते, ' मी सासरीं चाललें आहें. ' रहमान मटकन् खालीं बसतो. हेंच उत्तर तुरुंगांत जातांना त्याच्या तोंडीं होतें ! आपल्या मातृभूमींत आपली मुलगीहि उपवर झाली असेल ही कल्पना येऊन त्याचें चित्त व्यथित होतें. पुढें मिनीचा पिता त्याला

अफगाणिस्तानांत जाण्यापुरते पैसे देतो आणि अशा रीतीनें फार काळ दुरावलेल्या तात-कन्येची भेट होण्याची शक्यता निर्माण होते.

जगांतील कथा-वाङ्मयांतलें हें एक बहुमोल रत्न आहे. याच्या चित्रणांत कुठेंहि भडक रंग नाहींत. मिनीची बडबड, आपल्या मुलीच्या आठवणीमुळें मिनीवर जडलेली रहमानची माया, मिनीच्या आईचा संशयी स्वभाव, रहमाननें जवळ बाळगलेला आपल्या मुलीच्या हाताचा ठसा—सारें सारें इतकें उत्तम चितारलें आहे कीं, गोष्टींतलीं माणसें आपलीं आप्त वाटूं लागतात. कलेनें माणसाच्या मनाचीं क्षितिजें विशाल झालीं पाहिजेत. "काबुलीवाला" वाचून माणसामाणसांतील ऋणानुबंधाबद्दल ज्याला अधिक आस्था वाटूं लागणार नाहीं, तो हृदयशून्यच म्हणावा लागेल.

वास्तवाप्रमाणेंच अद्‌भुताचें चित्रणहि रवीन्द्र करूं शकतात. मात्र तें अद्‌भुत असें असतें कीं, त्याचीं क्षितिजें कुठें तरी खऱ्याखुऱ्या जगाला स्पर्शून जातात. 'क्षुधित पाषाण' ही त्यांची गाजलेली कथा याचें एक सुंदर उदाहरण आहे. 'जिवंत कीं मृत' ही कथा वात्सल्यरसानें ओथंबली आहे, परंतु त्याचबरोबर करुणरसाचेंहि त्यांत विलक्षण मिश्रण आहे. चितेवरून परत आलेल्या एका स्त्रीला आपल्या मायेच्या बालकापाशीं जातां कसें येत नाहीं आणि अखेर आपण जिवंत आहोंत हें पटविण्याकरितां तिला प्राणत्याग करावा लागतो हें रवीन्द्रनाथांनीं फार हृदयस्पर्शी भाषेंत सांगितलें आहे. या कथेंत वात्सल्याचा ( इंग्लिशमध्यें ज्याला Protective Instinct म्हणतां येईल ) उत्कर्ष आहे. परंतु साथीच्या भयंकर रोगानें उजाड पडलेलीं गांवें, उपेक्षितांच्या अंत्यसंस्कारांबद्दलची आपली अनास्था, संयुक्त कुटुंबांतील अभागिनीचे हाल या साऱ्या करुण-छटांनीं ही कथा जशी शोकान्त केली आहे त्याचप्रमाणें आपल्या समाजव्यवस्थेवरील एक जळजळीत टीकाहि तींत आलेली आहे.

रवीन्द्रांचें मन साहित्यनिर्मिति करतांना नव्या जगाचीं स्वप्नें रंगवीत होतें त्याप्रमाणें जुन्या जगांतील मूल्यांची पडझड समरसतेनें पाहत होतें. बंगालमध्यें पाश्चात्त्य संस्कृति हळूंहळूं आपलें सामान आणून टाकत होती. पण त्याचबरोबर अस्तंगत होऊं लागलेली सरंजामशाही आपल्या अस्तित्वासाठीं धडपडत होती. ही धडपड यशस्वी होणारी नसली तरी सामाजिक

जीवनावर तिचे आघात होतच होते. जुन्या कांहीं निष्ठा जीव धरून होत्या. कालमानानें कांहीं मूल्यें जीर्ण झालेलीं असलीं तरी त्यांतलें सत्त्व निकामी झालेलें नव्हतें. वर्णाभिमान आणि औदार्य, जुन्याची आसक्ति आणि नव्याची ओढ यांच्यांत लढत चालू होती. रवीन्द्र हें सर्व तन्मयतेनें पाहत होते आणि त्यांच्या कथावाङ्मयावर त्याचा ठसा स्पष्ट उमटत होता. ' हालदार घराणें ', ' रासमणीचा मुलगा ', ' नष्ट नीड ' इ. कथांत आपणांस हें सारें वातावरण थोड्या-फार प्रमाणांत आढळतें. बंगालच्या किंबहुना सर्व भारताच्याच संक्रमणकाळांतील हीं स्वभावचित्रें आहेत.

' दुराशा ' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कथा आहे. हिमालयाच्या पहाडी मुलखांत एक विचित्र स्त्री लेखकाला भेटते. ही एका खानदानी कुळांतील मुस्लीम स्त्री आहे. तिच्या प्रेम-प्रकरणांतील हकिकत आपल्यापुढें हळू-हळू येऊं लागल्यानंतर आपण तिच्या जीविताशीं एकरूप होऊन जातों. अनेक अडचणींतून आणि अनेक संकटें सोसून ती आपल्या प्रियकराला भेटण्यासाठीं कशी आली याचा इतिहास मोठा रोमहर्षण आहे. ती भैरवीच्या वेषानें अनेक तीर्थें हिंडली. ती स्वत: यवनकन्या असली तरी प्रियकराच्या जीवनांत सर्वस्व ओतल्यामुळें ब्राह्मणत्वाची शुचिता तिला प्राप्त झाली होती. तिचा प्रियकर केशरलाल हा एक उच्च वर्णीय हिंदू होता. तिची भ्रमन्ती अनेक वर्षें चालली परंतु केशरलाल तिला भेटला नाहीं. अखेर ज्या वेळीं तिला तो भेटला, त्या वेळीं संस्कारशून्य आणि गलिच्छ अशा भुटिया नांवाच्या रानटी जमातींत तो रहात होता. त्याचें दिव्यत्व पार नाहीसें झालें होतें. त्याचा शोध करीत असतां सर्व प्रकारचे मोह व हीनता टाळल्यामुळें त्याची प्रियतमा जितकी शुद्ध व बावनकशी झाली होती तितकाच तो पतित झाला होता. अखेर आपल्या शुद्धत्वावर शिंतोडा उडायला नको म्हणून ती दूर झाली आणि आपलें प्रणयभग्न जीवन एकान्तांत घालवूं लागली. १८५७ सालच्या बंडाच्या वेळची ही एक अद्भुत प्रणयकथा रवीन्द्रांनीं अत्यंत उत्कट शब्दांत मांडली आहे. या ठिकाणीं रवीन्द्र हे प्रणयाच्या विषयांत केवढे ध्येयवादी होते हें दिसून येतें. उत्कट प्रेम करणारा आपला विकास करून घेत असतो आणि भौतिक सुखांत डुंबणाऱ्याला अखेर दिव्य प्रेमाला मुकावें लागतें. या कथेची सुरुवात

आणि शेवट इतका नाट्यपूर्ण आहे कीं, मनुष्य पहिल्या परिच्छेदापासूनच एका भोंवऱ्यांत सांपडल्यासारखा होतो. अबला–जीवनाची ही दिव्य कहाणी आहे.

दुय्यम दर्जाचे लेखक आपल्या लेखनाचें एक ठरीव तंत्र निर्माण करतात. पण रवीन्द्रांसारख्या असामान्य प्रतिभेच्या साहित्यिकाचें साचेबंद असें तंत्र नसतेंच. त्याच्या भावनाविलासाप्रमाणें लेखनाचें तंत्र बदलत राहतें. रवीन्द्रांच्या कथावाङ्मयांत याचा चांगला प्रत्यय येतो. एखाद्या कथेच्या आरंभीं मुख्य पात्राची पहिल्याच परिच्छेदांत ते ओळख करून देतील आणि तीहि अशा सफाईनें कीं ती व्यक्ति आपणांला पुष्कळ दिवस माहीत आहे असें लगेच वाटूं लागावें. कित्येकदां जगाची रीत काय असते यावर एखादें सामान्य विधान करून कथेला सुरुवात करतील. उलट कथेच्या आरंभीं पुढीलप्रमाणें तत्त्वविवेचनहि येईल :

" सुसंगत कारणामुळें जर माणसाचे सारे कांहीं व्यवहार घडून आले असते तर हें लोकालय एका आंकड्याच्या जमाखर्चासारखें झालें असतें. थोडासा सावधपणा राखला कीं, हिशेबांत कुठें घोटाळा झाला नसता आणि कदाचित् झालाच तर तो रबरानें पुसून टाकून दुरुस्ती करतां आली असती.

पण माणसाच्या भाग्यदेवतेच्या ठायीं रसिकता आहे. गणितशास्त्रांत ती पारंगत आहे. पण तिला तो अनुराग नाहीं. मानवी जीवनाच्या योगवियोगाची बिनचूक आंकडेमोड करायला तिला आवडत नाहीं. एवढ्यासाठींच तिच्या एकंदर व्यवस्थेंत तिनें एक वस्तू योजून दिली आहे— ती विसंगति. "

'हालदार घराणें' या कथेंत असें तत्त्वशोधन अगदीं आरंभींच आलें आहे. पण तें अनाठायीं किंवा अनावश्यक वाटत नाहीं. या तत्त्वाच्या मध्यस्थित स्तंभाचा आधार घेऊन पुढें कथेचा सुंदर गोफ रवीन्द्रांनीं विणला आहे. त्यामुळें रवीन्द्रांची प्रत्येक कथा ही एक स्वयंभू व स्वतंत्र पद्धतीची कलाकृति वाटते.

प्रतीकात्मक कथा किंवा रूपककथा लिहिण्यांत रवीन्द्रांचा हातखंडा होता. रूपककथा हें कथावाङ्मयांतलें सुंदर दालन आहे. पण अशा कथा

लिहिण्यास जिब्रान्, टॉलस्टाय किंवा टागोर अशाच तोलाचीं माणसें लागतात. जीवनाची एखादी अलक्षित बाजू किंवा सौंदर्य अगदीं मोजक्या शब्दांत मांडणें ही अत्यंत अवघड कला आहे. 'लिपिका' म्हणून रवीन्द्रांचा संग्रह आहे तो असल्या लहान लहान कथा-मौक्तिकांनीं समृद्ध आहे. कवितांत कणिकांचें जें स्थान तेंच कथांत रूपककथांचें. रूपक-कथांत सूचित भाग बराच असतो. त्यामुळें रसिकांच्या कल्पकतेला हवा तेवढा विलास करायला मिळतो. 'लिपिके' बद्दल रसिकवर्य कालेलकर म्हणतातः

"सामान्य लिखाणांत ज्या प्रकारच्या आटीव रसाची आणि पूर्णतेची आपण अपेक्षा करतों तसलें कांहीं येथें सांपडायचें नाहीं. परंतु येथील साध्या वर्णनांत हृदयाची तार छेडणारें असें कांहीं काव्य भासतें आणि त्यांतून चुटपुट लावणाऱ्या सुगंधाची झुळूक अनुभवास येते. या लिखाणाचें रहस्य तर्कबुद्धीनें किंवा विश्लेषणपद्धतीनें शोधून काढावयाचें नसून समवेदनेनें किंवा सहानुभूतीनें उमगावयाचें असतें."

'नवीन बाहुली' ही एक सुंदर रूपककथा आहे. एका म्हाताऱ्या बाहुलीवाल्याला किसनलाल नांवाचा एक तरुण प्रतिस्पर्धी मिळाला. म्हातारा बाहुल्यांच्या बाजारांत मागें पडून आपल्या लेकीच्या मळ्यांत पिकाची राखण करीत काळ कंठूं लागला. इकडे किसनलालच्या बाहुल्या राजवाड्यापर्यंत पोंचल्या. म्हाताऱ्याची नात सुभद्रा मोठी महत्त्वाकांक्षी होती. आजोबाला ती प्रेमळपणानें आग्रह करून बाहुल्या तयार करायला बसवूं लागली. आणि एकेक बाहुली घेऊन ती राजवाड्यांत जाऊं लागली. तेथें तिला कुणी साह्य केलें आणि म्हाताऱ्याच्या जुन्या घाटणीच्या बाहुल्यांना थोडेंफार नवेंपण देऊन त्या राजवाड्यांत खपवून दिल्या. हा साहाय्यक दुसरा कुणी नसून किसनलालच होता! तो म्हाताऱ्याच्या येऊन पायां पडला आणि त्यानें सुभद्रेचें पाणिग्रहण केलें.

कलेंत जुनी पद्धति मागें पडून नवी पुढें येत असते. आदर्शवाद आणि सौंदर्यवाद यांचा झगडा नेहमीं चालू आहे. परंतु चिरंतनचें म्हणून एक सौंदर्य असतें. आदर्शवादांत पूर्णतेची ओढ लागलेली दिसते. त्यांत तपशील हवेत. सौंदर्यवाद हा बदलत्या प्रतिमांना आपल्या कवेंत घेण्याचा प्रयत्न करतो. प्रतिस्पर्धा आणि प्रेम यांत खऱ्या प्रेमाचा अखेर विजयच होणार.

'नवीन बाहुली' ही छोटीशी रूपककथा वाचून असे किती तरी विचारतरंग वाचकाच्या मनांत येऊन जातात.

'परीचा परिचय' ही देखील अशीच एक मजेदार रूपककथा आहे. एका राजपुत्राच्या डोक्यांत परीशीं लग्न करायचें वेड असतें. तो सांगून आलेल्या सर्व राजकन्यांना नाकारतो. परीच्या शोधार्थ जंगलांत हिंडत राहतो. अखेर एक आदिवासी सुंदरी त्याला भेटते. तिच्यांत कांहीं तरी विलक्षण चैतन्य आणि चित्ताकर्षकता त्याला वाटते, पण परीचें जें चित्र त्याच्या मनासमोर असतें तशी ती नसते. तरीहि राजपुत्र तिला राजधानींत घेऊन येतो. पऱ्या आपलें नेहमीचें रूप पुष्कळदां लपवून ठेवतात. तसें हिनें आपलें खरें रूप लपवून ठेविलें आहे. असाच राजपुत्र आपला समज करून घेतो आणि तिला आपलें खरें रूप प्रगट कर असा सारखा आग्रह करीत राहतो. तिला राजपुत्राची भूमिका कळत नाहीं. आणि एके दिवशीं पौर्णिमेच्या रात्रीं ती निघून जाते. तरीहि राजपुत्र असेंच समजतो कीं, पऱ्या एकाएकीं गुप्त होतात तशीच ही वनहरिणी निघून गेली आहे. मनुष्य आपल्या कल्पनासृष्टींतील चित्रें बाह्य जगांत साकार झालेलीं कशीं पहात असतो याचें मनोहर चित्रण प्रस्तुत कथेंत आहे.

'जूताविष्कार' (जोड्याचा शोध) या कथेंत एक वेगळेंच उद्‌बोधन आहे. एका राजाच्या पायास कांटा टोंचतो आणि तो रस्ता अव्यवस्थित ठेवल्याबद्दल संबंधित अधिकाऱ्याला शासन करूं पाहतो. पण हें पुन्हां पुन्हां होत राहतें. अखेर एक मनुष्य जोडे घेऊन येतो आणि राजाला सांगतो कीं, "यानें आपले पाय झांकून टाका म्हणजे तुम्हांला कांट्याची बाधा होणार नाहीं.' या रूपककथेंत रवीन्द्रांनीं असें दाखविलें आहे कीं, जगांत असलेलें पाप, हिंसा, दुष्ट विचार हें सर्व कांहीं आपण नष्ट करूं शकत नाहीं. आपल्या मनाला याचा संपर्क होऊं नये म्हणून आपण संयमाचें आच्छादन मनावर घातलें म्हणजे झालें !

अशा तऱ्हेच्या अनेक रूपककथांमधून रवीन्द्रांनीं अनेक सुंदर सुंदर जीवनसूत्रें स्पष्ट केलीं आहेत. रवीन्द्रांचें कथावाङ्मय असें समृद्ध आहे आणि त्यांत अनेक तऱ्हेचे कथाप्रकार आपल्याला आढळतात. त्यांच्या कथांचा विशेष हा आहे कीं, जेव्हां ते कल्पनेच्या अंतराळांत असतात

तेव्हां सत्य सृष्टीचें अवधान सुटलेलें नसतें आणि अत्यंत वास्तववादी कथा रंगवितांनाहि ध्येयाच्या ध्रुवताऱ्यावर त्याची दृष्टि खिळलेली असते. साध्या जीवनांत काव्य पाहणें आणि निसर्गांत मानवी जीवनाचा साक्षात्कार होणें हें रवीन्द्रांच्या प्रतिभेचें फार मोठें वैशिष्ट्य आहे. रवीन्द्र हे मानवी जीवन आणि निसर्ग यांत अद्वैत मानणारे साहित्यिक आहेत. एका पत्रांत ते लिहितात :

" मी आतां एक गोष्ट लिहीत बसलों आहें आणि जसजसे शब्द पुढें सरकत आहेत तसतसा भोंवतालचा प्रकाश, सांवल्या आणि रंग त्यांच्या बरोबर बेमालूम मिसळताहेत. मी जीं दृश्यें, स्वभावचित्रें आणि घटना कल्पीत आहे त्यांना हा सूर्य, हा पाऊस, आणि ही नदीकांठावरील वेली, पावसाळ्यांतील हें आकाश, हें पानांनीं झांकलेलें खेडें, पावसांनीं समृद्ध केलेलीं हीं शेतें यांची पार्श्वभूमि मिळून, त्यांचें प्रत्येक स्वरूप जास्तच चैतन्यपूर्ण होत आहे...... माझ्या गोष्टीच्या वाक्यांवाक्यांतून मी जर पावसाळ्याच्या निरभ्र दिवशीं माझ्या समोरून वाहणाऱ्या छोट्या झऱ्याचें सूर्यप्रकाशित पाणी माझ्या वाचकांपुढें उभें करूं शकलों, हा नदीकांठ, या झाडांची छाया, आणि या खेड्यांतल्या दृश्याची निःशब्दता मी जर त्याच्या मनांत जशीच्या तशी निर्माण करूं शकलों तर माझ्या कथेचें सत्य क्षणार्धांत त्यांना पूर्णपणें उमगेल. "

नावीन्याची नुसती टूम म्हणून सर्वच कांहीं नवीन सांगणाऱ्या लेखकांचा मार्ग कांहींसा सुकर आहे. कारण ते कांहीं वेगळें सांगत आहेत या कल्पनेनें वाचक भारावून जातात. अर्थात् यांपैकीं फारच थोड्यांचा भ्रम अखेरपर्यंत टिकतो ही गोष्ट वेगळी ! पण युगायुगांतून चालत आलेल्या चिरंतन मूल्यावर ज्यांना आपल्या साहित्याची उभारणी करायची आहे त्या रवीन्द्रांसारख्या लेखकाचें काम फारच अवघड असतें. जें तत्त्व आपल्या कथा-कादंबरींत ते सूचित करतात त्याचें पुरातनत्व पाहूनच नवीनाचा हव्यास बाळगणाऱ्या वाचकांचीं डोकीं भणाणतात. अशा वेळीं केवळ जुनें आहे म्हणून उदात्त तत्त्व सोडायचें नाहीं आणि त्याची मांडणी मात्र फारच अभिनव पद्धतीनें करायची असा दुहेरी योग रवीन्द्रासारख्यांना साधायचा असतो. उथळ नवतेचा वशिला न लावतां रसिक वाचकांच्या

भावसृष्टीला कांहीं नवा आशय द्यायचा ही कठीण साधना रवीन्द्रांनीं केली आहे. ‘ रासमणीचा मुलगा ’ किंवा ‘ दृष्टिदान ’ असल्या गोष्टींत स्त्रीच्या अंगची संरक्षक प्रवृत्ति किंवा समर्पणशीलता या सनातन गोष्टीच रंगविल्या आहेत. पण त्या रंगवितांना रचनेचें कौशल्य आणि जिव्हाळा रवीन्द्रांनीं इतक्या मोठ्या प्रमाणांत दाखविल्या आहेत कीं, तंत्रदृष्ट्या त्या अति आधुनिक कथा वाटतील आणि त्यांतला आशय अश्रद्धांना सश्रद्ध करील. एखाद्या विषयाचा ठाव घेण्याचा रवीन्द्रांचा प्रयोग हा इतका हुकमी आणि वेगळा असतो कीं, चिरपरिचित गोष्टींतहि नवीन चैतन्य दिसूं लागावें. विफल झालेल्या सांसारिक जीवनाचीं चित्रें कथा-कादंबऱ्यांत आपण असंख्य पाहतों. पण ‘ योगायोग ’ मधील चित्रण हें इतकें वेगळें, अभिनव आणि तरीहि पटणारें आहे कीं, यशस्वी सांसारिकांना त्यांतल्या अभागी पात्रांच्या जीवनांत क्षणभर एकजीव व्हावेंसें वाटावें.

आदर्श कथा ही काव्य आणि गद्य यांच्या सरहद्दीवर असते. रवीन्द्रांच्या कथांत या सरहद्दी वितळून गेल्या आहेत. उत्तम कथा ही उत्तम कविता असावी हा सिद्धान्त जीर्ण झालेला नाहीं. याचें प्रत्यंतर म्हणजे रवीन्द्रांच्या नित्यनूतन कथा होत.

रवीन्द्र कथाकार म्हणून जेवढे यशस्वी झाले तेवढे कादंबरीकार म्हणून झाले नाहींत असें म्हणण्यांत त्यांच्या वाङ्मयीन यशाची रूपहानि मुळींच होत नाहीं. कादंबरीकारांत त्यांचें स्थान फार वरचें आहे हें कुणीच अमान्य करणार नाहीं. पण तंत्र आणि रसवत्ता, तांत्रिक एकसंधता आणि भावनात्मक विशालता या सर्व दृष्टींनीं त्यांची कथा इतकी आदर्श वठली कीं, जगाच्या कथावाङ्मयांत तिला एक उंच दर्जा प्राप्त झाला आहे. रवीन्द्रांच्या कादंबऱ्यांना तें यश लाभलें नाहीं. अर्थात् भारतीय वाङ्मयांत त्यांचा प्रभाव फार मोठा आहे हें निःसंशय. पण ह्युगो किंवा टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्यांची पातळी त्यांना गांठतां आलेली नाहीं.

याचें कारण रवीन्द्रांच्या प्रतिभेची उंची कमी होती हें नसून जात वेगळी होती हें होय. महाकाव्यापेक्षां भावगीतें सरस लिहिणारा हा कवि कादंबरीपेक्षां कथांमध्यें अधिक यशस्वी ठरावा हें साहजिकच नाहीं काय ? रवीन्द्र आत्मनिष्ठ होते, स्वयंशिक्षित होते, स्वतंत्र वृत्तीचे होते. काव्याच्या

छंदापासून समाजाच्या परंपरांपर्यंत सारीं बंधनें तोडून मुक्तीच्या अंतराळांत विहरण्यासाठीं ते उत्सुक झालेले असत. जगाच्या बीभत्सतेचें दर्शन त्यांना झालें नव्हतें असें नाहीं, पण तें त्यांना परकायाप्रवेश करून घ्यावें लागलें. त्यांच्या स्वतःच्या अलिप्ततेला तडे जातील अशी वेळ सुदैवानें त्यांच्यावर कधींच आली नाहीं. शिवाय जन्मभर विश्वात्म्याशीं एकरूप होणें हा एकच ध्यास त्यांना होता. त्यामुळें त्यांचें सर्व लेखन या थाटाचें झालें आहे. ह्युगो, टॉलस्टॉय यांनीं धडपडणाऱ्या, चुकणाऱ्या, प्रेम करणाऱ्या, लढणाऱ्या माणसांचीं चित्रें रंगवून संसाराचा भव्य व उग्र जीवनपट जसा आपल्या कादंबऱ्यांत उभा केला तसा रवीन्द्रांनीं केला नाहीं. मात्र माणसांच्या अंतरात्म्याची पूर्णतेसाठीं चाललेली धडपड त्यांनीं उत्कृष्ट रंगविली आणि हेंच त्यांच्या कादंबऱ्यांचें ( आणि इतर साहित्याचेंहि ) वैशिष्ट्य आहे.

रवीन्द्रांनीं एकंदर बारा कादंबऱ्या लिहिल्या. ‘ बहुठाकुराणीर हाट ’ ( १८८३ ) ही पहिली आणि ‘ चार अध्याय ’ ( १९३४ ) ही शेवटची. रवीन्द्रांच्या पहिल्या एक-दोन कादंबऱ्यांवर बंकीमचंद्रांची छाप पडणें साहजिकच होतें. कारण त्या वेळीं बंगाली वाङ्मयांत बंकीमचंद्र हे अत्यंत तेजस्वी व सर्वमान्य लेखक म्हणून गाजत होते. बंकीमचंद्रांनीं इंग्रजी वाङ्मयप्रवाहांचें उत्तम ज्ञान करून घेतलें होतें. परंतु भारतीय संस्कृतींत रवीन्द्रांइतकें ते खोल गेले नाहींत. बंकीमचंद्रांच्या कादंबऱ्या रसाळ पण कल्पनारम्य होत्या. मानवी जीवनांतल्या नेहमींच्या गोष्टी त्यांत येत, पण नव्या संस्कृतीच्या आक्रमणानें भारतीयांपुढें उभ्या राहिलेल्या समस्या बंकीमचंद्रांनीं हाताळल्या नाहींत. संवादांतून बुद्धीची चमक बेताचीच असे. रंजकतेंत त्या कुठल्याहि काळांत सरसच ठरतील. पण अद्भुताचें मोहजाल त्यांत होतेंच. ‘ वंदे मातरम् ’ हें ज्या कादंबरींतलें गीत आज आपलें राष्ट्रगीत ठरलें त्या कादंबरींतला राष्ट्रवादहि गूढ स्वप्नाळूच आहे. रवीन्द्र सौंदर्यवादी असल्यानें कल्पनारम्यतेची पकड त्यांच्यावरहि होतीच. पण तरीहि नव्या जगाचा त्यांचा परिचय अधिक निकटचा होता त्यामुळें नव्या जगाच्या समस्या त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून मांडल्या. त्यांनीं जरी आपल्या कादंबऱ्यांच्या वादसभा किंवा परिसंवाद केले नाहींत तरी प्रसंगांच्या ओघांत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर उद्बोधक चर्चा त्यांच्या कादंबऱ्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

आल्या आहेत. इंग्रजांच्या जीवनसरणीनें मोहित झालेला वंगसमाज आणि प्राचीन उच्च मूल्यांच्या जपणुकीसाठीं धडपडणारे विचारवंत यांचे प्रत्यक्षा-प्रत्यक्ष संघर्ष रवीन्द्रांच्या कादंबऱ्यांत अनेक ठिकाणीं आढळतात. हा भाग जितका रंजक तितकाच उद्‌बोधकहि आहे. ' गोरा 'च्या रूपानें प्रकट झालेला वंशभेद, ' घरे बाहिरे 'मधील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय निष्ठांची लढत आणि ' चार अध्याय 'मधील दहशतवादाचें पर्व यांतून उदयोन्मुख भारताचें स्पंदन आपणाला ऐकायला मिळतें.

रवीन्द्रांचे नायक आत्मनिष्ठ आणि ध्येयवेडे तर नायिका भारतीय स्त्रीच्या आदर्शांची प्रतिमा आहेत. ' चतुरंग ' मधील आश्रमवासिनी दामिनी हिची करुण कहाणी पाहण्यासारखी आहे. आश्रमाच्या मुख्य गुरूवर तिचा प्रियकर सतीश जेवढा लुब्ध आहे तेवढी दामिनी नाहीं. जातिवंत स्त्रीप्रमाणें तिला पुरुषाचें प्रेम पाहिजे आहे. प्रियकर हाच तिचा देव, गुरु, संरक्षक सर्व कांहीं आहे. तिच्या समर्पणशीलतेला सीमा नाहीं. पण सतीश तिचें अगाध प्रेम डावलून तिचें लग्न आपल्या एका गुरुबंधूशीं लावून देतो. दामिनी दिवंगत होते. पण सतीश प्रगत होत राहतो. दामिनी प्रेमवेडी तर सतीश ध्येयवेडा. दामिनीच्या रूपानें एक अनुपम प्रेममूर्ति रवीन्द्रांनीं उभी केली आहे.

" नौकाडुबी ' ( Wreck ) हाहि एका अशाच आदर्शांचा आविष्कार आहे. वैवाहिक निष्ठेचें पावित्र्य हिंदु संस्कृतीनें कांहीं विलक्षण पातळीवर नेलें आहे. लग्नासाठीं गेलेलीं दोन वऱ्हाडें वादळांत सांपडून वधूवरांची अदलाबदल होते. पण हें सत्य कळून येतांच वधूच्या हृदयाचा जो प्रक्षोभ होतो त्याचा अप्रतिम आलेख रवीन्द्रांनीं रेखाटला आहे. रवीन्द्र भारतीय संस्कृतींत किती खोल गेले होते याचा या कादंबरींत प्रत्यय येतो. यांतला आदर्श आधुनिक जगाला कदाचित् विचित्र वाटेल, पण हास्यास्पद खास वाटणार नाहीं. निदान वाटूं नये असें वाटतें. कारण निष्ठेसाठीं आत्मसमर्पण हा विषयच मुळीं इतका हृदयस्पर्शी आहे कीं, कुठल्याहि काळांतील वाचकाला त्याचें आकर्षणच वाटावें.

रवीन्द्रांच्या कमी प्रसिद्ध असलेल्या कादंबऱ्या कलादृष्टीनें अधिक सुंदर आहेत असें म्हणावेंसें वाटतें. ' चतुरंगा 'ची जडण-घडण किती बहारदार

आहे. पण ती कादंबरी सामान्यांपर्यंत फारशी पोंचलेली नाहीं. त्यांची ' योगायोग ' ही कादंबरी अशीच थोडीशी बाजूला पडलेली, पण आशय आणि आविष्कार दोन्हींत विशेष सरस आहे. या कादंबरीचें सौंदर्य एका वाचनांत कदाचित् कळणारहि नाहीं. पण पुनर्वाचनानें जेव्हां तें कळेल तेव्हां त्याच्यासारखें दुसरें सुंदर कांहीं नाहीं असेंच रसिकाला वाटेल. यांतली नायिका कुमुदिनी ही मुलखावेगळी स्त्री आहे. ती एक आजन्म अभिसारिका आहे. मनोमंदिरांत तिनें ज्याची मूर्ति स्थापिली आहे तो एखाद्या भाग्याच्या क्षणीं आपणाला भेटायला येईल अशी तिची श्रद्धा असते. बाहेर पावसाची झड सुरु आहे किंवा चांदणें पडलें आहे अशा वेळीं दारावर त्याची थाप ऐकूं येईल, आपण उत्सुकतेनें जाऊन दार उघडूं आणि आपलें मग मीलन होईल, या स्वप्नांत कुमुदिनी दंग असते. तिचा पति मधुसूदन हा प्रौढ प्राकृत माणूस आहे. पत्नीच्या स्वप्नाळूपणाचें त्याला कधींहि आकलन होत नाहीं. तो आपला पुरुषीपणा वेळोवेळीं प्रकट करतो. कुमुदिनी ज्या वेळीं त्याला असहाय वाटते तेव्हां तो हतबल होतो आणि जेव्हां ती गूढ व स्वप्नाळू वाटते तेव्हां तो संतप्त होतो. या कांहीं अजब व्यक्तिरेखा आहेत. यांत मधुसूदन आपणांला समजूं शकतो, पण कुमुदिनी जितकी रमणीय तितकी अनाकलनीय आहे.

मीराबाईनें जसा गिरिधर गोपाल पति मानून सर्व जन्म एका प्रेम-समाधींत घालविला तसाच कुमुदिनीचा प्रकार आहे. कुमुदिनीला तिच्या या हृदयेश्वराचा साक्षात्कार कसा झाला? प्रत्यक्ष जगांत असा कोणी पुरुषोत्तम भेटेल असें तिला वाटलेंच नाहीं काय? स्वप्न आणि सत्य यांतला भेद ती विसरूनच गेली होती काय? असे अनेक प्रश्न आपल्या मनांत येतात आणि तरीहि कुमुदिनीचें शब्दचित्र आपल्याला वेड लावतें.

रवीन्द्रांची स्त्री ही आधुनिक नाहीं तर आदर्श आहे. ' चार अध्याय ' किंवा ' मालंच ' या त्यांच्या अखेरच्या कादंबऱ्यांतसुद्धां स्त्रीची प्रतिमा त्यांनीं आधुनिकतेच्या चौकटींत बसविलेली असली तरी रंगरेषांचें वळण जुनेंच आहे. या जुन्यांत मात्र कुठलाहि ठोकळेबाजपणा नाहीं, तर तें चित्र स्वतंत्र व जिवंत आहे. हीच रवीन्द्रांची खरी किमया म्हणावी लागेल. ' चार अध्याय ' या कादंबरींत त्यांनीं दहशतवादाला कांहींसें गौण लेखलें

म्हणून कांहीं जहालांचा रवीन्द्रांवर रोष झाला आहे. तसें पाहिलें तर हा प्रश्न सर्वस्वीं श्रद्धेवर सोपविला पाहिजे. गांधीजीदेखील राणा प्रताप-सारख्यांना वाट चुकलेले देशभक्त नव्हते का म्हणत ? जतीनदासच्या बलिदानासंबंधींचा ठराव कॉंग्रेसमध्यें येतांच गांधीजी उठून गेले हें प्रसिद्धच आहे. दहशतवादी देशभक्तांत शौर्य व त्याग नाहीं असें कोण म्हणेल ? पण त्या मार्गांत जी गुप्तता व हिंसा आहे तिनें अखेर समूहाचा नैतिक घात होतो आणि जुलमी सत्तेला दडपशाही करणें सोपें जातें. रवीन्द्रांचें पाहणें याच तऱ्हेचें होतें. देशासाठीं स्मितमुखानें ज्यांनीं फांशीच्या दोराचें चुंबन घेतलें त्यांच्याविषयीं रवीन्द्रांना आदर नव्हता असें कसें म्हणतां येईल ? पण त्यांचा मार्ग मात्र रवीन्द्रांना अनुकरणीय वाटला नाहीं. वंग-भंगाच्या चळवळीला अनिष्ट असें वळण लागलेंसें त्यांना वाटलें म्हणून त्यांनीं लगेच राजकीय क्षेत्रांतून काढता पाय घेतला.

तंत्रदृष्ट्या रवीन्द्रांनीं कादंबरींत खूपच प्रगति केली. रसापकर्ष न करतां कथानकाला बौद्धिकतेची जोड देण्याची कामगिरी त्यांनीं केली. पात्राच्या आत्मगतांतून कथा-विस्तार करण्याचें कौशल्य त्यांनीं दाखविलें. त्यांच्या कांहीं कादंबऱ्या दीर्घकथेसारख्या आहेत. मुख्य कथानक आणि प्रमुख पात्रें यांच्याइतकीच आस्था आपल्या दुय्यम व गौण कथानकांविषयीं आणि पात्रांविषयीं रवीन्द्रांनीं दाखविली आहे. त्यांच्या कादंबरीविषयीं या प्रकरणाच्या आरंभीं जें लिहिलें तें जगांत जें सर्वोच्च आहे त्याच्या तुलनेनें लिहिलें. एवरेस्टपेक्षां कांचनगंगा कांहीं फूट कमी उंच आहे असें म्हटल्यानें कांचनगंगेचा कमीपणा दाखविल्यासारखें थोडेंच होतें ! दोन्हीहि शिखरें उत्तुंग. दोन्हीहि सृष्टींतले महान् चमत्कार. तुलनेनें एक उजवा-डावा ठरत असला तरी दोघांपुढें आपण आश्चर्यानें नम्रच होणार !

★

# नाट्य-निबंध

" मी लिहीत असतां प्रकाश, वारा, तरुशाखा ह्यांचें स्पंदन माझ्या भाषेला साथ देत होतें.... असें सुख खऱ्या जगांत फारच थोडें. "

साहित्यनिर्मितीमधील अतिशय कठीण परीक्षा कोणती असेल तर ती नाटकाची. इतर विषयांत पहिले आलेले अनेक वाग्भट या विषयांत पासापुरतेसुद्धां गुण मिळवूं शकले नाहींत. प्रयोग आणि आशय यांची बेमालूम जुळणी होणें अगदीं अशक्यप्रायच असतें. कित्येकदां नाट्यवस्तु थिटी पडते तर कित्येकदां ती डोक्यावरून जाते. कांहीं प्रसंग रसपूर्ण वठले तरी बराच भाग नीरस राहतो. नाटककार हा कवि असेल तर सौंदर्य व सुसंगति तो अधिक साधील. पण संघर्षानें येणारा रसरशीतपणा त्याच्या नाटकाला येणार नाहीं. नाटककार समीक्षक असेल तर वादविवादाच्या आतषबाजीनें तो बुद्धीला दिपवील, पण भावनांना आवाहन करूं शकणार नाहीं. आणि अभिनयाचें अंग नाटककाराला नसेल तर प्रयोगमूल्यांच्या दृष्टीनें नाटक हिणकस ठरेल. म्हणून यशस्वी नाटककार होण्यास तो अष्टपैलू असावा लागतो. कवीच्या डोळ्यांनीं त्याला मानवी जीवनांतली सुसंगति दिसली पाहिजे. समीक्षकाची भूमिका घेऊन त्यानें संघर्ष पाहिले पाहिजेत. नाट्यसृष्टीच्या नियमांचें पुस्तकी ज्ञान नव्हे तर प्रत्यक्ष अनुभव त्याला पाहिजे. शिवाय जनमनांत

शिरून आपल्या कलाकृतीच्या आराखड्याकडे त्याला पाहतां आलें पाहिजे. कारण हें दृश्यकाव्य आहे. यांत प्रेक्षक आणि नाटक यांतलें परकेपण मावळून ते नाट्यवस्तूशीं सहभागी होतील तरच प्रयोगदृष्ट्या नाटक यशस्वी होणार. ही सारी गुणसंपदा रवीन्द्रांजवळ कमीअधिक प्रमाणांत होती म्हणून रंगभूमीवर ते एवढी क्रान्ति करूं शकले.

नाटककार हा जातिवंत कवि असेल तर त्याच्या नाटकाला कांहीं वेगळें सौंदर्य येतें हें शेक्स्पीयर–कालिदासांच्या भक्तांना सांगायला नकोच. रवीन्द्र हे मूलतः कवि होते. आणि त्यांचीं नाटकें जितकीं नाट्यपूर्ण तितकींच काव्यपूर्ण आहेत. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं तीं अत्यंत काव्यपूर्ण आहेत म्हणूनच नाट्यपूर्ण आहेत. 'कर्ण-कुंती संवादा'सारखी साधी एकांकिकाच घ्या. प्रसंग निवडण्यांतच नाटककारानें अर्धी लढाई जिंकली आहे. कारण जन्मल्याबरोबर टाकून दिलेल्या आपल्या वीरपुत्राला भेटायला गुप्तपणें पश्चात्तप्त माता येते आणि आपली जन्मकथा त्या दुर्दैवी पुत्राला प्रथमच त्या वेळीं कळते हा प्रसंगच मुळीं कमालीचा नाट्यपूर्ण आहे. लष्करी तळाची पार्श्वभूमि, अंधाराचें वातावरण या नाट्याला जास्त उत्कट करतात. कुंती पश्चात्तप्त आहे पण तिची वत्सलता अगाध आहे. कर्ण कुंतीशीं फार विनयानें वागतो. आपल्या जीवनावर कलंक आणायला ही कारण झाली याचा विषाद त्याला वाटत असला तरी तिच्याशीं वागण्यांत तो दाखवीत नाहीं. येथेंच साऱ्या संवादाला एक उंच बैठक मिळाली आहे. केवळ वाचनानेंसुद्धां भावना हेलावतील असें सामर्थ्य या संवादांत आहे. शेक्स्पीअरच्या छंदोबद्ध पण निर्यमक रचनेच्या धर्तीवर हा संवाद रचलेला आहे. ' गांधारीचें निवेदन ' हाहि संवाद असाच परिणामकारक आहे.

रवीन्द्रांच्या सर्व नाटकांचें ( किंबहुना सर्व साहित्याचेंच ) एक सूत्र आहे. मनुष्याच्या आत्म्याचा मूळ स्वभाव आनंदमय आहे असें ते मानत. "आनंदात् ह्येव खल्विमानि भूतानि जायन्ते।" आनंदापासूनच प्राणिमात्राची निर्मिति होते. या औपनिषदिक सत्यानें रवीन्द्रांच्या मनाची कायमची पकड घेतली होती. दुःख आणि मृत्यु यांचा स्वीकार माणसानें करायचा तो या आनंदाच्या आधारावर. दुःख मृत्यूचा मार्ग टाळून जे दुसरीकडे पळतील त्यांना शाश्वत आनंदाची प्राप्ति व्हायची नाहीं. मानवी संसारांत

हाच विरोधाभास आहे. एकीकडे आत्मा आपलें मूळ आनंदरूप प्रकट करण्यासाठीं धडपडत असतो. पण संसार तर दुःख, हिंसा, बेपर्वाई यांनीं भरलेला आहे. दुःखाशीं झगडून आनंद मिळविण्याचा आत्म्याचा प्रयत्न आणि मृत्यूवर विजय मिळविण्याची त्याची आकांक्षा हाच खरा झगडा होय. 'निसर्गाचा सूड' 'नटीची पूजा' इ. नाटकांपासून 'डाकघर'-'चांडालिका'पर्यंत याच सूत्राचा प्रभाव कमीअधिक प्रमाणांत सर्वत्र दिसेल.

चालू कालांत जे विचारप्रवाह चालू होते त्यांचे रवीन्द्र उत्तम मर्मज्ञ होते. पण मानवी जीवनांत जें कांहीं चिरंतन आहे त्याविषयींची त्यांची श्रद्धा अधिक प्रबळ होती. म्हणूनच 'चांडालिके'सारख्या अस्पृश्यता-निवारणाच्या चालू प्रश्नावरचें नाटक 'चित्रांगदा' सारख्या मानवी मनांतील काम-प्रेमाच्या शाश्वत प्रेरणा व्यक्त करणाऱ्या नाटकाइतकें यशस्वी झालें नाहीं. उत्कृष्ट कलाकृति सामान्यांचें रंजन करते आणि तज्ञांचें समाधान करते. हे दोनहि गुण रवीन्द्रांच्या नाटकांत आहेत.

'निसर्गाचा सूड' या नाटकांत एका संन्याशाची कथा आहे. आपण वासना जिंकलेल्या आहेत असें सांगणारा एक संन्यासी एका अनाथ गोजिरवाण्या मुलीला पाहतो. आपण मायेच्या मोहांत सांपडूं म्हणून तेथून तो पळ काढतो. पण आपण एका असहाय बालिकेला अरक्षित अवस्थेंत सोडलें या जाणीवेनें तो बेचैन होतो. पर्वतांतील एकान्त त्याला खायला उठतो. तो पुनः त्या बालिकेचा शोध करीत परत येतो. पण ती देवाघरीं गेलेली असते. संन्यासी हताश होतो. विजनांत गेल्यानें नव्हे तर मानवावर प्रेम करण्यानेंच परतत्त्वाचा लाभ होतो हें रवीन्द्रांनीं यांत दाखविलें आहे. अनंत बंधनांतली मुक्ति ती हीच.

'चित्रांगदा' नाटकांत शरीरसौंदर्यापेक्षां अंतःसौंदर्याची महती कशी अधिक आहे हें दाखविलें आहे. कथा पुराणकालीन, अर्जुन-चित्रांगदेची. बारा वर्षें तपश्चर्या करायला गेलेल्या अर्जुनाला चित्रांगदा भेटते. तिचें सौंदर्य प्रथम अर्जुनाला मोहित करूं शकत नाहीं. अर्जुनाचें चित्त विचलित करील अशी रूपसंपदा ती मदनाकडून एक वर्षभर मागून घेते. अर्जुनाचा तपोभंग होतो. तो चित्रांगदेच्या नादीं लागतो. पण वर्षभरानें चित्रांगदेच्या असामान्य सौंदर्याची मुदत संपते. तथापि, अर्जुनाला एक वर्षाच्या सहवासानें

तिचें अंतःसौंदर्य कळून आलेलें असतें. आणि मदनानें वर्षभर दिलेल्या लावण्याचें कवच गळून पडलें तरी अर्जुन आणि चित्रांगदा यांचें सख्य अभंगच राहतें. 'वाल्मीकि–प्रतिभें'त त्यांनीं वाल्मीकीची भूमिका केली त्याप्रमाणें 'चित्रांगदें'तहि असेंच एक सोंग वठाविलें.

'मुक्तधारा' हें रवीन्द्रांचें नाटक स्वातंत्र्य-संग्रामावरील रूपक म्हणून फार गाजलें. 'किरात' यांनीं केलेलें या नाटकाचें मराठी रूपांतरहि चांगलेंच लोकप्रिय झालें. 'मुक्तधारा' नदीला अडवून आपल्या मांडलिक राजाच्या प्रदेशाची पिळवणूक करूं पाहणाऱ्या एक दुष्ट राजाची ही कथा आहे. मांडलिक राजाची प्रजा मोडतोड करून बंड करायला प्रवृत्त होते. परंतु एका परिव्राजकाच्या उपदेशानें ती हिंसेचा मार्ग सोडून देते. जुलमी राजासुद्धां अखेर विरघळतो असें दाखविलें आहे. वसाहतवादाचा अन्याय, त्याचा निःशस्त्र प्रतिकार इ. अनेक गोष्टी सूचित करून रवीन्द्रांनीं भारतीय स्वातंत्र्यलढ्याचें महान् पर्व त्यांतल्या माहात्म्यासह रेखाटलें आहे.

कल्पनारम्य कथानक, अद्‌भुताची भुलावण, आणि काव्यमय वातावरण हें रवीन्द्रांच्या नाटकांचे खास विशेष होते. पण आशयांतच नव्हे तर प्रयोगपद्धतींतहि रवीन्द्रांनीं क्रांति केली. आपल्या नव्या नाट्यांत त्यांनीं अनेक देशी-विदेशी आदर्शांचा बेमालूम मेळ साधला. संस्कृत नाटकांची परंपरा त्यांनीं अभ्यासिली होती. शेक्स्पीअरवर त्यांचें फार प्रेम होतें आणि शाळकरी विद्यार्थी असतांनाच त्यांनीं शेक्स्पीअरच्या एका नाटकाचें बंगालींत रूपांतर केलें होतें. भारत-रामायणाच्या कथा आपल्याकडील दशावतारांप्रमाणें खेळ करून दाखविणारे लोकनाट्याचे कसबी कलाकार बंगाल्यांतहि होते; आजहि आहेत. रवीन्द्रांनीं भाषा व संगीत यांसाठीं जशी लोकवाङ्मयांतून व लोकगीतांतून स्फूर्ति घेतली त्याप्रमाणें नाट्याच्या बांधणींतहि या लोकनाट्याचें तंत्र वापरलें. 'वाल्मीकि–प्रतिभा' ही त्यांची पहिली नाट्यकृति लोकनाट्याच्या थाटाची आहे. पण तींत संगीत आहे तें आयरिश, इंग्लिश थाटाचें! कारण हें नाटक रंगभूमीवर आणण्यापूर्वीं थोडाच काळ अगोदर रवीन्द्रांनीं या नाट्यकृति पाहिल्या होत्या. शांतिनिकेतनाच्या नाट्यसंघानें सादर केलेल्या रवीन्द्रांच्या नाट्यकृति आणि त्याचेच इतरांनीं केलेले प्रयोग पाहिले म्हणजे रवीन्द्रांनीं

रंगभूमीला कोणती देणगी दिली याची बरोबर कल्पना येते.

नाटकाची मूळ कल्पना आणि तालमी यांत रवीन्द्र लक्ष घालत. विख्यात चित्रकार नंदलाल बोस आणि रवीन्द्रांची स्नुषा प्रतिमादेवी नेपथ्याची काळजी घेत. अवनीन्द्रनाथ, गगनेन्द्रनाथ, आसितकुमार हलधर हे कलामर्मज्ञ आणि इतर अनेक मंडळी रंगमंचाच्या निरनिराळ्या शाखांकडे पहात. स्वतः रवीन्द्र हे आपल्या नाटकांत भूमिका करीत. रंगभूमीवरचा देखावा साधा पण सूचक असे. म्हणजे फारशी अडगळ नसे. पात्रें जुन्या आदर्श वेषभूषेंत रंगमंचावर येत. प्रकाशयोजना कौशल्यपूर्ण असे. महत्त्वाच्या भूमिकेवर किरण पाडून नाटकांतील तिचें महत्त्वाचें स्थान दिग्दर्शित केलें जात असे. रंगभूमीवर कुठें तरी ठळक ठिकाणीं एखादी प्रतिकात्मक वस्तु ठेवलेली असे. यामुळें वातावरणावर अद्‌भुततेची छटा चढे. परंतु सहसा कुठेंहि कृत्रिमता आणावयाची नाहीं असाच रवीन्द्रांचा कटाक्ष असे. चार भिंतीबाहेरील खुलें वातावरण रवीन्द्रांना विशेष आवडे तसेंच ते रंगभूमीवरहि कायम ठेवलेलें असे. पौराणिक किंवा कल्पनारम्य वातावरणाची ओळख पटविण्यापुरतीच वेषरचना असे. तींत फारसा झगमगाट कधीं असायचा नाहीं. अभिनयांत स्वाभाविकता यावी ही खटपट रवीन्द्रांनीं केली, इतकेंच नव्हे तर स्वतः जवळ जवळ दहा-बारा भूमिका करून तशा तऱ्हेची एक नवी परंपरा घालून दिली. भारतीय रंगभूमीच्या पुनरुज्जीवनांत रवीन्द्रांचें स्थान अनन्यसाधारण आहे.

नाट्याइतकीच संगीतांतहि रवीन्द्रांनीं एक नवी दृष्टि आणि नवी सृष्टि आणली. स्वराची एकात्मता ( Melody ) हा भारतीय संगीताचा आत्मा तर स्वरांची विविधता ( harmony ) ही पाश्चात्य संगीताची ठेवण. आपल्याकडे गायक आणि वादक यांच्या स्वरांत अंशमात्र फरक झाला तर तो दोष ठरतो. पण पाश्चात्यांत अनेक वाद्यांच्या वृंदगीतांत प्रत्येक वाद्याची स्वराची पातळी वेगवेगळी असूं शकते. आपल्याकडील प्रांतोप्रांतीच्या लोक-गीतांत स्वरसंख्या कमी, पण हृदयाचा वेध घेण्याची शक्ति फार. रवीन्द्रांनीं या सर्व पद्धतींचा कसून अभ्यास केला होता. ध्रुपद, ख्याल, टप्पा या भारतीय संगीतांतल्या प्रवाहांचे ते चांगले दर्दी होते. लोकगीताची विशेष गोडी त्यांना असे. या सर्व पद्धतींतले कांहीं विशेष एकत्र करून नव्या स्वरसंहति,

नवे ताल, नवे मिश्र राग रवीन्द्रांनीं तयार केले. ९, ११, आणि १५ मात्रांचे नवमी, एकादशी, पंचदशी असे ताल बसविले. हार्मोनियम् हें वाद्य रवीन्द्रांना सदोष वाटे. ते वीणा पसंत करीत. परंतु दिलरुबा-वादकांचा भरणा जास्त होता. रसाप्रमाणें शब्दांना स्वराची साथ देण्याचें तंत्र त्यांनीं उपयोगांत आणलें. शास्त्रीय आणि सुगम दोन्ही प्रकारच्या संगीतांत रवीन्द्रांनीं नवे स्वरबंध निर्माण केले. विशेषतः संगीतिका, समूह-गान, पार्श्वगान यांची एक स्वतंत्र सरणीच त्यांनीं निर्माण केली. बंकीमचंद्रांच्या 'वंदे मातरम्'ला चाल लाविली आणि स्वतः 'जन-गण-मन'सारखें अपूर्व राष्ट्रगीत रचलें. आज भारतीय रंगभूमि आणि संगीत-शाळा यांत जें कांहीं नवचैतन्य व नवेंपण दिसतें आणि ज्यामुळें या कलाविष्कारांत आपण पाश्चात्त्यांबरोबर अभिमानानें उभें राहूं त्याचा पाया रवीन्द्रांनीं घातला. सुंदर भावना आणि त्यांचा रमणीय आविष्कार यांमुळेंच मानवी जीवन सुखावह होतें. आजच्या युगांत त्या तऱ्हेचें कार्य रवीन्द्रांइतकें ज्याला साधलें असा वाग्भट विरळाच !

लघुकथाइतकाच रवीन्द्रांनीं दुसरा कोणता वाङ्मयप्रकार यशस्वी रीतीनें हाताळला असेल तर तो निबंध. रवीन्द्रांच्या गूढ संदिग्ध काव्यावर तुष्ट नसलेले अगणित रसिक त्यांच्या प्रसन्न निबंधावर लुब्ध असतात. आपण एखाद्या निर्णयाजवळ ज्ञानाच्या साधनानें येत नाहीं तर त्या निर्णयाचा साक्षात्कार आपणाला होतो असें रवीन्द्र म्हणत. कवीचा धर्म तो हाच. एखाद्या गोष्टीची चिकित्सा करून तर्कपद्धतीनें चांगलें-वाईट पहात अखेर त्या गोष्टीचें स्वरूप ठरवावयाचें ही पंडिताची रीत झाली. असा दीर्घ आणि कंटाळवाणा प्रवास कवि करीत नाहीं. त्या गोष्टीचें अंतरंग त्याला एकदम आकलन करतां येतें आणि जें भासमान् झालें तें शब्दांत व्यक्त करतांना मग त्याला सुसंगति येत जाते. या दृष्टीनें कवीची जात साक्षात्कारी संतासारखी आहे.

पण रवीन्द्र जसे श्रेष्ठ कवि व संत तसेच उत्तम शिक्षकहि होते. जीवनाची घडण कशी असावी याचें शास्त्र त्यांनीं स्वतः अभ्यासिलें होतें; ह्या शास्त्रांत आपल्या प्रतिभेनें त्यांनीं मोलाची भर घातली होती आणि हें सारें जगानें शिकावें याविषयीं त्यांना अमर्याद तळमळ होती. एक शब्द बोलून

सर्वांना कुंठित करावें ही शक्ति त्यांच्यांत होतीच. पण केवळ एवढेंच त्यांना करावयाचें नव्हतें. भूतकाळांतलें संचित ज्ञान आणि नवें स्फुरणारें सत्य यांची जोड घालून जगाला एक मंगल मार्ग आंखून देण्याचें महत्कार्य त्यांना करायचें होतें. त्यांच्या निबंधांत ही त्यांची द्रष्टेपणाची भूमिका फार स्पष्ट रीतीनें प्रकट झाली आहे. गिरिकंदरीं असलेलें पाण्याचें टाकें कसें स्वच्छ असतें ! अगदीं तळाशीं पडलेलें नाणें सुद्धां पाहून घ्यावें. तसेंच रवीन्द्रांचें निबंध-वाङ्मय आहे. अत्यंत प्रसन्न, तितकेंच गोड आणि निरामय. तें आखीव नसलें तरी अव्यवस्थित नाहीं. त्यांत अध्ययनाचें वजन दिसतें पण विद्वत्तेचा दिमाख मिरवलेला आढळायचा नाहीं. त्यांत नाट्य नाहीं, पण वक्तृत्व आहे. मधून मधून सूत्रांचीं कमळें विवेचनाच्या ओघांत वहात येतात त्यामुळें एकंदर प्रवाहाला शोभा आणि सुगंध येतो.

“ कला आम्हा मानवांना ‘ अमरतेचीं लेकरें ’ असें संबोधत असते. नंदनवनांत राहण्याच्या आमच्या हक्काचाच जणूं ती पुकारा करीत राहते.”

“ जीवन म्हणजे तें ( परतत्त्व ) आणि हें ( जीवतत्त्व ) यांचा ऋणानुबंध होय. ”

“ मनुष्याजवळ भावशक्तीचा खूप मोठा सांठा असतो. स्वसंरक्षणासाठीं त्यांतला फार थोडा भाग खर्चीं पडतो. उरलेल्या भागांच्या साह्यानें कला निर्माण होते. ”

“ जडसृष्टीच्या साह्यानें स्पष्ट करतां येणार नाहीं असें माणसांत कांहीं आहे काय आहे, आणि काय असावें हें तें द्वंद्व आहे. मनुष्येतर प्राण्यांत हा संघर्ष नाहीं. उपलब्ध काय आहे आणि इच्छा कशाची आहे एवढाच विचार तो करतो. पण काय इच्छिलें जातें आणि काय इच्छिलें जावें याचा झगडा माणसाच्या अंतःकरणांत असतो. काय इच्छिलें जातें हें इतर प्राण्यांप्रमाणेंच त्याला वाटतें. पण काय इच्छिलें जावें हें मात्र जड सृष्टीच्या फार पलीकडे असतें. ”

या सूत्रांमागच्यापुढच्या ओघ वक्तृत्वाचा आहे. कदाचित् याचें कारण असेंहि असेल कीं, रवीन्द्रांचे कांहीं निबंधसंग्रह हे व्याख्यानांतून तयार झाले आहेत. Creative Unity, Nationalism, Personality इ.

त्यांचे जगभर गाजलेले निबंध महत्त्वाच्या व्यासपीठावरून दिलेलीं व्याख्यानें आहेत. मूळचीच प्रासादिक शैली अधिक सुबोध झाली आहे. उत्कट पण संयत असा भावावेग त्यांत आला आहे.

Sadhana या त्यांच्या उत्कृष्ट पुस्तकांत रवीन्द्र-दर्शन जवळ जवळ संपूर्ण अंशांनीं पाहायला मिळतें. जीवनाचा आनंद कशांत आहे ? जीवनाचें रहस्य काय ? याचें कलात्मक स्पष्टीकरण यांत झालें आहे. बुद्धिवाद आणि जडवाद यांनीं माणसाच्या मनांतली सृष्टीबद्दलची भीति घालविली तरी श्रद्धा व आनंद यांना कांहींसा धोका दिला. खरें आनंदमय जीवन हें भौतिक सृष्टीच्या सीमा ओलांडल्यावर सुरू होतें हें रवीन्द्रांच्या साऱ्या तत्त्वचिंतनाचेंच सूत्र होतें. 'साधना' वाचून ज्यांचा संमोह नष्ट झाला आणि जीवनाविषयीं ज्यांना श्रद्धा वाटूं लागली असे अनेक साधक आहेत.

Nationalism हा त्यांचा निबंध म्हणजे उदार राष्ट्रवादाची धर्मसंहिताच म्हणावी लागेल. रवीन्द्रांनीं या निबंधांत जेव्हां हे विचार प्रकट केले त्या वेळीं फॅसिझमूचें उग्र स्वरूप जगाला फारसें दिसलें नव्हतें. भारतीय स्वातंत्र्याचा अरुणोदय तर फारच लांब होता. असें असूनहि हुकूमशाहीचा विरोध आणि स्वातंत्र्याच्या खऱ्या आशयाचें दिग्दर्शन त्यांत सांगोपांग आलें आहे. भारतावरील इंग्रजी अंमल हा कृत्रिम बनाव आहे; त्यांत कार्यक्षमता असली तरी ती यंत्रासारखी आहे. तींत जिवंतपणा आणि आत्मीयता नाहीं असें रवीन्द्रांनीं सांगितलें. भारतांत अनेक आक्रमक आले, पण ते या देशाशीं मिळून गेले. इंग्रजांनीं अलिप्तता ठेवली. या भूमीशीं ते अंतःकरणानें एकरूप झाले नाहींत. आणि अशी वरून लादलेली उपरी सत्ता जेव्हां एखाद्या देशांत असते तेव्हां त्या देशाचा आत्मा गुदमरून जातो. स्वातंत्र्य आणि राष्ट्रीयत्व यांचें अभेद्य आहे. पण आधुनिक राष्ट्रवादानें जें रणकुंड पेटविलें, वसाहतवादाचा जो निंद्य उपक्रम केला त्यावर रवीन्द्रनाथांनीं प्रखर हल्ला चढविला. तसेंच हिंदु समाजांतील दुष्ट रूढि आणि विषमता यांचाहि त्यांनीं निषेध केला. राष्ट्रवाद जर आपल्या स्वयंप्रभेनें आपल्या लोकांस व जगास कल्याणप्रद व्हायचा असेल तर तो समतेवर आधारला पाहिजे हें रवीन्द्रांनीं पटवून दिलें. पश्चिमेकडील राष्ट्रवादाची परिणति हुकूमशाहींत झाली. राष्ट्रवादानें तेथें अंतर्गत समता प्रस्थापित केली तरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

बाहेरच्या लोकांना गुलाम बनवलें. त्या गुलामींत आपण भारतीय सांपडलों. पण आपणांस स्वतंत्र होऊन राष्ट्रवादाचा जयजयकार करायचा असेल तर आपण राजकीयदृष्ट्या नव्हे तर सामाजिकदृष्ट्या ज्यांना गुलाम केलें आहे त्यांना स्वतंत्र केलें पाहिजे. रवीन्द्रांच्या या विचारप्रवर्तनाचा परिणाम आधुनिक भारतावर किती झाला याचें मूल्यमापन करायची वेळ आज आली आहे हें खास.

Personality हा त्यांचा निबंध Creative Unity या निबंधाबरोबर वाचायला हवा. कला आणि माणसाचें आंतरिक व्यक्तिमत्त्व यासंबंधीं कांहीं स्वतंत्र व पल्लेदार विचार यांत वाचायला मिळतात. या सर्वांतून प्रकट झालेलें रवीन्द्र-दर्शन म्हणजे 'सौंदर्यवादी अध्यात्म' असें म्हणण्यास हरकत नाहीं. माणसाचें व्यक्तित्व हें मूलतः आनंदमय व स्वतंत्र आहे. पण जगाच्या चक्रांत सांपडून तें व्यथित व परतंत्र होतें. यांतून मूळ आनंदमय स्वरूपाला जाण्याची धडपड हीच कलानिर्मिति आणि हाच व्यक्तिमत्त्वाचा विकास.

रवीन्द्रांच्या मतें माणूस जेव्हां आपल्या सामान्य क्षुधांपुढें नाइलाजानें नमतो तेव्हां एक प्रकारची लाजिरवाणी अवस्था निर्माण होते. त्याला स्वतःची स्वतःला लाज वाटूं लागते. मेल्याहून मेल्यासारखें होतें. सौंदर्य हें सामान्य क्षुधांच्या पलीकडील असल्यानें सौंदर्योपासनेमुळें माणसाची या लाजिरवाण्या अवस्थेंतून सुटका होते. सौंदर्यशोधक वृत्तीनें माणसाला क्षुधा-तृषेच्या पातळीवरून वर काढून माणुसकीच्या शिखरावर चढविलें. सौंदर्यामुळें माणसाच्या वासना नियंत्रित झाल्या. जेथें उत्कष्ट कला आहे, तेथें उच्च प्रकारचें सौंदर्य आहे; आणि तेथेंच निष्ठा आणि आत्मनिग्रह आहे. स्वैराचाराला त्या ठिकाणीं प्रवेश नाहीं.

या साऱ्या तत्त्वांच्या स्पष्टीकरणांत रवीन्द्रांनीं आपली निबंधसंपदा राबविली आहे. रवीन्द्रांनीं इतिहास, टीकाशास्त्र यांवर ग्रंथ लिहिले. आत्म-चरित्र लिहिलें. चीन, जपान, रशिया इ. देशांहून त्यांनीं पाठविलेलीं पत्रें अत्यंत उद्बोधक आहेत. त्यांत नवी माहिती आहे; नवी दृष्टि, नवें निरीक्षण आहे. नवें जग घडविण्याविषयीं जे जगड्व्याळ प्रयत्न होत आहेत त्यांच्याविषयीं आदर व कुतूहल बाळगूनहि रवीन्द्रांनीं आपल्या प्राचीन

मातृभूमीच्या चिरंतन मूल्याविषयींची आस्था रतीभरहि सोडलेली नाहीं. जगाचें आणि भारताचें प्रतिनिधित्व त्यांनीं एकदमच केलें आहे.

रवीन्द्र जसे लोकोत्तर साहित्यिक होते तसेच असामान्य समीक्षाकार होते. ‘ प्राचीन साहित्य ’ हा त्यांच्या कल्पक व सहृदय समीक्षेचा परिपाक होय. यांत त्यांनीं रामायण, महाभारत, शाकुंतल, कादंबरी, मेघदूत इ. संस्कृत महाकाव्यांवर व नाटक-उपन्यासांवर सुंदर लेख लिहिले आहेत. हे लेख केवळ परिचयात्मक नाहींत किंवा केवळ रसग्रहणात्मकहि नाहींत. यांची धारणा कांहीं वेगळीच आहे. संस्कृतांतल्या आदर्श कलाकृतींवरून स्फुरलेलीं हीं स्वतंत्र गद्यकाव्येंच म्हणतां येतील. जाणत्या वजनदार माणसानें राजवाड्यांत आपणांस एकदम अंतःपुरापर्यंत घेऊन जावें त्याप्रमाणें रवीन्द्रांनीं संस्कृत काव्याच्या अंतरंगापर्यंत आपणांस सहजासहजीं नेऊन सोडलें आहे. वाटेंत मधुर कल्पनांचीं फुलें अंथरलीं असल्यानें चालण्याचा त्रासहि होत नाहीं. हीं काव्यें आपण वाचलीं असलीं तरी त्यांत नवें सौंदर्य दिसूं लागतें. मन कधीं उदात्त रसानें भरून जातें तर कधीं कारुण्यानें ओथंबतें. तो मेघदूतांतला विरही यक्ष, ती रामायणांतली उपेक्षित उर्मिला, त्या शाकुंतलांतील तपस्विनी प्रियंवदा आणि शकुंतला, ती कादंबरींतली व्यथित पत्रलेखा या साऱ्या व्यक्ति कांहीं वेगळें सौंदर्य धारण करून आपणांला भेटतात. आपला आणि त्यांचा ऋणानुबंध जडतो. त्यांचें दुःख आजवर कां बरें आपणांला कळलें नाहीं अशी एक रुखरुख मनाला लागते आणि असेंहि वाटतें कीं, रवीन्द्रांनीं दृष्टि दिली नसती तर त्या दुःखाचें आकलन आपणांला कधींच झालें नसतें.

समीक्षेबद्दल रवीन्द्रांचें निश्चित मत आहे : “...समालोचना पूज्य भावाच्या उमाळ्यानें बाहेर पडणारें एक विवेचन आहे. अशाच रीतीनें एका हृदयाची शक्ति दुसऱ्या हृदयांत संक्रान्त होते. आपल्या आजकालच्या समालोचना बाजारी धोरणावर होत असतात. कारण साहित्य हा बाजारांतला एक जिन्नसच होऊन बसलें आहे !...तथापि आमचें असें स्पष्ट मत आहे कीं, समालोचना म्हणजे पूजा. समालोचक हे पुजारी किंवा पुरोहितच म्हणावयाचे. ते स्वतःचा अथवा सामान्य जनतेचा आदरयुक्त भक्तिभावच केवळ व्यक्त करतात. ”

ग्रं. क्र. ११६४०

अर्थात् पूजाविषय श्रेष्ठ असेल तर पूजकाची भक्ति विशेष उफाळून येणार हें उघडच आहे. रवीन्द्रांनीं 'प्राचीन साहित्यां'त जगन्मान्य-ग्रंथच विवरणासाठीं घेतले. त्यामुळें त्यांना भूमि अनुकूल मिळाली. पण थोर विषय घेण्यांत फायदा आहे. तसाच धोकाहि आहे. समीक्षाकार जर वर्ण्यविषयाच्या उंचीपर्यंत पोंचूं शकला नाहीं तर त्याचें प्रतिभादारिद्य उघडें पडणार. रवींद्रांनीं समीक्षेसाठीं घेतलेल्या विषयांची उंची तर कायम राखलीच. पण त्यांच्यांत नवा थोर आशय ओतला. पौराणिक काव्यांतील सौंदर्य आणि संस्कृतीचें श्रेष्ठत्व यांत रंगलेल्या त्यांच्या आत्म्यानें त्या महाकाव्यांशीं आपली सोयरीक जुळवून दिली आहे.

'मेघदूतां'तील यक्ष, त्याचा शाप, त्यानें मेघाबरोबर पाठविलेला संदेश यांची स्थूल कल्पना सामान्य रसिकाला असते. पण सारेच एका गिरि-प्रदेशांत उभे असून पलीकडे दुर्गम तीरावर असलेल्या प्रियजनांकडे पहात आहोंत याची इतकी हृदयंगम जाणीव रवीन्द्रांनीं करून दिली आहे कीं, यक्षाची व्यथा आपली होते. 'रामायणांती'ल राम, सीता, लक्ष्मण इ० उदात्त स्वभावचित्रें आपणाला कां आपलींशीं वाटतात, याचें रवीन्द्रांनीं सुरेख विवरण केलें आहे. राम हा देवाचा मानवरूपधारी अवतार नव्हे तर देवपदाला चढलेला मनुष्य होय. वाल्मीकि रामाला देव मानत नव्हता, तर मनुष्य मानत होता. आदर्श आपणाला अशक्य वाटत असला तरी त्याचें अस्तित्व खरें मानणें हा आपला धर्म आहे. ही दृष्टि आल्यानें 'रामायणा'ला कांहीं वेगळेंच महत्त्व येतें. व्हाऱ्यांतून तें आपल्या रोजच्या जीवनांत येतें. समीक्षाकार रवीन्द्रांचें सामर्थ्य तें हेंच.

'शाकुन्तल' ही एका रंगेल राजाच्या आणि मुग्ध तपस्वी कन्येच्या प्रेमाची कहाणी आहे एवढेंच प्रख्यात आहे. आपण ही प्रेमकथा आवडीनें वाचतों. जर्मन महाकवि गटे याला यांत स्वर्ग-पृथ्वीचें मीलन आढळलें. आणि तो अक्षरशः तें नाटक डोक्यावर घेऊन नाचला. हें मीलन कसें झालें आहे हें रवीन्द्रांनीं दाखविलें. या नाटकाचें अप्रतिम सौंदर्य स्पष्ट करतांना प्रेम, वासना, पश्चात्ताप यांची सुरस मीमांसा रवीन्द्रांनीं केली आहे. वासनांचें हीण जळून गेल्याशिवाय प्रेमाचें सुवर्ण शुद्ध होत नाहीं, हें दाखवून 'शाकुन्तल'च्या सौंदर्याला एक अपूर्व सांद्रता त्यांनीं आणिली

आहे. जीवनाचे ते श्रेष्ठ भाष्यकार होते म्हणूनच आदर्श साहित्यांचें रहस्य अगदीं स्वतंत्र तऱ्हेनें त्यांना सांगतां आलें. ‘ शाकुंतल ’, ‘ मेघदूता’वरील त्यांचे निबंध म्हणजे त्या ग्रंथांच्या तोडीचींच काव्यें आहेत. ‘ स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती’ रवीन्द्राच्या या साहित्यामुळें वाल्मीकि-कालिदासांना तर हें भाग्य मिळालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

★

# चित्र-नृत्य

**“ नृत्याच्या ताला तालाबरोबर हे नटराजा, सारे बंध तोडून टाक. सुप्ति नाहींशी करून अंतःकरणांत विमुक्त सुरांचें सौंदर्य निर्माण कर. ”**

✤ ✤ ✤ ✤ ✤ ✤ ✤ ✤

महाकवीची प्रतिभा अप्सरेप्रमाणें चिरतरुण असते. आपणाला प्रतीत झालेलें सौंदर्य प्रकट करण्याकरितां ती निरनिराळे प्रयोग करीत राहते; निरनिराळीं माध्यमें शोधीत असते. रविबाबू वयाच्या सत्तरीला चित्रकलेकडे वळले. ज्या वेळीं माणसाच्या बौद्धिक नव्हे तर शारीरिक शक्तिहि क्षीण होऊन जातात अशा वेळीं आत्माविष्कारासाठीं आपली लेखणी क्षणभर बाजूला ठेवून त्यांनीं कुंचला हातीं घेतला. आजवर शब्दांत आपली कला आपण प्रकट केली. पण शब्द हें माध्यम तोकडें असतें. रंग-रेषा ही साऱ्या जगाची भाषा आहे. ती आपणाला हाताळतां आली याबद्दल त्यांना फार समाधान वाटलें आणि स्वर्गस्थ होईंपर्यंत त्यांनीं सुमारें २०० उत्कृष्ट चित्रें रंगविलीं. या चित्रांचीं प्रदर्शनें सर्वत्र भरलीं आहेत. तज्ज्ञांनीं त्यांवर रसग्रहणात्मक परीक्षणें लिहिलीं आहेत.

पहिल्या प्रथम रवीन्द्र रेखाचित्रें ( Sketches ) काढीत. नंतर त्यांनीं कुंचला हातीं घेतला. पक्षी, झाडें, देखावे, मनुष्यप्राणी इ० अनेक विषय त्यांनीं चितारले आहेत. एखादें झाड वाढीच्या ऐन भरांत असलेलें दिसावें

किंवा एखादी इमारत पुरी होण्याच्या मार्गावर असलेली आढळून यावी तशीं रविबाबूंचीं चित्रें वाटतात. तीं पुरीं व्हायला अजून थोडा मालमसाला अवश्य आहे असें वाटतें. रेखीव, ठाकठिकीचीं, परंपराबद्ध चित्रें पाहण्याची संवय असलेल्या सामान्य माणसांना हीं चित्रें अगम्य वाटतील. पण जरा श्रद्धा ठेवून पाहूं लागल्यास त्यांतला जिवंतपणा, लय, रंगसंगती जाणवूं लागेल.

रविबाबूंचे पुतणे अवनीन्द्रनाथ हे महान् चित्रकार होते. बंगाली परंपरा त्यांनींच स्थापन केली. मनुष्याच्या मनांत तरंगणाऱ्या कल्पनांना प्रतीकरूपानें व्यक्त करण्याची अवनीन्द्रबाबूंची हातोटी अवर्णनीय होती. पंथवेडे लोक कोणत्याहि काळीं किंवा कुठेंहि असतात. बंगाली चित्रकलेलाहि पंथवेडानें झपाटलें नाहीं असें नाहीं. अजिंठा हें अवनीबाबूंचें स्फूर्तिस्थान होतें तर त्यांचे शिष्य नंदलाल बोस यांनीं कांग्रापद्धति व चिनी चित्रकला यांचा मिलाफ केला. कांहीं बंगाली चित्रकार प्रतीकात्मक पद्धतीचा अतिरेक करून विचित्र कलाकृति रेखाटत ! असें असलें तरी आधुनिक भारताच्या पुनरुज्जीवनांत बंगाली चित्रकलेचें स्थान फार उच्च आहे. पण रवीन्द्र या पंथांतले नाहींत; पाश्चात्त्य देशांतल्या यथातथ्य दर्शनाचे किंवा 'क्यूबीझम्' वगैरे आधुनिक पद्धतीचेहि ते अनुयायी नाहींत. रवीन्द्रांची चित्रकला ही अगदीं स्वतंत्र म्हणजे त्यांचीच आहे. संस्कृतिसंगमाचे ते पुरस्कर्ते होते. त्यामुळें पाश्चात्त्यांच्या कलेंतलीं कांहीं कांहीं मूलतत्त्वें त्यांनीं जरूर पत्करलीं. माणसांच्या प्राथमिक अवस्थेंत बाह्य वस्तूचा जो एक घवघवीत परिणाम अंत:पटलावर होतो त्याचा कलेंत झालेला स्फोट ( Burst of Art ) अति प्राचीन चित्रांत दिसून येतो. गुहेंतील आदिवासींनीं काढलेलीं चित्रें किंवा मुलें आरंभीं चितारतात त्या आकृति हीं याचीं उत्तम उदाहरणें होत. यांतलेंहि कांहीं द्रव्य (Element) रवीन्द्रांच्या चित्रांत आढळतें.

चित्रकला म्हणजे एक 'खेळ' अशी रविबाबूंची दृष्टि नव्हती. या कलेकडे ते वळले ते कांहीं खोल खोल दडलेलें अधिक परिणामकारक रीतीनें सांगतां यावें म्हणूनच. आपलें काव्यच आपणाला रंग-रेषांत मांडावयाचें आहे असें आपल्या चित्रतंत्राचें वर्णन रविबाबूंनीं दिलें आहे. ते म्हणत, अमुक आकृति काढायची असा आगाऊ आराखडा तयार करून आपण कुंचला हातीं घेत नाहीं. खोल अंतर्मनांत चाललेली खळबळ

रंग-रेषांत व्यक्त करतां करतां एखादी आकृति तयार होत जाते. " माझ्या चित्रकन्या अकल्पित व अनियंत्रित असतात. " असें रविबाबूंचें म्हणणें आहे. म्हणूनच चित्रांना त्यांनीं नांवें दिलीं नाहींत. वाचकांना जर नांवा-शिवाय चित्रें निराधार वाटत असतील तर त्यांनींच पाहिजे तर चित्रांना नांवें द्यावीं असें ते सांगत !

कांहीं बोध द्यावा यासाठीं रवीन्द्रांनीं चित्रें रेखाटलीं नाहींत. चित्राचे विषय भव्य दिव्य पाहिजेत असें त्यांचें मत नव्हतें. आपल्या नेहमींच्या परिचयांतल्या अत्यंत क्षुद्र गोष्टीचें जरी आपण यशस्वी चित्रण केलें तरी कलेचें सार्थक झालें असें वाटलें पाहिजे. साध्या दृष्टीला वस्तु दिसते तशी ती रंगविणें हें चित्रकलेचें कार्य नाहीं. तें यंत्रानें घेतलेलें जड छायाचित्र झालें. प्रत्येक वस्तूंत जो अंतरात्मा आहे त्याचें चित्रण करणें ही खरी चित्रकला. डोळ्यांच्या साह्यानें प्रेक्षकांच्या कल्पनाफलकावर वस्तूचें खरेंखुरें म्हणजेच तिच्या अंतरात्म्याचें चित्र रंगविणें हें चित्रकलेचें काम आहे. रवीन्द्रांनीं काढलेलीं फुलें नेहमींच्या किंवा सांकेतिक फुलांसारखीं नाहींत; त्यांच्या मनुष्याकृतींना रेखीव नाकडोळे नाहींत पण कणा व चैतन्य आहे. रवीन्द्रांनीं रेखाटलेला एखादा प्राणी इतिहासपूर्व कालांतहि कदाचित् सांपडणार नाहीं ! पण त्यांत अशी मस्ती दिसेल कीं तो मोहरा करून तुमच्यावर येतो आहे असें वाटेल.

रवीन्द्रांच्या शेवटच्या काळांत सुप्रसिद्ध वंग चित्रकर्ती रानी चंद या गुरुदेवांच्या सान्निध्यांत होत्या. गुरुदेवांच्या छत्राखालीं राहून त्या चित्र-साधना करीत. रवीन्द्रांच्या चित्रकलेच्या नादाबद्दल त्यांनीं लिहिलेलें वर्णन फार हृदयंगम वाटेल.

कलाकारांचा महान् आत्मा त्यांनीं या लहानशा वर्णनांत आपल्यापुढें उभा केला आहे.

" जोंवर गुरुदेवाच्या पायांत चालण्याचें त्राण होतें तोंवर अधून मधून अवचित आमच्या घरांत येऊन आम्हांला थक्क करून सोडण्यांत त्यांना मोठी गंमत वाटे. कितीदां तरी दुपारच्या वेळीं चुपचाप दिवाणखान्यांत येऊन, हातार्शी लागेल तो कागद आणि पेन्सिल अथवा कोळशाची कांडी घेऊन फरशीवर बसून ते आमचीं चित्रें रेखाटीत. आम्हांला पत्ता

देखील लागत नसे! त्यांच्या खोकल्याच्या उबळीनें किंवा शिंकेच्या आवाजानें त्यांचा आम्हांला पत्ता लागे. मग लगबगीनें त्यांच्यापाशीं जाऊन लडिवाळपणानें, काकुळतीनें "आम्हांला कां नाहीं हांक मारली?" असें विचारलें कीं ते गोड हंसत आणि आम्हांला साऱ्या गोष्टीचा विसर पाडीत.

"चित्रें काढतांना त्यांना जवळ कोणी असावें असें वाटत नसे. त्यांनीं चित्रें काढायला सुरुवात केली तेव्हां आरंभीं आरंभीं मी अगदीं दूर उभी राहून पहात असें. गुरुदेवांना लाल रंग दिसत नसे. पण निळ्या रंगाची अगदीं मंद छटाहि त्यांच्या दृष्टींतून सुटायची नाहीं. एकदां परदेशांत रेल्वेंतून जात असतां कडेला असंख्य छोटीं छोटीं निळीं फुलें त्यांना दिसलीं. त्याविषयीं ते सांगत, "मी किती तरी बायांना बोलावून तीं फुलें दाखविलीं. त्यांना तीं फुलें दिसतच नव्हतीं. पण मला आश्चर्य वाटत होतें– असले रंगहि लोकांच्या नजरेंतून सुटावेत अं!" ते रंगामागून रंग लावीत. रंग निवडायला अवसर मिळूं नये इतक्या वेगानें चित्र रेखाटत. कधीं निळा रंग लावण्यासाठीं मुळापासून चित्र बदलून टाकत...मला 'मॉडेल' बसवून कितीदां तरी ते चित्र काढीत. (पण त्या चित्रांत आणि माझ्यांत सारखेपणा शोधूनहि मिळत नसे!)...ते म्हणत, रानी, तुला अभिमान वाटायला पाहिजे, मी तुला किती विविध स्वरूपांत पाहतों बघ."

त्यांचा पक्षी आतां पंख उभारून भरारी मारील असा भास होतो. कित्येकदां त्यांच्या कांहीं कवितांतलेच भाव चित्रांत प्रतिबिंबित झालेले दिसतात. चिनी आणि हिंदी चित्रकला कांहीं प्रमाणांत त्यांनीं वापरली असली तरी रवीन्द्र-संगीताप्रमाणेंच रवीन्द्र-चित्रकला हें एक स्वतंत्र तंत्रच आहे. या चित्राकडे कांहीं वेळ पाहिलें तर तीं गतिमान् झालीं आहेत असें वाटतें. नृत्याच्या ऐन उत्कर्षांत नर्तक अगदीं स्थिर आहे असें वाटणें हें जसें नृत्याचें यश त्याप्रमाणेंच चित्र गतिमान् झाल्याचा आभास होणें हें चित्राचें यश म्हणतां येईल.

चित्रांइतकीच नृत्याचा पुनरुज्जीवनांत रवीन्द्रांनीं प्रतिभेची चमक दाखविली. नृत्य हें प्रेमाइतकेंच प्राचीन आहे असें लुसियननें म्हटलें आहे. रवीन्द्रांच्या मतें विश्ववाणीच नर्तनाच्या द्वारें बोलत असते. सूक्ष्म दृष्टीनें जे पाहतील त्यांना एकंदर जगाचा खेळ म्हणजेच नृत्य असें वाटेल. नद्यांचीं

वळणें आणि धबधबे, पक्ष्यांचें भ्रमण, समुद्राच्या लाटा, पानांशीं चाललेल्या वाऱ्याच्या लीला इत्यादि सर्व कांहीं एक प्रकारचें नृत्यच आहे. नृत्य ही मनुष्याच्या अगदीं रोमरोमांत भिनलेली कला आहे. आपण सुंदर दिसावें आणि प्रणयिनीचें मन आकर्षित करावें या हेतूनें मनुष्येतर प्राण्यांत नृत्याचा विलास चाललेला दिसतो. नृत्य हें अनुनयाचें एक प्रभावी साधन आहे. हें माणसालाहि प्रथमपासूनच पटलेलें आहे. आज आदिवासींच्या जीवनाइतकें नृत्याला प्राधान्य कुठेंहि नसेल.

पण अनुनय हाच केवळ नृत्याचा उद्देश नाहीं. नृत्याला धर्माचें अधिष्ठान असतें असें सर्वत्र दिसून येतें. आफ्रिकेंतील बांटू लोक प्रार्थना उपासना ही नृत्यरूपानेंच करतात. आणि जगांतील बहुतेक सर्व आदिवासी धर्मसंकीर्तन म्हणजेच नर्तन असें मानणारे आहेत. निसर्गपूजा किंवा अव्यक्त परमेश्वराचें भजन हें नृत्याच्या सहाय्यानेंच करतां येतें हें आतां सर्वमान्य आहे. भोपळ्याच्या वाद्याचे सूर आळवीत नाचणारे, भिल्ल, संथाळ, गोंड, 'हरिबोल' अशा शब्दांनीं मृदंगावर थाप मारणारे बंगाली वैष्णव, 'नाचूं कीर्तनाचे रंगीं' अशी प्रतिज्ञा करून 'ज्ञानबा तुकाराम'चा घोष करणारे वारकरी हे सारे नर्तनाच्या सहाय्यानेंच जिवाशिवाचें ऐक्य साधीत नाहींत काय? ख्रिस्ती परंपरा अशीच आहे. एका कॉर्निश भक्तिगीतांत असें म्हटलें आहे कीं, 'येशू ख्रिस्त हा माणसांनीं आनंदानें नृत्य करावें यासाठीं बलिदान करतां झाला.'

परंतु अनुनय अथवा उपासना ह्यासाठीं मनुष्यानें शोधून काढलेली ही अतिप्राचीन कला मनुष्याच्या विकासाबरोबर एक स्वतंत्र रंजनसाधना बनली. तो एक स्वतंत्र व्यवसायहि झाला. परंतु भारतांत तरी धार्मिक व सांस्कृतिक समारंभापुरतेंच त्याचें महत्त्व राहिलें. नर्तक असा स्वतंत्र वर्ग निर्माण झाला आणि सर्वसामान्य माणसाला नृत्याचा लाभ घेतां येईना. नृत्याला व्यवसायामुळें आलेला कलंक नाहींसा करून आधुनिक भारताच्या पुनरुज्जीवनांत त्याला कुलीन कुटुंबामध्यें प्रतिष्ठा मिळविण्यास ज्यांचे श्रम कारणीभूत झाले, त्यांत टागोरांचा वांटा मोठा आहे. 'गीत–वादित्र–नृत्य' असें नाट्याचें त्रिविध रूप फार प्राचीन काळापासून भारतांत मानतात. परंतु युरोपमध्यें जवळ जवळ १७ व्या शतकामध्यें नृत्याला कथेची जोड मिळाली, म्हणजे नृत्यांत नाट्य आलें. दक्षिण

भारतांत धार्मिक महाकाव्यांतल्या कथा मोठाले मुखवटे घालून नृत्यांत प्रगट करण्याची ‘ कथाकली ’ ही नृत्यपद्धति जुन्या काळापासून रूढ आहे. मुद्राभिनयावर आधारलेली भरत नाट्य आणि पदन्यासावर रंगणारें मणिपुरी नृत्य अशा अनेक परंपरा या देशांत आहेत. याखेरीज प्रांतोप्रांतींचीं लोकनृत्यें वेगळींच. भारतांत काय किंवा जगांत इतरत्र काय नृत्याला माणसानें विविध आकार दिले आहेत. ट्यूनिशिया देशांत केसाला प्राधान्य देणारा नाच आहे आणि रात्रभर चाललेल्या मैफलींत नृत्यांगना केवळ केसांच्या हालचालीनें लय दाखवीत असतात.

भारतीय नृत्याच्या पुनरुज्जीवनांत रवीन्द्रांचा भाग कोणता ? रवीन्द्रांनीं अमुक एक पद्धतीचा पुरस्कार केला असें नाहीं. अमेरिकेपासून इंडोनेशिया–बालीपर्यंत अनेक देशांत संचार करतांना तेथील आर्ष व आधुनिक नृत्यपद्धती रवीन्द्रांनीं सूक्ष्मपणें न्याहाळल्या आणि त्यांतलें हवें तें व हवें तेवढें आपल्या नृत्यपद्धतींत घेतलें. पहिल्या प्रथम शांति-निकेतनच्या नृत्यांत पदविन्यासाला फारसें महत्त्व नव्हतें. हावभाव करून शब्दांतला आशय व्यक्त करावा एवढेंच पाहिलें जाई. तथापि त्याला कांहीं आकार आणि योजना असेच. पुढें मणिपुरी पद्धतीला विशेष स्थान मिळालें आणि काव्य व नृत्य यांच्यांत बेमालून मेळ घालण्यांत आला. ‘ नटीर पूजा... ’ ही टागोरांची नाट्यकृति नृत्यनाट्याचें उत्तम उदाहरण होय. यापुढें चित्रांगनेंत तंत्राला अधिक पैलू पडले आणि दृश्य काव्य व संगीत यांत अधिक सुसूत्रता आली. रवीन्द्रनृत्यांत मुद्राभिनयाला गौण स्थान असलें तरी काव्याचा आशय नृत्य आणि संगीत यांच्या द्वारें वर्णन करण्याची त्यांची रीत फार परिणामकारक आहे. आज नृत्यकलेला भारतांत वेगळी प्रतिष्ठा मिळत आहे. ‘ संगीत आणि नृत्य याशिवाय शिक्षणाला पूर्णता येत नाहीं. ’ हें प्लेटोचें मत आधुनिक भारताला पटत चाललेंसें दिसतें. या साऱ्या जागृतींत, रवीन्द्रांचा भाग फार मोठा आहे हें कोणालाहि मान्य करावें लागेल. प्राचीन भारतांत असलेलें कलेचें अनमोल धन खणून काढून तें रवीन्द्रांनीं सुसंस्कारित केलें आणि त्याला आधुनिक जगाच्या जीवनाशीं सुसंवादी बनविलें.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... बिः ......
क्रमांक ...... नों० बि: ......

# पर्यटन

"भ्रमन्ती हा माझा स्वभाव आहे. मी फिरत राहिल्याशिवाय माझें कार्य चालू राहणार नाहीं."

* * * * * * * *

सर्व विश्व हें मानवसमूहाच्या एका घरट्यासारखें आहे असें रवीन्द्रांचें ध्येय-वाक्य होतें. याच ध्येयाचा पाठलाग करण्यासाठीं त्यांनीं आमरण कल्पना-सृष्टीप्रमाणेंच प्रत्यक्ष सृष्टींतहि भ्रमन्ती केली. ते जेथें जेथें जात तेथें तेथें निसर्गाची कांहीं वेगळी शान त्यांना दिसे. आणि जीवनाच्या आरंभीं विश्वात्मतेचा जो साक्षात्कार निसर्गाच्या सान्निध्यांत त्यांना झाला त्याचा पुनः पुनः प्रत्यय मिळे. लहानपणीं ते हिमालयांत हिंडले. त्या नगाधिराजाचें भव्य सुंदर रूप त्यांनीं दिवसा-रात्रीं, उन्हांत-चांदण्यांत अनेकदां बघून हृदयांत सांठवून घेतलें. नंतर स्वदेशांत आणि परदेशांत अप्रतिहत संचार करून निसर्ग आणि मानव यांच्या अद्वैताचा अनुभव मिळविला.

यौवनाच्या उंबरठ्यावर असतांना विलायतचा प्रवास रवीन्द्रांना घडला. उत्तुंग पर्वताइतकेंच अनंत सागराचें रूप त्यांना हृदयंगम वाटलें. आपणांला पुस्तकी शिक्षण घ्यायचें आहे आणि त्यासाठीं ही यात्रा आपण आरंभिली आहे याचें त्यांना भानच राहिलें नाहीं. त्यांची दिव्य प्रतिभा जागृत झाली आणि काव्यरचनेंतच ते रमून गेले. यानंतर एकदां ते पुनः विलायतेस आले. तेव्हांहि ती भेट कांहींशी खाजगत स्वरूपाची होती. पण

यानंतर मात्र त्यांचें जगत्पर्यटन सहेतुक आणि योजनाबद्ध असेंच होत गेलें. कांहीं शिकावें असा दुहेरी उद्देश धरूनच ते भारताचा किनारा सोडत आणि तो उद्देश पूर्ण सफल करून मायभूमीला परत येत.

भारतीय संस्कृतीचा प्रचारक आणि जगाचा नागरिक अशा दोन नात्यांनीं रवीन्द्र सर्वत्र जात. त्यांची कीर्ति जसजशी वाढूं लागली तसतशी त्यांना दशदिशांतून बोलावणीं येऊं लागलीं. या कवीश्वराचीं पदचिन्हें आपल्या देशाच्या मातींत उमटावींत आणि त्याचें तत्त्वज्ञान व काव्य त्याच्या तोंडून ऐकायला मिळावें यासाठीं जगभर लोक उत्सुक होऊन बसलेले असत. रवीन्द्रांच्या स्वागतांत एखाद्या ठिकाणीं सरकार बाजूला राहिलें आणि जनतेनें अमाप उत्साह दाखविला, किंवा जनता दूर राहिली आणि दरबारी सन्मान तेवढा मिळाला असें झालें नाहीं. प्रत्येक देशांत बहुधा सरकार आणि जनता यांनीं सारख्याच उत्साहानें त्यांचा सत्कार केला. विद्यापीठाच्या गूढ गंभीर सभागृहांत त्यांना सन्मान्य उपाधि अर्पण करण्यास विद्वज्जन जमले, तसेच त्यांच्या पदकमलांना स्पर्श करण्यासाठीं किसानांनीं गर्दी केली. राजदरबारांत त्यांना उच्चासनावर बसविण्यांत आलें आणि त्यांच्या मार्गावर गरीब रयतेनें स्वयंस्फूर्तीनें गुढ्या-तोरणें उभारलीं. जनतेनें जयजयकार करावा आणि राज्यशासनानें अवनम्र व्हावें असें दुर्लभ भाग्य रवीन्द्रांना लाभलें. ज्यांनीं रवीन्द्रांना पाहिलें ते कृतज्ञ राहिले. रवीन्द्र एखाद्या राष्ट्रांत गेले कीं शासन आणि शासित, धनिक आणि निर्धन, विद्वान् आणि अल्पशिक्षित यांचें द्वैत त्यांच्यापुरतें तरी मोडत असे. त्यांच्या दिव्य प्रभावानें सारे मोहून जात. या रवीन्द्रांच्या तेजांत जो तो न्हाऊन निघत असे. हे तेजःकण आपल्या जीवनांत सांठवून ठेवण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला. रवीन्द्रांच्याहि प्रातिभेला या जगत्यात्रेंत भर येई. ' Personality ', ' Creative Unity ', ' Nationaism ' यांसारखे त्यांचे अप्रतिम प्रबंध परदेशी लोकांपुढें निरूपण करीत असतांनाच तयार झाले. जपानमध्यें कित्येकांना स्वाक्षरी देतां देतां रवीन्द्र एखादा काव्यमय विचार लिहून जात. असलीं विचार-मौक्तिकें एकत्र करून Fire flies नांवाचा संग्रह तयार झाला आहे. ' पुढा स्नेह पाझरे । मागा धावती अक्षरें । अशी ही काव्यनिर्मितीची

जादू आहे. जपान, रशिया, चीन इ. देशांत रवीन्द्रांनीं जें निरीक्षण केलें त्यावर आधारलेल्या पत्रमालाहि प्रसिद्ध आहेत. ते ते देश आणि संस्कृति यासंबंधीं रसग्रहणात्मक पण स्पष्टोक्तिपूर्ण असे हे सुंदर प्रबंधच होत.

नव्या जगांत जें प्रचंड विधायक कार्य चाललें आहे त्याविषयीं रवीन्द्रांना पूर्ण आदर होता. विज्ञानाचें त्यांना वेड नसलें तरी आकर्षण होतें. अगदीं अखेरच्या दिवसांत मुलांना विज्ञानाची सुबोध माहिती करून देणारीं पुस्तकें लिहिण्याचा उपक्रम त्यांनीं योजिला होता. पण असें असलें तरी विज्ञानामुळें झालेल्या केंद्रीकरणाचे ते कट्टे विरोधक होते. उदयोन्मुख राष्ट्राच्या सत्कारानें भारावून हा विरोध प्रकट करण्यास ते कधींहि कचरले नाहींत. लष्करशाही किंवा साम्राज्यशाही यांविषयींहि ते आपला निषेध सडेतोडपणानें मांडत. आपण जेथें सरकारी व बिनसरकारी सत्कार घेत आहोंत तेथें विरोधी मत कसें मांडावें याचा संकोच किंवा भीति त्यांना नसे. १९१६ सालीं जपानमध्यें "जपानची अस्मिता" या विषयावर ते बोलले. जपान आणि भारत यांतील प्राचीन ऋणानुबंधाची व जपाननें स्वपराक्रमावर केलेल्या उत्कर्षाची जाणीव ठेवूनहि त्यांनीं जपानला लष्करशाहीविरुद्ध इषारा दिला. ही लष्करशाही हा भयानक नवसंस्कृतीचा परिणाम आहे आणि आपल्या पाश्चात्त्य गुरूचें अनुकरण करण्याच्या मोहांत सांपडून जपाननें सर्वनाश करून घेऊं नये असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. यामुळें जपान सरकारचा रोष त्यांना ओढवून घ्यावा लागला पण ते डगमगले नाहींत.

१९१७ सालीं अमेरिकेंत त्यांना हाच अनुभव आला. 'राष्ट्रवादाचा पंथ' या विषयावर रवीन्द्रांनीं भाषण-माला गुंफली. साम्राज्याच्या वाढीसाठीं राष्ट्रवादाचा उपयोग करण्याच्या पाश्चात्त्य वृत्तीवर त्यांनीं कोरडे ओढले म्हणून हीं भाषणें अनेकांना झोंबलीं. ज्या संस्थेनें त्यांना वरील व्याख्यान-मालेसाठीं बोलाविलें होतें. त्या संस्थेच्या मुख्यानें रवीन्द्रांना कळविलें कीं, आपल्या व्याख्यानांतले कांहीं विचार इकडे पचविण्यास जड गेले असून लोकमत प्रक्षुब्ध झालें आहे. तरीहि रवीन्द्रांनीं पुन: अमेरिकेचा दौरा काढलाच. साम्राज्यमदानें धुंद झालेल्या पश्चिमेनें पूर्वेचा सात्त्विक संदेश ऐकला पाहिजे. त्यांत तिचें आणि मानवतेचें हित आहे अशी रवीन्द्रांची खास निष्ठा होती. या खेपेस त्यांनीं आपल्या सुमधुर वाग्विलासानें अमेरिकन

जनतेच्या मनांतील अनेक किंतू नाहींसे केले. आत्मशक्ति हीच जीवनांत खराखुरा कल्याणमार्ग दाखविणारी आहे आणि इतर शक्ति त्या मानानें क्षीण व खोट्या आहेत, हें त्यांच्या विवेचनाचें सूत्र होतें. १९२४ मध्यें चीनमध्यें दोन सभांत त्यांनीं हेंच स्पष्ट करून सांगितलें. सत्ता-संपत्तीचे पाईक आणि पाश्चात्त्यांचे बौद्धिक गुलाम त्यामुळें खवळले. १९२० मध्यें रवीन्द्रांनीं आपली ' सर ' ही पदवी ब्रिटिश सरकारच्या निषेधार्थ परत केली तेव्हां इंग्लंडमध्यें त्यांना कांहींसें थंडें स्वागत अनुभवावें लागलें. पण विरोधाच्या अशा क्षोभाला तत्त्वासाठीं त्यांनीं सतत तोंड दिलें. विश्वभारती-साठीं फंड गोळा करीत असतां रवीन्द्रांच्या विशिष्ट मतप्रणालीचे विरोधक त्यांच्याविरुद्ध प्रचार करीत. त्यांच्या पेटींत लोकांच्या देणग्या पडूं नयेत यासाठींहि खटपट झाली ! पण रवीन्द्रांनीं आपलें ब्रीद सोडलें नाहीं.

मात्र असा विरोध रवीन्द्रांच्या उदंड मान्यतेच्या मानानें फारच थोडा झाला. या विरोधाच्या पार्श्वभूमीवर त्यांचें ठिकठिकाणीं झालेलें प्रचंड स्वागत अधिकच चित्ताकर्षक दिसतें. मुसोलिनीसारख्या उग्र हुकूमशहानें रवीन्द्रांची भेट घेण्यांत धन्यता मानली. ज्याची थोरवी अविवाद्य आहे अशा महात्म्याला आपणाला जवळून पाहतां आलें असें म्हणून मुसोलिनीनें आनंद व्यक्त केला. नॉर्वेत रवीन्द्रांचें दरबारी स्वागत झालें. आणि इजिप्तमध्यें त्यांच्या सन्मानार्थ लोकसभेची बैठक तहकूब करण्यांत आली. १९३२ सालीं सरकारी पाहुणे म्हणून ते इराणांत गेले. या वेळीं त्यांच्या ७२ व्या वाढदिवसांत खुद्द इराणचा शहा रेझाखान पेहेलवी यांनीं भाग घेतला. रवीन्द्र जन्मशताब्दीचा उत्सव रशियांत सर्वांत प्रथम सुरू व्हावा यावरून रशियांत रवीन्द्रांनीं केलेल्या दौऱ्याचा त्या भूमीवर केवढा खोल ठसा उमटला आहे याचा प्रत्यय येतो.

रवीन्द्रांचीं हीं दहा-बारा जगत्पर्यटनें एक प्रकारच्या धर्मयात्राच होत्या. ते जेथें जात तेथें भारतीय संस्कृतीचा संदेश पोंचवीत; त्याप्रमाणें तेथेंहि जें कांहीं उच्च-उदात्त असेल त्यांत समरस होऊन जात. जर्मनीमध्यें गेले असतां एकदां ते ख्रिस्तचरित्रावर आधारलेलें एक लोकनाट्य पहायला गेले. ही शोकांतिका होती आणि तिचा प्रयोग सर्व दिवसभर चालला होता. ख्रिस्तानुयायाइतकेच रवीन्द्रहि या ख्रिस्त-चरित्रात्मक नाटकावर लुब्ध

झाले. त्यांतील करुणोदात्त रसानें त्यांच्या भावना हेलावल्या. सारा दिवस ते प्रेक्षक म्हणून बसून राहिले.

रवीन्द्रांची थोरवी ती हीच. ज्या प्राचीन महान् संस्कृतींत त्यांनीं जन्म घेतला त्या संस्कृतीचें रहस्य सर्व जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत गेलें पाहिजे याचा त्यांना निदिध्यास होता. हा केवळ राष्ट्रीय अहंकार नव्हता, तर अनिष्ट प्रवृत्तींच्या आहारीं जात चाललेल्या जगाबद्दल, कळवळा या निदिध्यासाच्या मुळाशीं होता. विविधतेंतून एकता पाहण्याची त्यांची दिव्य दृष्टि त्यांच्या पर्यटनांतहि प्रत्ययाला येते. जगांतल्या प्रमुख राष्ट्रांतलीं वैशिष्टयें, उणीवा, मर्यादा, विधायक शक्ति या सर्वांचा आत्मीयतेनें अभ्यास करून भारतीय संस्कृतीची मशाल त्यांनीं सर्वत्र फिरविली. एका नव्या, स्थिर, कल्याणकारी, समताधिष्ठित जगाची रचना करण्यांत रवीन्द्रांनीं हयात घालविली. त्या रचनेची एक रंगीत तालीम असेंच त्यांच्या जगत्पर्यटनाचें वर्णन करतां येईल. रवीन्द्र दूर दूर हिंडले म्हणूनच माणसें जवळ आलीं. आज विधायक शक्ति आणि प्रेमभावना यांचा या सत्तापीडित जगांत थोडा-फार उत्कर्ष झालेला दिसत असेल, तर त्याला कांहींसें कारण रवीन्द्रांच्या या धर्मयात्रा होत असें म्हणण्यांत कुठलीच अतिशयोक्ति नाहीं.

★

# 'कालशिरिं झडे तुझा चौघडा'

"सत्ता ज्या वेळीं शरमिंदी होऊन प्रेमाला आपलें सिंहासन मोकळें करून देईल आणि मानवतेच्या मार्गावर जातांना राष्ट्रांचीं रक्तलांच्छित पावलें स्वच्छ करण्यासाठीं प्रभात उगवेल त्या वेळीं शुद्ध जलानें भरलेला कलश आणण्यासाठीं आपणांस पाचारण करण्यांत येईल अशी आशा करूं या. हे उपासनारूप जलसिंचन करून आपण धुळींतून फळांफुलांचा बहर येण्यास आणि मानवतेचें जीवन पावित्र्यानें मधुर बनण्यास साह्यकारी होऊं."

रवीन्द्र हे भाग्यशाली पुरुष होते. पण भाग्यामुळें त्यांची बुद्धि प्रमादशील किंवा आळशी झाली नाहीं, हें त्यांचें स्वतःचें मोठेंपण होय. शरीरसंपत्तीचा वारसा त्यांना उत्तम लाभला होता. त्याची निगा त्यांनीं चांगली ठेवली. लहानपणीं कसरत, कुस्ती, पोहणें यांच्या साह्यानें त्यांनीं आपलें मुलायम शरीर भव्य व खंबीर बनविलें. त्यांच्या पोषाखाची धाटणी भारतीय खानदानीची होती. तरुणपणांतले त्यांचे फोटो पाहिले तर परीकथेंतला एखादा राजपुत्र आपणांसमोर उभा आहे असा भास होतो. वृद्धावस्थेंत त्यांचें दर्शन ऋषितुल्य वाटे. पण हा ऋषि संन्यासी नसून राजयोगी आहे ही खात्री पटत असे. साधा पण उंची व व्यवस्थित पोषाख आणि शरीरमनाचें परिपक्व देखणेंपण यांमुळें त्यांचा

प्रभाव माणसावर तात्काळ पडे. शेवटचें दुखणें सोडलें तर जन्मांत मोठ्या अशा आजारानें त्यांना एकदांच पछाडलें होतें. आहारांतहि त्यांची सौंदर्य-दृष्टि सुटत नसे. शाकाहार दृष्टीला रमणीय वाटतो म्हणून तोच त्यांना विशेष रुचत असे. ते हितभुक् आणि मिताहारी होते. कर्मठपणाचा त्यांना अर्थातच तिटकारा होता. पण जीवन जगणें म्हणजे इंद्रियविषयक सुखांत डुंबत राहणें असें ते समजत नसत. इंद्रियसुखहि असें असावें कीं, अतींद्रिय आनंदाला त्यानें स्पर्श करावा असें त्यांचें म्हणणें असे.

निसर्ग हें त्यांचें वेड होतें. निसर्गानें त्यांचें सर्व जीवनच व्यापून टाकलें होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. दररोज सकाळीं उठल्यानंतर सूर्याचें दर्शन घेण्याचा त्यांचा परिपाठ असे. " सूर्य आत्मा जगतः " ही त्यांची श्रद्धा होती. जगतपर्यटनामध्यें दिवस-रात्रीचा काल विषम असतांहि त्यांचें हें व्रत चुकत नसे. कलकत्त्याचें मुख गिरण्यांच्या धुरानें काळवंडलें याची त्यांना खंत वाटे. सिलेल्दा येथील आपल्या जमीनजुमल्यावर ते जात त्या वेळीं त्यांच्या आनंदाला पारावार रहात नसे, मात्र ते केवळ एकटे रानावनांत हिंडत रहात नसत. बाजूच्या खेड्यांतल्या साध्या प्रेमळ व कर्तव्यनिष्ठ शेतकऱ्यांत ते मिसळत आणि एक अपूर्व आनंद मिळवीत.

आपण निर्मिलेल्या स्वप्नसृष्टींत गुंग असलेला हा महाकवि कर्तव्यतत्पर पति, कुटुंबवत्सल आप्त होता. वडील " महर्षि " या पदवीनें बंगालमध्यें मान्यता पावले होते. रवीन्द्र म्हणजे महर्षींच्या प्रदीपावर लावलेला दीपच होता. आपल्या पित्याच्या समाधीवर रवीन्द्रांनीं एक शिलालेख खोदला. '**तिनि आमार प्राणेर आराम. मनेर आनंद. आत्मार शांति**' ( ते माझ्या प्राणाचा विसांवा, मनाचा आनंद आणि आत्म्याची शांति होते. ) रवीन्द्रांच्या पत्नी मृणालिनीदेवी पतिपरायण साध्वी होत्या. 'शांति-निकेतना' चा विस्तार व्यवस्थित व्हावा यासाठीं त्यांनीं आपले दागिने रवीन्द्रांच्या हवालीं केले. दुर्दैवानें ही साध्वी रवीन्द्रांना जीवनाच्या अर्ध्या-वाटेवरच सोडून गेली. त्या वेळीं रवीन्द्रांचें वय सुमारें ४१ वर्षांचें होतें. त्यांच्या शेवटच्या दुखण्यांत रवीन्द्रांनीं सेवाशुश्रूषेची पराकाष्ठा केली. रवीन्द्राच्या ज्येष्ठ बंधूंच्या स्नुषा हेमलतादेवी यांनीं या प्रसंगाचें वर्णन दिलें आहे.

" आम्हां कुटुंबियांना कविराजांनीं, पत्नीच्या मृत्यूपूर्वीं दोन महिने दिवस-रात्र तिची सेवा कशी केली हें नेहमीं आठवतें. तिला बरें वाटावें याविषयीं ते प्रेमानें आणि आस्थेनें काळजी घेत. त्या वेळीं विजेचे पंखे नव्हते. पत्नीला झोप लागावी म्हणून ताडपत्राच्या पंख्यानें सतत वारा घालीत असलेल्या रवीन्द्रांची मूर्ति मला स्पष्ट डोळ्यांपुढें दिसते. त्या वेळीं खानदानी कुटुंबांत शुश्रूषेसाठीं परिचारिका ठेवण्याची पद्धत असे. पण रवीन्द्रांचें घर याला अपवाद होतें. "

पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांची अतिशय लाडकी मुलगी निवर्तली! हिच्या शरीरांत क्षयानें प्रवेश केला होता. आपल्या कार्यव्यग्रतेंतून वेळ काढून रवीन्द्रांनीं तिला हिमालयांत आलमोरा येथें नेलें. पण हवापालट अथवा औषधोपचार यांचा कांहीं उपयोग न होतां या मुलीचा जीवनतंतु तुटला. हिमालयांतून परत येतात तोंच देवतातुल्य पिताजी स्वर्गस्थ झाले! ज्योतिदादाच्या पत्नी अशाच एके दिवशीं रवीन्द्रांना पोरकें करून निघून गेल्या. या आणि अशा अनेक आघातांनीं रवीन्द्रांचें प्रेमळ मन वारंवार विह्वळ झालें, रक्ताळलें. त्यांना औदासीन्य आलें. पण ते कडवट झाले नाहींत किंवा अश्रद्धेनें त्यांना घेरलें नाहीं. प्रत्येक दुःखाघातानें त्यांना अधिक अंतर्मुख बनविलें.

मनुष्येतर प्राण्यांवरहि रवीन्द्रांचें आतोनात प्रेम असे. कावळ्यांना पाणी पिण्यासाठीं बंगल्याच्या व्हरांड्यांत एक वाडगा ठेवलेला असे. त्यांत रवीन्द्र स्वतः नेमानें पाणी घालून ठेवत. कुत्र्याचा लळा त्यांना होता. शेवटच्या आजारांत मधून मधून त्यांच्या आवडत्या कुत्र्याला रुग्णशय्येजवळ न्यावें लागे. त्याच्या पाठीवरून हात फिरविला आणि त्या मुक्या प्राण्यानें कृतज्ञ डोळ्यांनीं त्यांच्याकडे पाहिलें म्हणजे रवीन्द्रांना बरें वाटे. अखिल वस्तुजाताचे ते सोयरे होते. चाकरनोकरांच्या जेवणाखाण्याचीच नव्हे तर विश्रांतीचीहि ते काळजी घेत.

स्वप्नसृष्टींत गुंतलेले कवि हे व्यवहारांत कच्चे असतात असा अनुभव आहे. मोठाले व्यवहार चालवितांना जो समतोलपणा, अचूकपणा लागतो, ज्या सावधगिरींची आवश्यकता असते ती नसल्यानें त्यांचे व्यवहार अंगावर येतात. देशावर मीठ घेऊन कोकणांत विकणाऱ्या अदूरदर्शी तुकारामा-

सारखी त्यांची स्थिति होते. पण रवीन्द्रनाथ या गोष्टीला अपवाद होते. त्यांनीं 'विश्वभारती'सारखी संस्था काढून ती उत्तम रीतीनें नांवारूपाला आणली. यांत त्यांनीं दाखविलेलें संघटनाचातुर्य, हिशेबीपणा हीं प्रशंसनीय नव्हतीं असें कोण म्हणेल ! त्यांनीं आपल्या जमिनीचे व्यवहारहि फार अक्कलहुशारीनें केले आणि इस्टेट उत्तम संभाळली. इतकेंच नव्हे तर तींत चांगली भर टाकली. पण यांतहि माणुसकी त्यांनीं सोडली नाहीं. संकटग्रस्त किंवा गरजू कुळांना ते स्वखुशीनें सूट येत. अडी-अडचणींत सांपडलेल्या अनाथांना मोकळ्या मुठीनें मदत करीत. त्यामुळें त्यांचीं कुळें व आश्रित त्यांना फार मानत. भूतदया किंवा स्वप्नाळू वृत्ति या ठेवूनहि व्यवहारांत माणूस यशस्वी होतो हें रवीन्द्रनाथांच्या जीवनावरून सिद्ध होतें.

'युगानुयुगें अशी विभूति जन्माला आलेली नाहीं.' हे केसरलिंगचे उद्गार म्हणजे केवळ काव्य नव्हे. कारण बहुरंगी प्रतिभा, विशाल कर्तृत्व व थोर चारित्र्य यांचा असा संगम दुर्मिळच असतो. ड्यूरंटनीं म्हटल्याप्रमाणें रवीन्द्रांसारख्या विभूति होत्या म्हणूनच भारत स्वातंत्र्याला पात्र झाला. रवीन्द्र श्रीमंत होते, पण त्यांची श्रीमंती त्यांना बहुजनापासून अलग करूं शकली नाहीं. अखेर हें कांहींसें व्यक्तिनिष्ठच असतें. दीडशें रुपये कमावणारा माणूस शंभर रुपये कमावणाऱ्या आपल्या कनिष्ठ सहकाऱ्याकडे तुच्छतेनें पहातो. म्हणजे जवळ लक्ष्मी नसून तो वृत्तीनें भांडवलवालाच म्हणावा लागेल. उलट, रवीन्द्रांसारखे लक्ष्मीपुत्र हे बहुजनाशीं समरस होतात. त्यांच्या दुःखांत समभागी होऊन तीं नाहींशीं करण्याची खटपट करतात. ग्रामसुधारणेची फॅशन पडण्याच्या अनेक वर्षें आधीं रवीद्रांनीं ग्राम-सेवा-समाज स्थापून खेडेगांवांची सुधारणा करण्याचा पाया घातला. 'पल्लीसमाज' असें या मंडळाचें नांव होतें. या मंडळातर्फें खेडगांवांत आमूलाग्रह सुधारणा करण्याची भव्य योजना आंखली होती. गांवाचें पाणी शुद्ध राखावें, तेथें औषधोपचाराची सोय असावी, शिक्षणाप्रमाणें सर्व धर्म समभाग वाढीला लावण्याचा योजनाबद्ध प्रयत्न व्हावा, इस्पितळाप्रमाणेंच लवादमंडळहि असावें अशीं कलमें त्यांत होतीं. आज स्वतंत्र भारतांत जी ग्रामविकासाची व्यापक चळवळ सुरू आहे त्यांतले बहुतेक तपशील यांत आहेत. अखेर हें मंडळ पायरी पायरीनें राष्ट्रसभेला जोडून टाकावें असाहि

संकल्प केलेला होता. रवीन्द्र अहोरात्र आपला देश, आपला समाज, आपले बांधव यांचा विचार करीत. आणि त्यांतून अनेक विधायक उपक्रम जन्माला येत. आपल्या ग्राममातेनें आपल्यासारख्या नागर माणसाला आपली सेवा करूं दिली याची त्यांना धन्यता वाटे.

‘ श्रीमंत ’ या उपाधीप्रमाणेंच ‘ कवि ’ या पदवीनें सूचित होणारा नर्म उपहासहि यामुळेंच रवीन्द्रांना लागू करतां येणार नाहीं. कवि आपल्या स्वप्नसृष्टींत मशगूल असतो. वास्तवाच्या प्रखर प्रकाशानें त्याचे डोळे दिपतात. तो एक प्रकारें पलायनवादी असतो. हें वर्णन रवीन्द्रांच्या बाबतींत तरी खोटें आहे हें वर सांगितलेंच आहे. कारण रवीन्द्र मनुष्यसमाजा-शिवाय जीवमात्राला दुसरें अस्तित्वच नाहीं असें मानणारे होते. विद्यादाना-पासून ग्रामोद्योगापर्यंत अनेक कार्यें यशस्वी रीतीनें पार पाडून रवीन्द्रांनीं आपली कार्यक्षमता तर प्रकट केलीच. पण ‘ मानवाचा सखा ’ ही आपली भूमिका उत्तम रीतीनें पार पाडली. ते प्रवचनें देत. निरनिराळे विषय शिकवीत, दौरे काढून फंड जमवीत, आणि आपल्या जिंदगीचा व संस्थांचा हिशेब चोख ठेवीत. शिष्टाचारांत ते कमी पडले नाहींत. कर्तव्यांत त्यांनीं चुकारपणा केला नाहीं. सार्वजनिक जीवनांत कसोटीचे क्षण आले त्या वेळीं त्यांनीं अपेक्षेबाहेर धैर्य व कर्तृत्व दाखविलें. आणि इतकें करूनहि आपल्या स्वतंत्र व भावजीवी आत्म्याला कुठल्याहि खोड्यांत त्यांनीं अडकवून घेतलें नाहीं.

एका खिस्ती धर्मोपदेशकानें म्हटल्याप्रमाणें धर्म हा रवीन्द्रांच्या जीवनाचा एक भाग नसून सर्व अंगोपांगांवर त्याची छाप होती. ‘ ब्राह्मो समाज ’ हा पथ बंगालमध्यें अव्वल इंग्रजी अमदानीच्या आरंभीं निघाला. यांत विद्वान्, संपन्न, ध्येयवेडी अशी अनेक बंगाली मंडळी होती. एकेश्वरी मत, निर्गुणोपासना, समता इ. या पंथाचीं सूत्रें होतीं. या पंथाच्या अनेक नेत्यांवर पाश्चात्त्य विचारसरणीची छाप पडली असली तरी नव्या युगास अनुसरून समाजांत आणि धर्मविचारांत खरोखरच कांहीं परिवर्तन घडून यावें अशी तळमळ असणारे अनेक ‘ ब्राह्मो ’ नेते होते. राममोहन, देवेन्द्र, केशवचंद्र, प्रतापचंद्र अशीं मोठालीं माणसें या पंथाचीं कर्णधार होऊन गेलीं. पुढें त्यांत उपपंथ स्थापन झाले तरी मूळ सुधारकी विचारधारा एकच

होती. रवीन्द्रांचें क्रियाप्रवण व धर्मशील मन ‘ ब्राह्मो ’ समाजाकडे वळलें तर आश्चर्य नाहीं. शिवाय पितृदेव तर या समाजाचे एक आधारस्तंभ. पण असें असलें तरी विमुक्त वृत्तीचे रवीन्द्र ‘ ब्राह्मो ’ समाजाच्या चौकटींत अडकले नींहात. रवीन्द्र ‘ ब्राह्मो ’ समाजांत आहेत हा त्या समाजाचा गौरव होता; पण निर्गुणोपासनेचा पंथ तात्त्विक दृष्ट्या कितीहि भक्कम असला तरी त्याचा अभिनिवेश बाळगून सगुणोपासनेंतलें सौंदर्य डावलायला रवीन्द्र तयार झाले नाहींत. ‘ ब्राह्मो ’च्या उपासना-संगीतांत रवीन्द्रांनीं भर घातली. पण सगुणभक्तीच्या साधकांनाहि त्यांच्या भक्ति-गीतांत आपलें अंतःकरण सांपडलें. ‘ ब्राह्मो ’ची समाजसुधारणा रवीन्द्रांना मान्य होती. त्यांनीं स्वतः हिंदूंच्या दुष्ट व वेडगळ रूढींवर अप्रियता सोसूनहि सतत तडाखे गाजविले. पण इंग्रजी समाजाचें सारेंच चांगलें व तें अनुकरण्यांत मोक्ष आहे, असली गुलामगिरी त्यांना साफ नापसंत होती.

रवीन्द्रांचा स्वर्गवास होऊन आज वीस वर्षें होत आहेत. सुदैवानें अविरत व दीर्घकाल कार्य करण्याचें भाग्य त्यांना लाभलें. या दृष्टीनें भारतावर व जगावर त्यांचा ठसा किती उमटला हें पाहणें समयोचित होईल. रवीन्द्रांच्या मातृभाषेंत तर फारच मोठें परिवर्तन त्यांनीं घडवून आणलें. प्रो. धूर्जटी-प्रसाद मुखर्जी यांनीं म्हटल्याप्रमाणें रवीन्द्रनाथांच्या प्रभावानें वाईट कविता किंवा नीरस गद्य बंगालींत लिहिणें आतां अशक्यच झालें आहे ! त्यांचीं गाणीं सर्व गातात. त्यांच्या चित्राचें नाहीं तरी नृत्य-नाट्याचें अनुकरण सर्वत्र चालू आहे. त्यांनीं कलेच्या आशयांत आणि आविष्कारांत जी क्रान्ति केली तिची छाप बंगालवरच नव्हे तर सर्वच भारतीय भाषांवर थोड्या-फार प्रमाणांत पडली आहे.

महाकवि केवळ जुने आदर्श बदलून थांबत नाहीं. तो जीवन आणि संस्कृति यांकडे पाहण्याची एक नवी दृष्टि देतो आणि यामुळें माणसाला आजवर न दिसलेलें सौंदर्य दिसूं लागतें आणि असेंच आणखी कांहीं पाहण्याची शक्ति येते. ‘ काबुलीवाला ’ ही रवीन्द्राची अत्यंत रमणीय कथा वाचल्यापासून ओबडधोबड कष्टकऱ्यांकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. फुगेवाल्यापासून रिक्शावाल्यापर्यंत अनेक उपेक्षितांना कलाक्षेत्रांत प्रतिष्ठा मिळूं लागली. ‘ अहो ! मला वाचतां येतंय् ’ ही दिवाकरांची हृदयस्पर्शी

गोष्ट सिनेमाच्या जाहिराती वांटणाऱ्या एका माणसावर लिहिलेली आहे. या माणसाला एका गोजीरवाण्या शिशूबद्दल वाटणारें वात्सल्य थेट 'काबुलीवाल्या'च्या जातीचें आहे. प्रांतोप्रांतीं अशा कथांचें पीक आलें आणि प्रतिभावंतांच्या सहानुभूतीला नवीं क्षितिजें सांपडलीं.

रवीन्द्रांच्या 'उर्मिले'चीच गोष्ट घ्या ना! वाल्मीकीनें आपल्या कमंडलूतलें सारें जल सीतेच्या अभिषेकांत खर्च केलें आणि बिचाऱ्या उर्मिलेवर मात्र दोन थेंबाचेंहि मार्जन केलें नाहीं. अशी प्रेमळ तक्रार करून रवीन्द्रांनीं अव्यक्तवेदना उर्मिलेचें चित्र रेखाटलें; तेव्हांपासून भारतीय भाषांत उर्मिलेला कांहीं वेगळीच प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. मैथिलीशरणबाबूंनीं आपल्या सत्त्वयुक्त प्रतिभेनें उर्मिलेच्या व्यक्तिरेखेला आपल्या 'साकेत' काव्यांत एवढी मूल्यवान् चौकट बसविली कीं, रामायणाची नायिका सीता नसून उर्मिलाच आहे असें क्षणभर वाटावें. इतर कांहीं हिंदी साहित्यिकांनीं उर्मिलेला भावपुष्पें वाहिलीं. चित्रकारांनीं आपले कुंचले या विषयांत चालविले. 'सीता' या आपल्या दैदिप्यमान् चित्रपटांत देवकी-बाबूंनीं उर्मिलेला एक-दोनदांच इतक्या प्रभावशालीपणानें पडद्यावर आणलें कीं, प्रेक्षकांनीं तिची मूर्ति कधींहि विसरूं नये. मराठींतहि याचे ध्वनि-प्रतिध्वनि उमटले. उर्मिलेच्या रवीन्द्रकृत प्रशस्तीमुळें पुराणकाव्यांतील इतरहि सुंदर व सामर्थ्यवान् परंतु आडबाजूला पडलेल्या अनेक व्यक्तिरेखा रसिक नव्या जाणिवेनें हुडकून काढूं लागले. महाकवीचा प्रभाव तो हाच.

प्रणयाच्या आविष्कारांत स्वप्नाळूपणा आणि संयम यांचा जो मिलाफ रवीन्द्रांच्या साहित्यांत दिसतो त्याचाहि कलेच्या अनेक माध्यमांवर परिणाम झाला आहे. केवळ मराठीचेंच उदाहरण घेतलें तरी 'मनोरंजन'-काळानंतर मराठी कथेंत जी काव्यात्मता आली ती रवीन्द्र वाङ्मयाच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष स्फूर्तीमुळें आली हें नाकबूल करून कसें चालेल? आज सत्यजित रायच्या ज्या कलाकृति जगन्मान्य ठरल्या आहेत त्यांतली सूक्ष्मता, संयतता, साधेपणा, प्रतीकात्मता हीं रवीन्द्र-परंपरेचींच आहेत. युग-कवीचा गंडा कुणी बांधतात, कुणी स्वतंत्रपणें आपली निर्मिति करतात, पण असें असलें तर युग-कवीचा स्थूल-सूक्ष्म परिणाम त्या त्या कालांतील कलाकारांवर झाल्याशिवाय रहात नाहीं. आज मराठी छंदांत अक्षरगणाला जें प्राधान्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

मिळत आहे त्यालाहि आडवळणानें लांबून आलेला रवीन्द्रांचा प्रभावच कारण आहे. ‘संगमोत्सुक डोह’ ही कविता माधव जूलियन् यांनीं रवीन्द्र पद्धतीवर अक्षर-गण छंदांत लिहिली आणि तिला एका कल्पक गायकानें बंगाली सूर लावून ती लोकप्रिय केली. तेव्हांपासून अशी रचना मराठींत मोठ्या उत्साहानें सुरू झाली आहे. अर्थात् आपण कोणाचें काय घेतों याचेंहि आपणाला भान नसतें. नव्हे, पुष्कळदां ऋण नाकारणें हाच संभावितपणा होऊन बसतो. यांत एक स्वतंत्र वृत्ति दिसली तरी ही संस्कृति खास नव्हे! कारण कृतज्ञता हें संस्कृतीचें प्रमुख लक्षण आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रांत छडी अंतर्धान पावली. लोकनृत्य हा शालेय कार्यक्रमाचा एक आवश्यक भाग होऊन बसला आहे. निसर्गाचें सान्निध्य किती महत्त्वाचें आहे हें विद्यार्थ्यांना पटविलें जातें. छात्रांना पुस्तकी तटाबाहेर जाण्याची संधि मिळते. या आणि अशा अनेक सुधारणांचा पाया रवीन्द्रांनीं घातला हें निर्विवाद आहे. समाजकारणांतील पुरोगामित्व आणि राष्ट्रकारणांतील उदारता यांनाहि रवीन्द्रांनीं चालना दिली. सूर्याचा उदय झाल्यावर जगाच्या कोनाकोपऱ्यांत, गिरीदरींत त्याचीं किरणें शिरतात त्याप्रमाणें रवीन्द्रांची उदारमतवादी शिकवण जीवनाच्या सर्व शाखांपर्यंत जाऊन पोंचली.

रवीन्द्रांनीं एखादें स्वतंत्र तत्त्वज्ञान प्रस्थापित केलें नाहीं. गीतेसारख्या सर्वमान्य ग्रंथाचा शंकराचार्य, ज्ञानेश्वर, टिळक, अरविंद इ० प्रज्ञावंतांनीं जसा स्वतंत्र अर्थ लावला तसें एखादें भाष्य रवीन्द्रांनीं रचिलें नाहीं. परंतु भारतीय संस्कृतींतली शाश्वत विचारधारा नव्या युगाला रुचेल व पचेल अशा शब्दांत त्यांनीं मांडली आणि जीवनाचें माधुर्य पटवून दिलें. त्यांनीं आध्यात्मिक विचाराला सौंदर्यवादाचा सुगंध लावल्यामुळें तो आधुनिक मनाला मोहक वाटूं लागला. बुद्धिवाद, संशयवाद यांच्या चक्रांत सांपडल्यामुळें ज्या बुद्धिमानांच्या जीवनांत पोकळी निर्माण झाली होती त्यांना नवी श्रद्धा लाभली. रवीन्द्रांची ‘साधना’ वाचून आपण आस्तिक झालों अशी कबुली एका महाराष्ट्रीय विचारवंतानें दिली आहे. असे शेकडों लोक आहेत.

रवीन्द्रांच्या अष्टपैलू प्रतिभेचा विशेष हा होता कीं, नव्या नव्या विचार-

प्रवाहांनीं ती कुंठित न होतां अधिक तरल होत गेली. नव्या जगांतील सुधारणेनें त्यांचे डोळे दिपूनहि गेलें नाहींत अथवा समाजांतील जीर्णशीर्ण परंपरांच्या देखाव्यानें ते भिटलेहि नाहींत. विज्ञानसंस्कृतीशीं थोडा-फार संबंध आल्यामुळें आपणांला एक प्रकारचा न्यूनगंड आला होता. अशा वेळीं पाश्चात्यांचें सर्व वाईट म्हणायचें आणि गुहेंत जाऊन फसवी आत्मसंतुष्टता मिळवायची असें कांहींजण करीत. तर विज्ञानसंस्कृतीला सर्वस्वीं शरण जाऊन आत्मतत्त्वावर तिलाञ्जलि द्यायची असा कित्येकांचा क्रम असे. रवीन्द्रांनीं हे दोन्ही मार्ग चुकीचे ठरविले. विज्ञानसंस्कृतीशीं तुलना करून त्यांनीं पुनः पुनः आपल्या संस्कृतींतल्या रहस्याचें श्रेष्ठत्व पटवून दिलें.

" युरोपला संघर्ष आवडतो. भारताला एकता प्रिय आहे. प्राणिमात्राशीं ऋणानुबंध जोडणें हें भारताचें ध्येय आहे, तर युरोपची प्रतिभा कलह निर्माण करते. भारतीय समाज अन्य संस्कृतींना आपल्यांत सामावून घेण्याचा प्रयत्न करतो, तर युरोप इतरांचा नाश करून आपल्या समाजाचें रक्षण करतो. भारतीय माणूस कर्तव्याचरणांत एकटा असतो आणि सुखोपभोगांत सर्वांना भागीदार करतो; युरोपीय माणूस कर्तव्यकर्म सामुदायिक रीतीनें करून सुखोपभोग मात्र एकटाच घेतो. भारत माणसाला मान देतो. युरोप कामाला मान देतो. भारत सर्वांना स्वातंत्र्य मिळावें असें चाहतो, युरोपला फक्त स्वतःकरितां स्वातंत्र्य पाहिजे असतें. ध्येय साध्य करण्यांत भारत धन्यता मानतो. युरोपला पाठलाग करीत राहण्यांत मौज वाटते." परंतु असें असलें तरी पाश्चात्त्य संस्कृतींत एक मोठा थर आध्यात्मिक प्रवृत्तीचा आहे याची जाणीव रवीन्द्रांना होती. माणसाचें भौतिक जीवन सुखी करण्याकरितां पाश्चात्त्यांनीं जो प्रचंड उद्योग चालविला आहे त्याची मुक्तकंठानें स्तुति रवीन्द्रांनीं केली आणि त्यांतलें जें चांगलें असेल तें आपल्या देशबांधवांनीं उचलावें असा सतत उपदेश केला. आपण सनातनी ठरूं किंवा आपणाला सुधारक म्हणतील यांपैकीं कुठल्याच भीतीनें रवीन्द्रांना पछाडलें नव्हतें.

या भूमिकेचें वर्णन राधाकृष्णन्नीं आपल्या अतुलनीय शैलीनें केलें आहे ते म्हणतात :

" आजच्या बदलत्या परिस्थितींत कित्येक भारतीय तरुणांना रवीन्द्र-

नाथांच्या आवाजानें सान्त्वन आणि स्फूर्ति दिली. आपण भग्न आशांच्या ओझ्याखालीं खचलों आहोंत, विज्ञान आणि संघटना यांच्या मुलुखगिरीनें आपणाला भोवळ आली आहे, आपणाला संचार करतां येत नाहीं, दिशा कळत नाहीं. अशा वेळीं रवीन्द्र आपल्या अंतःकरणांत नवी आशा उत्पन्न करीत आहेत, नवें धैर्य देत आहेत. आपलीं अंतःकरणें रक्ताळलेलीं असलीं तरी वाकलेलीं नाहींत आणि सत्ता-संपत्तीच्या मापानें यशाचें मूल्यमापन होऊं नये हें रवीन्द्र आपणांस पटवून देत आहेत. संस्कृतीची खरी कसोटी म्हणजे आध्यात्मिक प्रतिष्ठा आणि दुःख सहन करण्याची शक्ति ही होय. पैसा, सत्ता आणि कार्यक्षमता म्हणजे कांहीं जीवन नव्हे. खऱ्या मौल्यवान गोष्टी या वैयक्तिक आहेत आणि त्या विज्ञान आणि संघटना यांच्या आटोक्या-बाहेरच्या आहेत. ”

मनुष्य–जीवनाच्या उन्नतीसाठीं संयम अत्यावश्यक आहे. पण संयमी किंवा कर्मठ जीवन हें समाजपराङ्मुख नसावें. वेलीपासून तोडलेलें फूल पाण्यांत टाकलें तर थोडा वेळ पहायला बरें वाटतें. पण वेलींतून त्याला रस मिळेनासा झाल्यामुळें थोड्याच वेळांत तें सुकतें. मानवी जीवनांतला आनंद हा माणसांत राहून, इतरांच्या सुखदुःखाचें सहभागी होऊन घेणें हाच खरा पुरुषार्थ आहे. इस्लामनें माणसामाणसांतील बंधुतेला श्रेष्ठत्व दिलें, बुद्धानें ‘ मैत्री ’ भावनेचा महिमा गाइला; गीतेनें लोकसंग्रह, स्नेह या मूल्यांचा उपदेश केला. श्रेष्ठ धर्म आणि साहित्य यांत आढळणारा हाच मानवतावाद रवीन्द्रजीवनाचा व रवीन्द्रसाहित्याचा मूलाधार होय.

रवीन्द्रांचें साहित्य आणि कार्य यांतल्या तत्त्वत्रयींचें राधाकृष्णनूनीं थोडक्यांत पण मार्मिक समालोचन केलें आहे. आंतरजीवन शुद्ध करून अंतिम आध्यात्मिक मूल्यें प्रामाणिकपणें वागून जगणें हा त्यांच्या शिकवणुकीचा पहिला मंत्र होता. स्वतःशीं इमान हीच खरी साधना. तिच्या जोडीला अंतःशुद्धि. यामुळें जीवन अधिकाधिक सात्त्विक व संपन्न होत जातें. संन्यास किंवा नकारात्मक भूमिका यांची पवित्र आचरणासाठीं किंवा जीवनाचा संपूर्ण विकास करण्यासाठीं मुळींच जरूरी नाहीं हें रवीन्द्रांचें दुसरें तत्त्व. आमच्या देशाला याची फार गरज होती. कर्माचरणबद्दलच्या वेडगळ कल्पना येथें अनेक शतकें चालू होत्या. देहाला सुकवीत राहिलें

म्हणजे आध्यात्मिक योग्यता वाढत जाते असा एक गैरसमज येथें रूढ आहे आणि आजहि सर्वत्र त्याचा थोडा-फार अंमल दिसतो. रवीन्द्रांनीं यांच्याविरुद्ध जोराची चालना दिली. अतिरिक्त वासनासंतर्पण हें जितकें वाईट तितकेंच चांगल्या भावना मारून टाकणें हेंहि धोक्याचें आहे. त्यानें विकृति येते, माणूस अवनत होतो, जीवन शुष्क होऊन जातें. रवीन्द्रांनीं तिसरी गोष्ट लोकांच्या मनावर ठसविली ती ही कीं, सर्वांच्या ठायीं, विशेषत: दीन-दलितांच्या जीवनांत आत्मीयतेनें समरस होणें ही मानवी प्रगतीसाठीं अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.

असा हा रससिद्ध कवि आणि द्रष्टा आपल्या देशांत जन्माला आला याबद्दल परमेश्वराला आपण कितीहि धन्यवाद दिले तरी थोडेच होणार आहेत. रवीन्द्रांच्या शेवटच्या दुखण्यांत त्यांना ऑक्स्फोर्ड विद्यापीठातर्फें सन्माननीय पदवी देण्यासाठीं एक विद्वन्मंडळ आलें होतें. या मंडळाचें नेतृत्व त्या वेळचे भारताचे सर न्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांच्याकडे होतें. पदवी देतांना या विद्वन्मंडळातर्फें ग्वायरनीं एक लॅटिन भाषेंत लिहिलेलें मानपत्र रवीन्द्रांना अर्पण केलें. त्यांत म्हटलें होतें :

> **" आज आपणांपुढें हा विशाल मनाचा कवि आणि लेखक आहे. यानें संगीतांत नांव मिळविलें आहे. शब्द आणि कृति दोन्ही मार्गांनीं आपलें तत्त्वदर्शित्व सिद्ध केलें आहे. ज्ञानविज्ञानाच्या या निःसीम पुरस्कर्त्यानें जनतेच्या हक्कांची ध्वजा उंच धरली आहे. आपलें जीवन आणि चारित्र्य यांच्या शुद्धतेनें अखिल मानवजातीच्या प्रशंसेस हा पात्र झाला आहे. "**

यापेक्षां अधिक सूत्रमय भाषेंत रवीन्द्रांच्या उज्ज्वल आणि बहुविध जीवनाचें वर्णन कोण करूं शकेल? रवीन्द्रांची वाणी अनेक शतकें या जगांत निनादत राहील. रवीन्द्रांचें कार्य अनेक पिढ्यांना स्फूर्ति देईल. **'त्वमेवाहं न संशयः'** (तूं म्हणजे मीच हें निःसंशय) असेंच देवी सरस्वती त्यांना म्हणेल. आज सर्व लहान-थोर राष्ट्रें या कवीश्वराच्या जन्म-शताब्दिसमारोहांत एकत्र आलीं आहेत. भेदभाव क्षणभर बाजूला ठेवून

रवीन्द्रसंकीर्तनांत सर्वजण तल्लीन होत आहेत. त्यांच्या अमर काव्यमूर्तीचा छबीना निघाला असून अमेरिकेपासून रशियापर्यंत सर्व राष्ट्रें त्यांत आपापलें पूजासाहित्य घेऊन सामील झालीं आहेत. जग हें सर्व मानवांचें घरटें व्हावें, प्रेमाचें साम्राज्य सुरू व्हावें हें रवीन्द्रांचें ध्येय या समारोहांत तरी साकार झालेलें दिसतें. या रथयात्रेंत भारताला जास्तींत जास्त आनंद आणि अभिमान वाटला तर त्यांत काय नवल! सुरासुरांनीं, काळ्यागोऱ्यांनीं, बलिष्ठ-दलितांनीं पुष्पवृष्टि चालविली आहे. यांतच सजल नेत्रांनीं आणि सद्गदित मनानें एक नम्र साधक हें लहानसें पुष्प वहात आहे.

**“ परी गीताईश्वर भोळा । ले व्यासोक्तिसुमनमाळा । परी माझिया दूर्वादळा । ना न म्हणे कीं ॥**

REFBK-0011640

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ११६४०
शाखा (स्थळ ग्रं)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

## फोडिलें भांडार.


( 1 ) Tagore a Study ( D. P. Mukherjee )

( 2 ) The Sentinal of the East ( Durlab Singh )

( 3 ) Among the Great ( D. K. Roy )

( 4 ) Rabindranath Tagore ( Thomson )

( 5 ) Philosophy of Rabindranath Tagore ( Radhakrishnan )

( 6 ) Golden Book of Tagore

( 7 ) Great Indians ( Radhakrishnan )

( 8 ) Calcutta Mucpl. Gazzette ( Tagore number )

( 9 ) Contemporary Philosophy

(१०) रवीन्द्रनाथ टागोर ( कानिटकर )

(११) गुरुदेव टागोर ( शिखरे )

(१२) रवीन्द्र-मनन ( कालेलकर )

(१३) रवीन्द्र प्रतिभेचे कोवळे किरण ( कालेलकर )

(१४) रवीन्द्र-दर्शन ( सुखटणकर )

(१५) जीवन-साहित्य ( भागवत )

(१६) शांतिनिकेतन-माला : ४ भाग ( वा. गो. आपटे )

(१७) एकविंशति ( वरेरकर )

(१८) अभंग-गीताञ्जलि ( ऋग्वेदी )

(१९) प्राचीन साहित्य ( आठवले )

(२०) गीताञ्जलि ( देवगिरीकर )

[ ' Modern Review ', ' मनोरंजन ', ' साधना ', ' मौज ' इ. नियतकालिकें ]


★

## श्री. गोपीनाथ तळवलकर यांचें वाङ्मय

### काव्य

१ दूर्वांकुर

२ शिशुविहार

### कथा-कादंबरी

१ छायाप्रकाश

२ अनुराधा

३ आकाशमंदिर

४ मालकंस

### नवसाक्षरांसाठीं

१ सारी एकाच ईश्वराचीं लेकरें

### चरित्र-प्रबंध इ०

१ आशियाचे धर्मदीप

२ मंगलधाम

३ आनंदभुवन

४ नाना-पत्रें

५ गृहरत्नें

६ नवीं गृहरत्नें

७ बुद्धदेव

### मुलांसाठीं

१ सात राजहंस

२ चंद्रशेखर आणि मोहना

३ लिंबोणीच्या झाडाखालीं

४ साराच चमत्कार

५ कुमार मित्रांनो !

६ आजकालच्या थोर विभूति

### आगामी

बुद्धायन

★